सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. १८ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक १०६ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राज्यात १०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्यांना २६% दर कपात!



मुंबई : वाढत्या वीज बिलांबाबत जनतेत वाढती चिंता असताना, महाराष्ट्र सरकारने बुधवारी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनादरम्यान एक महत्त्वपूर्ण घोषणा केली, ज्यामुळे लाखो ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दरमहा १०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी वीजदरात २६ टक्के कपात जाहीर केली.

महायुती सरकारने जनतेला दिलेली 'भेट' असे या निर्णयाचे वर्णन करण्यात आले असून, यामुळे राज्यातील सुमारे ७० टक्के वीज ग्राहकांना फायदा होण्याची शक्यता आहे, कारण बहुसंख्य ग्राहक १०० युनिटच्या वापराच्या कक्षेत येतात. फडणवीस यांनी सभागृहाला आश्वासन दिले की, नजीकच्या भविष्यात वीजदरात कोणतीही वाढ होणार नाही, ज्यामुळे घरगुती बजेटसाठी स्थिरता आणि अंदाज वर्तवता येईल.

काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ही घोषणा करण्यात आली. पाटील यांनी ग्राहक सुनावणी न घेता निर्णय लागू केल्याबद्दल सरकारवर टीका केली होती. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मागील एका निर्णयाकडे त्यांनी विशेषतः लक्ष वेधले होते, ज्यात दुरुस्ती आवश्यक असलेल्या चुका असल्याचे निदर्शनास आणले होते. याला उत्तर देताना, फडणवीस यांनी चएठउ च्या आदेशात त्रुटी होत्या, ज्या आता दूर केल्या गेल्या आहेत, हे कबूल केले. त्यांनी वीज बिलांमधील प्रणालीगत समस्यांकडेही लक्ष वेधले, दुहेरी हिशेबामुळे ९०,००० कोटींच्या आर्थिक चुकीचा उल्लेख केला. फडणवीस यांनी नमूद केले की, घरगुती ग्राहकांना योग्य प्रमाणात फायदा मिळत नसताना, जालना येथील एका स्टील कंपनीला अनुदानाच्या माध्यमातून २०० कोटींचा फायदा देण्यात आला होता,

ज्यामुळे निष्पक्षतेबद्दल चिंता वाढली होती. हा विशिष्ट मुद्दा नंतर चएठउ ने विचारात घेतला आणि त्यानंतर तो दुरुस्त करण्यात आला.

सध्या, महाराष्ट्रात सुमारे २.८ कोटी वीज ग्राहक आहेत, ज्यात ठाणे, मुंबई, नवी मुंबई आणि उर्वरित राज्याचा समावेश आहे. व्यवसाय वाढवण्यासाठी सरकार औद्योगिक ग्राहकांना आणि शेतकऱ्यांना सवलती देते, ज्यापैकी अनेक जण आता सौर ऊर्जा उपायांकडे वळत आहेत. फडणवीस यांनी सांगितले की, सौर ऊर्जा स्वीकारल्याने शेतीसाठी विजेवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होत आहे, ज्यामुळे अचानक वीज खंडित झाल्यास सिंचनात अडथळा येत नाही. त्यांनी विधानसभेला पुढे माहिती दिली की, राज्यातील सर्व फीडरवर स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत, ज्यामुळे सरकारला या वर्षाच्या अखेरीस विजेचे नेमके नुकसान, विशेषतः कृषी पुरवठ्यात, निश्चित करता येईल. सरकारच्या या निर्णयामुळे लाखो घरांना मोठा आर्थिक दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.




## बिहारमध्ये वीज मोफत होणार; निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री नितीश कुमारांची घोषणा

पाटणा : विधानसभा निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी बिहारच्या जनतेला एक मोठी भेट दिली आहे. १ ऑगस्टपासून राज्यातील घरगुती ग्राहकांना १२५ युनिटपर्यंत मोफत वीज दिली जाणार आहे. मुख्यमंत्री नितीश यांनी 'एक्स' वर लिहिले की, 'आम्ही सुरुवातीपासून सर्वांना स्वस्त दरात वीज पुरवत आहोत. आता आम्ही निर्णय घेतला आहे की, १ ऑगस्ट २०२५ पासून म्हणजेच जुलै महिन्याच्या बिलातून राज्यातील सर्व घरगुती ग्राहकांना १२५ युनिटपर्यंतच्या वीजेसाठी कोणतेही पैसे द्यावे लागणार नाहीत. याचा फायदा राज्यातील एकूण १ कोटी ६७ लाख कुटुंबांना होणार आहे. पुढील तीन वर्षांत सर्व घरगुती ग्राहकांची संमती घेतल्यानंतर, त्यांना त्यांच्या घरांच्या छतावर किंवा जवळच्या सार्वजनिक ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प बसवून लाभ दिला जाईल. कुटीर ज्योती योजनेअंतर्गत, अत्यंत गरीब कुटुंबांसाठी सौर ऊर्जा प्रकल्प बसवण्याचा संपूर्ण खर्च राज्य सरकार उचलेल.

## डोनाल्ड ट्रम्प पाकिस्तान दौरा करण्याची शक्यता, पाकिस्तानी मीडियाचा दावा

इस्लामाबाद : पाकिस्तनचे चीनसोबतचे चांगले संबंध असताना आता पाक अमेरिकेला जवळ करण्याचा प्रयत्न करतोय.यासाठी त्यांनी एक नवीन अफवा पसरवली आहे. पाकिस्तानी मीडिया रिपोर्ट्‌समध्ये अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प येत्या १८ सप्टेंबर रोजी पाकिस्तानचा दौरा करणार असल्याचा बातम्या प्रसारित होत आहेत.

पाकिस्तानी मीडिया रिपोर्ट्‌सनुसार, डोनाल्ड ट्रम्प येत्या १८ सप्टेंबर रोजी पाकिस्तानचा दौरा करू शकतात. परंतु यात किती तथ्य आहे, यावरही प्रश्न उपस्थित केले जाताहेत. कारण, डोनाल्ड ट्रम्प यांचा युके दौरादेखील त्याच दिवशी प्रस्तावित आहे. अशा परिस्थितीत, पाकिस्तानच्या दाव्यांवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आता पाकच्या दाव्यावर व्हाईट हाऊस काय प्रतिक्रिया देते, हे पाहणे बाकी आहे. कारण अमेरिका किंवा पाकिस्तानी सरकारने याबाबत अधिकृत निवेदन जारी केलेले नाही.

अलीकडेच पाकिस्तानी लष्करप्रमुख असीम मुनीरने अमेरिकेचा दौरा केला होता. या दौऱ्यानंतर दोन्ही देशांमधील संबंध मजबूत झाल्याच्या बातम्या सुरू झाल्या. आता तर स्वतः ट्रम्प अमेरिकेचा दौरा करणार असल्याचा बातम्या येत आहेत. जर ट्रम्प सप्टेंबरमध्ये पाकिस्तानला गेले, तर १९ वर्षांनंतर हा एक मोठा पराक्रम होईल. गेल्या दोन दशकांत कोणत्याही अमेरिकन राष्ट्राध्यक्षाने पाकिस्तानचा दौरा केलेला नाही. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांनी मार्च २००६ मध्ये पाकिस्तानला शेवटची भेट दिली होती.

# मुसळाधार पावसामुळे अमरनाथ यात्रा २४ तासांसाठी स्थगित

जम्मू : गेल्या ३६ तासांपासून काश्मीर खोऱ्यात मुसळधार पाऊस पडत असल्याने गुरुवारी अमरनाथ यात्रा स्थगित करण्यात आली आहे. हवामान खात्याने जम्मू आणि काश्मीरच्या काही भागात आणखी मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. गंदरबल जिल्ह्यातील बालटाल यात्रेच्या मार्गावर भूस्खलनात एका महिला यात्रेकरूचा मृत्यू आणि तीन जण जखमी झाल्यानंतर एक दिवसानंतर हा इशारा देण्यात आला आहे. काश्मीर विभागीय आयुक्त विजय कुमार भिदुरी म्हणाले की, पहलगाम आणि बालटाल बेस कॅम्पमधून होणारी श्री अमरनाथ यात्रा १७ जुलैपर्यंत स्थगित करण्यात आली आहे.



गेल्या दोन दिवसांपासून सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे दोन्ही मार्गांवरील रुळाची दुरुस्ती करणे आवश्यक झाले आहे.

बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशनने काम पूर्ण करण्यासाठी रुळांवर मोठ्या संख्येने कर्मचारी आणि मशीन्स तैनात केल्या आहेत. जेणेकरून बालटाल आणि पहलगाम बेस कॅम्पमधून यात्रा पुन्हा सुरू करता येईल. दिवसाच्या हवामान परिस्थितीनुसार शुक्रवारी यात्रा पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे. दोन दिवसांच्या हवामान सल्लागारात जम्मू आणि काश्मीरमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे,. ज्यामध्ये काश्मीरच्या यात्रा मार्गांचा समावेश आहे. या वर्षी पहिल्यांदाच जम्मूमधून यात्रा स्थगित करण्यात आली आहे.

३ जुलै रोजी यात्रा सुरू झाल्यापासून आतापर्यंत २.४७ लाख यात्रेकरूंनी ३,८८० मीटर उंचीच्या या मंदिराला भेट

दिली आहे. २ जुलै रोजी लेफ्टनंट गव्हर्नर मनोज सिन्हा यांनी पहिल्या तुकडीला हिरवा झेंडा दाखवल्यानंतर आतापर्यंत जम्मू बेस कॅम्पमधून एकूण १,०१,५५३ यात्रेकरू खोऱ्यात रवाना झाले आहेत. आतापर्यंत ४ लाखांहून अधिक नागरिकांनी या यात्रेसाठी ऑनलाइन नोंदणी केली आहे. गेल्या वर्षी ५.१० लाखांहून अधिक यात्रेकरूंनी या गुहा मंदिराला भेट दिली होती.

## महाराष्ट्रामध्ये कृत्रिम फुलांवर बंदी येणार!

मुंबई : महाराष्ट्र सरकारने कृत्रिम फुलांवर बंदी घालण्याचा निर्णय जाहीर केला आहे. स्थानिक फूलशेती करणाऱ्या शेतकऱ्यांना पाठिंबा देण्यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. राज्य फलोत्पादन मंत्री भारत गोगावले यांनी बुधवारी विधानसभेत या आगामी बंदीला दुजोरा दिला, मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला.

मंत्री गोगावले यांनी शेतकऱ्यांप्रति सरकारच्या वचनबद्धतेवर भर दिला, आम्ही आमच्या शेतकऱ्यांना पाठिंबा देण्यासाठी कटिबद्ध आहोत, आणि त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी हे पाऊल आवश्यक आहे. या निर्णयामुळे कृत्रिम फुलांचा त्यांच्या उत्पन्नावर होणाऱ्या विपरीत परिणामांबाबत फूलशेती करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये वाढत्या चिंतांचे निराकरण होईल. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार महेश शिंदे, ज्यांनी सुरुवातीला हा मुद्दा विधानसभेच्या निदर्शनास आणला होता, त्यांनी मंत्री गोगावले आणि मुख्यमंत्र्यांसोबतच्या मागील बैठकीचा संदर्भ दिला, ज्यात फडणवीस यांनी बंदी घालण्याचे आश्वासन दिले होते. शिंदे यांनी यापूर्वी असा युक्तिवाद केला होता की, कृत्रिम फुलांच्या व्यापक वापरामुळे पारंपरिक फूल उत्पादकांवर गंभीर परिणाम होत आहे. बुधवारी त्यांनी विश्वास व्यक्त केला की, या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात मदत होईल.

मंत्री गोगावले यांनी कबूल केले की, महाराष्ट्रातील फूल उत्पादक स्वस्त, मोठ्या प्रमाणावर उत्पादित कृत्रिम फुलांच्या वाढत्या प्रभावामुळे मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत.

## नाशिकमध्ये अपघातानंतर कार नाल्यात कोसळली, ७ जणांचा बुडून मृत्यू



नाशिक : नाशिक-वणी रस्त्यावर दिंडोरी बाजार समितीसमोर रात्री कार-दुचाकीची समोरासमोर धडक झाली. धडक झाल्यानंतर कार नाल्यात कोसळली. या अपघातात नाल्याच्या पाण्यात बुडून कारमधील सात जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये तीन पुरूष, तीन महिला आणि लहान बाळाचा समावेश आहे. सर्व मृत नाशिक जिल्ह्यातल्या दिंडोरी तालुक्यातील रहिवासी आहेत.

अपघातात ज्यांचा मृत्यू झाला ते सर्वजण एका वाढदिवसाच्या पार्टीसाठी गेले होते. घरी परततेवेळी अपघात झाला. कार आणि दुचाकीची धडक झाली. या धडकेनंतर चालकाने नियंत्रण गमावले आणि कार नाल्यात जाऊन कोसळली. कारमध्ये बसलेल्यांना बाहेर येण्याची संधीच मिळाली नाही. यामुळे कारमध्ये असलेल्या सात जणांचा नाल्याच्या पाण्यात बुडून मृत्यू झाला.

कारमधील देविदास गांगुर्डे (२८, सारसाळे), मनिषा गांगुर्डे (२३, सारसाळे), उत्तम जाधव (४२, कोशिंबे), अलका जाधव (३८, कोशिंबे), दत्तात्रेय वाघमारे (४५, देवपूर, देवठाण), अनुसया वाघमारे (४०, देवपूर, देवठाण), भावेश गांगुर्डे (दोन) यांचा मृत्यू झाला. दुचाकीवरील मंगेश कुरघडे (२५), अजय गोंद (१८, रा. जव्हार, पालघर, सध्या सातपूर, नाशिक) हे जखमी झाले. त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# सरकारी कर्मचाऱ्यांना अर्धा तास उशिराची मुभा कर्मचाऱ्यांना

### राज्य सरकारची विधानसभेत माहिती

मुंबई : मुंबईतील रेल्वे वाहतुकीवर येणारा ताण कमी करण्यासाठी सरकारी पातळीवर विविध उपाययोजनांचा विचार केला जात असतानाच सरकारी आस्थापनांतील कर्मचाऱ्यांना अर्धा तास उशिराने येण्याची मुभा देण्यात आली आहे, अशी माहिती राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी बुधवारी विधानसभेत दिली. त्याचवेळी या कर्मचाऱ्यांना वाढीव अर्धा तास काम करावे लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मुंब्रा रेल्वे अपघात प्रकरणाचे पडसाद बुधवारी विधानसभेत उमटले. आमदार अतुल भातखळकर यांनी या संदर्भातील लक्षवेधी मांडली. त्यावर उत्तर देताना प्रताप सरनाईक यांनी ही घोषणा केली. काँग्रेस आमदार नाना पटोले यांनीही या चर्चेत सहभाग घेतला. 'मुंबई रेल्वे वाहतुकीवरील ताण वाढता आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. आज लोकल पकडण्यासाठी रेल्वे प्रवासी जीव धोक्यात घालत आहेत. त्यातूनच मुंब्रा अपघातासारखी घटना घडली. प्राप्त

'खासगी' कर्मचाऱ्यांच्या वेळेबाबत 'टास्क फोर्स'

'खासगी आस्थापनांतील कर्मचाऱ्यांच्या वेळेत



करण्यासंदर्भात लवकरच 'टास्क फोर्स' तयार केले जाणार आहे,' अशी घोषणाही सरनाईक यांनी विधानसभेत केली. बदल आकडेवारीनुसार, मुंबईत विविध रेल्वे अपघातांत ७ हजार ५६५ प्रवाशांचा मृत्यू झाला. सुमारे ७ हजार २०० प्रवासी जखमी झाले असून ही बाब भूषणावह नाही. त्यामुळे या घटना कमी करण्यासाठी सरकारच्या माध्यमातून विविध प्रयत्न सुरू आहेत. मेट्रो रेल्वेशिवाय इतर वाहतूक पर्यायांचा वापर करण्याबाबत सरकार सकारात्मक आहे,' असे सरनाईक यांनी यावेळी नमूद केले.

बंद दरवाजांच्या रेल्वेसंख्येत वाढ?

'एसी लोकल आणि सामान्य लोकलचे तिकिटाच्या दरात तफावत आहे. त्यात सुसूत्रता आणून जास्तीत जास्त बंद दरवाजांच्या रेल्वेच्या संख्येत वाढ करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे केंद्रीय रेल्वेमंत्र्यांशी चर्चा करत आहेत,' अशी माहितीही सरनाईक यांनी सभागृहात दिली. याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच बैठक घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पॉट टॅक्सी आणि जलवाहतुकीचा विचार

'राज्य सरकारने प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले आहे. मुंबईत प्रवाशांचा प्रवास सुकर व्हावा, यासाठी सरकारने जलवाहतूक, पॉट टॅक्सी आणि रोप वे यांसारख्या पर्यायी वाहतूक व्यवस्थांचा विचार सुरू केला आहे. परिवहन सेवा अधिक सक्षम करण्यासाठी उपाययोजना करणार आहे,' अशी माहिती सरनाईक यांनी यावेळी दिली.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला शिर्डी व पुरंदर विमानतळाच्या कामाचा आढावा

## आगामी कुंभमेळ्यापूर्वी शिर्डी विमानतळावरील प्रस्तावित कामे पूर्ण व्हावीत - मुख्यमंत्री

मुंबई, दि. १७ - आगामी काळात होणाऱ्या नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या दृष्टीने शिर्डी विमानतळ हे महत्त्वाचे विमानतळ असणार आहे. त्यामुळे हे विमानतळ पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी नुतनीकरण व विस्तारीकरणाची कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले.

शिर्डी व पुरंदर विमानतळाच्या कामाचा आढावा आज श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील विधानभवनातील बैठकीत घेण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलरासू, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी, अहिल्या नगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, मुख्य वित्त अधिकारी अनिशा गोदानी आदी उपस्थित होते.

शिर्डी विमानतळाच्या विस्तारीकरण व नुतनीकरणाच्या कामाचा सविस्तर आढावा घेऊन मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, शिर्डीतील विमानतळावरील नवीन एटीसी इमारत, नवीन एकात्मिक मालवाहतूक इमारत,नवीन टर्मिनल इमारतीची कामे प्रस्तावित आहेत. ही कामे आगामी कुंभमेळा सुरू होण्यापूर्वी पूर्ण होणे आवश्यक आहे. मात्र, ही कामे संथगतीने सुरू आहेत. ही कामे वेळेत पूर्ण होणे आवश्यक असून त्यासाठी आवश्यक वाटल्यास अतिरिक्त मनुष्यबळ वापरावे. तसेच विमानतळासाठी आवश्यक असणारी खरेदी व स्ट्रक्चरल डिझाईनची कामे येत्या आठवड्यात पूर्ण करावीत.

शिर्डी विमानतळ हे मुंबई व नवी मुंबई विमानतळाच्या जवळचे विमानतळ आहे. येथील लहान विमाने पार्किंगसाठी शिर्डी विमानतळाचा वापर होऊ शकतो. त्यादृष्टीने आतापासूनच शिर्डी विमानतळावर सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक असल्यास आणखी जमिन संपादीत करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले.

पुरंदर विमानतळासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यामुळे आता या विमानतळासाठी लागणारी जमिन संपादीत करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पुणे जिल्हाधिकारी यांनी तातडीने सुरू करावी. जेणेकरून विमानतळाचे काम लवकर सुरू होईल. हे विमानतळ सुरू झाल्यावर महाराष्ट्रातील विमानसेवा आणखी वाढणार आहे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी पुरंदर विमानतळाचे काम लवकर सुरू व्हावे, यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात यावी. तसेच त्याठिकाणी मोठी विमाने उतरण्याची सोय असावी, त्यासाठी आतापासूनच आवश्यक ती काळजी घ्यावी. या विमानतळावर विमानांच्या हँगरचीही व्यवस्था असावी, असे सांगितले. महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष स्वाती पांड्ये यांनी सादरीकरणाद्वारे शिर्डी व पुरंदर विमानतळाच्या कामांची माहिती दिली. शिर्डी विमानतळासाठी नेमण्यात आलेल्या सल्लागार कंपनी व कंत्राटदार कंपनीच्या प्रतिनिधींनीही माहिती दिली.

## पाकिस्तानसाठी हेरगिरी; जवान अटकेत

चंदीगड : पाकिस्तानच्या इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजेन्स (आयएसआय) साठी हेरगिरी करणाऱ्या भारतीय सैन्यातील जवानाला अटक करण्यात आली आहे. आरोपी जवानाचे नाव देविंदर सिगं असून तो संगरूर जिल्ह्यातील निहालगडचा रहिवासी आहे. पंजाब पोलिसांच्या स्टेट स्पेशल ऑपरेशन सेलने त्याला जम्मू-काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यातील उरी येथून १४ जुलै रोजी अटक केली आहे.

यासंदर्भात पंजाब पोलिसांनी जारी केलेल्या निवेदनानुसार हेरगिरीच्या आरोपाखाली ताब्यात घेतलेल्या माजी सैनिक गुरप्रीत सिंग उर्फ गुरी याच्या अटकेनंतर देविंदरला अटक करण्यात आली आहे. गुरप्रीत सिंगच्या चौकशीत



असे आढळले की देविंदर फिरोजपूर तुरुंगात असताना लष्कराचे संवेदनशील कागदपत्रे मिळवण्यात त्याचा सहभागी होता. यातील गोपनिय माहिती त्याने आयएसआयला दिल्याचा आरोप आहे. देविंदर सिंगच्या अटकेनंतर, अधिकाऱ्यांनी त्याला १५ जुलै रोजी मोहाली न्यायालयात हजर केले.

न्यायालयाने आरोपीला अधिक चौकशीसाठी सहा दिवसांची पोलिस कोठडी दिली. सुरुवातीच्या तपासात असे दिसून आले आहे की देविंदर आणि गुरप्रीत यांची पहिली भेट २०१७ मध्ये पुण्यातील एका लष्करी छावणीत प्रशिक्षणादरम्यान झाली होती. त्यानंतर, दोघेही संपर्कात राहिले आणि नंतर त्यांना सिक्कीम आणि जम्मू आणि काश्मीरमध्ये तैनात करण्यात आले. भारतीय सैन्यात असताना, दोघांनाही गोपनीय लष्करी साहित्य उपलब्ध होते, ज्यापैकी काही गुरप्रीतने लीक केल्याचा आरोप आहे. हेरगिरी नेटवर्कमधील देविंदरची नेमकी भूमिका अद्याप तपासाधीन असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## एसओजीएफ पश्चिम विभागाच्या अंतिम फेरीत तानाजी गारगोटे यांना ग्रँडमास्टरचा किताब देण्यात आला

पुणे- एसओजीएफ ने स्ट्रॅटेजिक गेमिंगसाठी तळागाळातील गती निर्माण करत असताना स्थानिक नेत्यांनी भारताच्या उदयोन्मुख मानसिक क्रीडा चॅम्पियनचा सन्मान केला. कडूस तालुक्यातील खेड येथील कडूस गावातील तानाजी गारगोटे यांनी नुकत्याच संपलेल्या एसओजी ग्रँडमास्टर्स सिरीज चॅम्पियनशिपमध्ये पश्चिम विभागासाठी इंडियन रमी ग्रँडमास्टरचा प्रतिष्ठित किताब मिळवला आहे. स्थानिक समुदायासाठी अभिमानास्पद क्षण म्हणून, चॅम्पियनच्या सन्मानार्थ एक सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता, जो ग्रामीण भारतातील कौशल्य-आधारित गेमिंगसाठी एक महत्त्वाचा टप्पा होता.

## शिक्षण, सक्षमीकरण आणि वारशाला पाठिंबा देण्यासाठी निधी संकलन कला प्रदर्शन

नवी दिल्ली- सॅव्हर फेअर कंपनी, हरिजन सेवा संघ (एचएसएस), भगवती चॅरिटेबल ट्रस्ट (बीसीटी) च्या विश्वस्त सुश्री लता गुल्लापल्ली, इंडियन आर्ट सर्कलच्या सुश्री गार्गी सेठ यांच्या सहकार्याने आर्ट फॉर होप हे विशेष कला प्रदर्शन आणि विक्री घेऊन येत आहेत. समाजात कायमस्वरूपी आर्थिक आणि सामाजिक परिणाम साधण्यासाठी निधी उभारणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. हे प्रदर्शन २४ जुलै ते २८ जुलै दरम्यान सेंटर फॉर कंटेम्पररी आर्ट, बीकानेर हाऊस, पंडारा रोड, नवी दिल्ली येथे भरवले जाईल.

## रॉयल स्टॅग बूमबॉक्स सादर करत आहे 'सिघ'

रॉयल स्टॅग बूमबॉक्स - युनिव्हर्सल म्युझिक ग्रुपच्या सहयोगाने तयार झालेला ब्रँडचा प्रमुख म्युझिक आयपी, आता रॉयल स्टॅग बूमबॉक्स ओरिजिनल्स या नव्या रूपात परत आला आहे. हे एक आगळंवेगळं फॉमट आहे ज्यात मेलोडी आणि हिप-हॉपचं अनोखं मिश्रण पाहायला मिळतं. पहले जैसी बात नहीं, हूडी, मोहब्बत आणि इम्तिहान यांसारख्या यशस्वी ट्रॅक्सनंतर, या सिझनचं पहिलं ओरिजिनल गाणं 'सिघ' प्रदर्शित होत आहे, ज्यामध्ये निकिता गांधी आणि डिनो जेम्स यांचं जबरदस्त कोलॅबोरेशन पाहायला मिळणार आहे.

## जुवेनाईल इडिओपॅथिक आर्थरायटिस (जेआयए) समजून घ्या

जुवेनाइल इडिओपॅथिक आर्थरायटिस (जेआयए) हा १६ वर्षांखालील मुलांमध्ये होणारा एक गंभीर आणि दीर्घकालीन ऑटोइम्यून आजार आहे ज्यामध्ये सांध्यांमध्ये सूज येते. हा फक्त शारीरिक वाढीमुळे होणारी दुखणी नसून एक गंभीर आजार आहे जो मुलांच्या शारीरिक वाढीवर, विकासावर आणि संपूर्ण जीवनमानावर परिणाम करू शकतो. वोक्हार्ट हॉस्पिटल नागपूर येथे बालरोगतज्ज्ञ सल्लागार म्हणून काम करत असताना, मला अनेकदा असे पालक भेटतात जे मुलांच्या सांधेदुखीला फारसं गंभीर समजत नाहीत. पण खरंतर मुलांच्या सांधेदुखीमागे एखादा ऑटोइम्यून आजार असू शकतो. या आजाराची सुरुवातीची लक्षणे लवकर ओळखल्यासवेळीच उपचार करून मुलाचे आयुष्य बदलू शकते.

## फिनो पेमेंट्स बँक ने महाराष्ट्रामध्ये युपीआय व्यवहार वाढवण्यासाठी गती खाते सुरू केले

छत्रपती संभाजीनगर, १६ जुलै २०२५ : बँकिंग प्रक्रिया सुलभ, सोपी आणि सोयीस्कर बनविल्यानंतर आता फिनो पेमेंट्स बँक नवीन खाते उघडल्यानंतर ग्राहक त्वरित व्यवहार करू शकतील यावर लक्ष केंद्रीत करत आहे. याच उद्देशाने फिनो पेमेंट्स बँकेने आज नवीन बचत खाते गती लॉन्च केल्याची घोषणा केली. गती या शब्दाचा अर्थ अनेक भारतीय भाषांमध्ये 'वेग' किंवा 'जलद' असा होतो. जे बँकिंग सेवा परवडणाऱ्या पद्धतीने डिजिटल प्लॅटफॉर्मवरून वापरू इच्छितात , विशेषतः अशा ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन हे उत्पादन तयार करण्यात आले आहे. भारतात डिजिटलायझेशन वेगाने वाढत असताना, हा ग्राहकवर्ग फिजिटल (भौतिक + डिजिटल) पद्धतीतून पूर्णपणे डिजिटल पद्धतीकडे वळण्यास तयार आहे, याला युपीआयचा वाढता स्वीकार अधिक गती देत आहे.

## युकेमध्ये जन्म झालेली कलाकार रमीत संधु टेलिव्हिजनवर

भारतीय सांस्कृतिक समृद्धी आणि भावनिक खोलीचे प्रतिबिंब असलेले क्रांतिकारी नॉन-फिक्शन फॉरमॅट्स सादर करण्याच्या आपल्या परंपरेला पुढे नेत, झी टीव्ही आता घेऊन येत आहे एक अत्यंत वेगळा आणि ताजातवाना रिॲलिटी शो - 'छोरियां चली गाँव'. हा शो इंडिया आणि भारत यांच्यातील दरी भरून काढतो, कारण यात ११ प्रसिद्ध स्वतंत्र महिलांना त्यांच्या जलदगती, लक्झरीशिवाय शहरी जीवनशैलीपासून दूर जाऊन ६० हून अधिक दिवस एका ग्रामीण भारतीय गावात राहतील. कोणतेही गॅझेट्स, सोयीसुविधा किंवा शॉर्टकट्स न घेता, या सहभागी महिला खऱ्या गावातील कामांमध्ये हातभार लावतील आणि गावातल्या ज्ञानात स्वतःला बुडवून घेतील.

## बापोद्रा चाळीत बदला घेण्यासाठी कादंबरीचे पुनरागमन!

मुंबई, जुलै १६, २०२५: 'सोनी सब'वरील 'पुष्पा इम्पॉसिबल' ही मालिका प्रेरणादायी कथानक आणि भावनिकदृष्ट्या समृद्ध पात्रांमुळे प्रेक्षकांमध्ये लोकप्रिय त आहे. पुष्पा (करुणा पांडे) कायद्याचा अभ्यास करण्याचे स्वप्न पूर्ण करत आहे, पण तिला नव-नवीन समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे तिच्या निश्चयाचीच नव्हे तर तिच्या जवळच्या नात्यांचीही कसोटी लागत आहे. नुकत्याच झालेल्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की, प्रोफेसर शास्त्री (गौरव चोप्रा) हे कादंबरी (बृंदा त्रिवेदी) विरुद्ध पुरावे गोळा करतात. त्यामुळे ती जेलमध्ये जाते.

## एण्ड टीव्ही वर येत आहे नवीन मालिका 'घरवाली पेडवाली'

भारतातील सर्वात लोकप्रिय विनोदी मालिका 'भाबीजी घर पर है' आणि 'हप्पू की उलटन पलटन'चे मनोरंजन देण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या एण्ड टीव्हीने कौटुंबिक मनोरंजनामध्ये अग्रगण्य म्हणून दर्जा स्थापित केला आहे. नाविन्यता आणि विनोदाची परंपरा कायम राखत एण्ड टीव्ही नवीन काल्पनिक मालिका 'घरवाली पेडवाली' सादर करण्यास सज्ज आहे. पेनिन्सुला प्रोडक्शन्सद्वारे निर्मित ही नवीन कौटुंबिक विनोदी मालिका अलौकिक शक्तीच्या ट्विस्टसह मनोरंजन देते, ज्यामधून प्रेक्षकांना आणखी एक संस्मरणीय मनोरंजन अनुभव मिळेल.

## माजी मंत्री स्वर्गीय अशोक पाटील डोणगावकर यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन करताना



खुलताबाद प्रतिनिधी गंगापूर खुलताबाद तालुक्याचे लोकनेते मुलुख मैदानी तोफ म्हणून ओळख असलेले माजी मंत्री अशोक पाटील डोणगावकर यांच्या निधनाने डोणगावकर कुटुंबीयांना दुःखातून सावरण्यासाठी महाराष्ट्रभरातील अनेक मान्यवरांनी डोणगाव येथील निवासस्थानी भेट घेऊन शांतवन केले.

गंगापूर तालुक्यातील डोणगाव येथील निवासस्थानी त्यांच्या कन्या , शेवगाव पाथर्डी मतदार संघाचे भाजपाच्या आमदार मोनिकाताई राजाळे छत्रपती संभाजी नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची उपाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर सर्व कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्यासाठी भगवंतानी शक्ती देवो. अशी प्रार्थना करण्यात आली याप्रसंगी सरला बेट येथील मठपती रामगिरीजी महाराज महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे वेरूळ नाथ आश्रम प्रमुख अक्का महाराज . छत्रपती संभाजी नगर भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे दैनिक तरुण भारत पत्रकार संतोष करपे पाटील धरम सिंग भीमरूट यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# बिबट्याचा हल्ला, चार शेळ्या ठार

तभा वृत्तसेवा

अजिंठा १७ जुलै

बिबट्याने केलेल्या हल्ल्यामध्ये चार शेळ्या जागीच ठार झाल्याची घटना सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास पिंपळदरी गावाजवळ घडल्याने गावात भीतीचे वातावरण आहे. शेतकरी आणि पशुपालक बिबट्याच्या दहशतीत जगत आहेत. गेल्या काही महिन्यांपासून धुमाकूळ घालणार्या बिबट्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे .

जंगलात आढळणारा बिबट्या अन्नाच्या शोधासाठी आता मानवी वस्तीमध्ये प्रवेश करू लागला आहे. गावाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये नागरिकांना बिबट्यांचे दर्शन झालेले आहे. मागील महिन्यात गावात घुसून शेख खलील शेख मुसा यांच्या तीन शेळ्या बिबट्याने फस्त केल्यानंतर पिंपळदरी वाडा येथे शिवाजी गव्हाडे व पद्माबाई कळवत्रे यांची भरदिवसा बिबट्याने शेताच्या बांधावर चरणाऱ्या शेळीवर अचानक हल्ला करून ठार केले होते . पिंपळदरी परिसरात बिबट्यांनी मोठ्या प्रमाणावर धुमाकूळ घातला होता. वन विभागाला अनेक वेळा या भागात पिंजरा लावून बिबट्या जेरबंद करण्यासाठी नागरिकांनी तक्रारी व मागणी केल्या होत्या . पण वन विभागाचे संबंधीत अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले होते. बिबट्याचे मुक्त संचारामुळे पुन्हा बिबट्याने धुमाकुल घालत सोमवारी दि. १४ मध्यरात्री बिबट्याने पिंपळदरी येथील कौतिक केशवराव गव्हाणे

यांच्या घरालगत असणार्या गोठ्यात बांधलेल्या चार शेळ्यांवर बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यात तीन शेळ्या जागीच ठार . तर एक शेळीला घेऊन पसर केल्या चे मंगळवारी दि. १५ रोजी सकाळी उघडकीस आल्याने .घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण पसरले आहे, कारण बिबट्या मानवी वस्तीजवळ फिरत असल्याने नागरिकांमध्ये भीती आहे.

ग्रामस्थांनी या घटनेची माहिती वन विभागाच्या अधिकार्यांना दिली.या घटनेची माहिती मिळताच वन घटनास्थळी दाखल झाले त्यांनी मृत शेळ्यांचा पंचनामा केला. बिबट्याच्या हल्ल्यत चार शेळ्या दगावल्याने कौतीक गव्हाणे यांचे ७० ते ८० हजार रुपयाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांना वन विभागाने तातडीने नुकसान भरपाई द्यावी व बिबट्यास पकडण्यासाठी सदर परिसरात तातडीने पिंजरा लावावा, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांनी केली आहे.

### फर्दापूर शिवारात बिबट्याने केली माकडाची शिकार

फर्दापूर शिवारात गट नंबर २४४ मध्ये आसिप शेख यांच्या शेतात बिबट्याने शिकार करून शेतात माकडाला केले फस्त गुरूवारी शेतकरी शेतात गेला असता येथे बिबट्या आणि माकड यांच्या मोठ्या प्रमाणात झटापट झाली असून येथील मका आणि कापूस यांचे नुकसान झाले आहे तरी आसिप यांनी वनविभागाचे कर्मचारी यांना सांगितले त्यानंतर वनरक्षक देवकर वनमजूर भास्कर शहाणे, जावेद शेख यांनी घटनास्थळी भेट देवून माकड यास घेऊन गेले आणि त्यास जमीनीत पुरुन टाकले

## त्रिशूल हे सेवा सुरक्षा आणि संस्कार याचे प्रतीक - संजय आप्पा बारगजे

### विश्व हिंदू परिषद बजरंगदला तर्फे त्रिशूल वाटप कार्यक्रम संपन्न



तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर - त्रिशूल म्हणजे सेवा सुरक्षा संस्कार याची तीन प्रतीके असून सेवेच्या माध्यमातून जे ख्रिश्चन मिशनरी मोठ्या प्रमाणात धर्मांतर करीत आहेत ते थांबवताना कुणी अंगावर येत असेल तर वापरणे, लव जिहाद, जिहादी प्रवृत्तींना जशास तसे उत्तर देण्यासाठी आणि तिसरे आहे संघटनेचे काम करत असताना दिलेल्या संस्काराच्या चौकटीत राहून काम करण्यासाठी असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेत देवगिरी प्रांत अध्यक्ष संजय अप्पा बारगजे यांनी केले ते विश्व हिंदू परिषद बजरंग दलातर्फे दिनांक १६ जुलै रोजी सायंकाळी साडेसहा वाजता खडकेश्वर महादेव मंदिरात आयोजित केलेल्या त्रिशूल वाटप कार्यक्रमात बोलत होते यावेळी व्यासपीठावर विश्व हिंदू परिषद महानगर अध्यक्ष सुशील जी भारुका राजीव जहागीरदार बजरंग दलाचे चंद्रकांत घोलप काशिनाथ दाबके सुनील चावरे पद्मनाभ गुरुजी अभिषेक कादी उपस्थित होते

यावेळी बोलताना संजय आप्पा बारगजे पुढे म्हणाले दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात बजरंग दलाचे शौर्य संचलन प्रत्येक जिल्ह्यात निघते परंतु यावर्षी संपूर्ण देवगिरी प्रांताचे शौर्य संचालन संभाजीनगर येथे होणार असून या संचलनाच्या माध्यमातून वेरूळ जवळ छत्रपती संभाजी महाराजांचे भव्य स्मारक उभे करावे अशी मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले

त्रिशूल वाटप कार्यक्रमात सुरुवातीला दीप प्रज्वलन आणि भारत माता पूजन झाल्यानंतर बजरंग दल महानगर संयोजक अक्षय जोशी यांनी सर्व बजरंगी ना शपथ दिली

व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते सर्व बजरंगींना त्रिशूल वाटप करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बजरंगी शुभम पठाडे आणि आभार प्रदर्शन ओम घोडके यांनी केले

## कांदा मार्केटमध्ये शेतकरी तसेच मजुरांची पिळवणूक होऊ नये, आ. बंब यांचा बाजार समितीला आदेश

छत्रपती संभाजीनगर : कांदा मार्केटमध्ये शेतकरी तसेच मजुरांची कुठल्याही प्रकारची आर्थिक शारीरिक व मानसिक पिळवणूक होऊ नये याची खबरदारी घ्या. असा स्पष्ट आदेश आमदार प्रशांत भाऊ यांनी बाजार समिती सभापती, संचालक मंडळाला दिला आहे. लिलावा दरम्यान वाहनातून खाली पडलेला कांदा पुन्हा वाहनात भरून देण्यासाठी काही एजंट शेतकऱ्याकडून पैसे घेऊन मजुरांना देत होते. त्या पैशातून काही ठराविक रक्कम ते स्वतः ठेवून घेत होते. सदर प्रकार आमदार बंब यांना येथे काम करणाऱ्या मजुरांनी लक्षात आणून दिला होता.

लासुर स्टेशन कृषी उत्पन्न बाजार समितीचे वैजापूर रस्त्यावर कांदा मार्केट आहे. या ठिकाणी कांदा विक्री करण्यासाठी दररोज सरासरी सहाशे ते सातशे वाहन दाखल होतात. या वाहनांसाठी स्वतंत्र वहानतळ आहे. पहाटे दाखल झालेली वाहने दुपारपर्यंत, दुपारनंतर आलेली वाहने सायंकाळी कांदा खाली करून परत जातात. लिलावा दरम्यान या वाहनातून खाली काढलेले कांदे पुन्हा भरण्यासाठी मजुरांची मदत घ्यावी लागते. मजुरीच्या दरावरून शेतकरी व व्यापाऱ्यांमध्ये अनेक वेळा वादाचे प्रसंग घडले आहे. काही वेळा जबर मारहाणीच्या घटनाही घडल्या आहे. यावर अद्यापही कायमस्वरूपी तोडगा निघाला नाही. बाजार समितीने ठरवून दिलेल्या दराची अंमलबजावणी करायला मुजराकडून विरोध केला जातो. वाहनात कांदा भरणारे मजूर व कांदा उत्पादक शेतकऱ्यात मजुरी देण्याघेण्यावरून सतत वाद होत असल्याने काही जबाबदार लोकांनी बाजार समितीच्या परस्पर मार्ग काढला. त्यामुळे शेतकरी मजुरांची सोय होण्याऐवजी त्यांची आर्थिक लूट सुरू झाली होती सदर प्रकार काही जणांनी आमदार प्रशांत बंब यांना सांगितला त्यावर त्यांनी तात्काळ सभापती संचालक मंडळाला कांदा उत्पादक शेतकरी तसेच मजुरांकडून कमिशन घेण्याचा प्रकार तात्काळ बंद करण्याच्या सूचना दिल्या.

## सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, येथे जागतिक प्लास्टिक सर्जरी दिवस साजरा



छत्रपती संभाजीनगर - सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील प्लास्टिक सर्जरी विभाग, प्लास्टिक सर्जरी असोसिएशन, खच- महाराष्ट्र -चड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक प्लास्टिक सर्जरी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून बुलढाणा वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कैलास झिने, महात्मा गांधी वैद्यकीय महाविद्यालयाचे उपाधिष्ठाता व सर्जरी विभागाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण सूर्यवंशी, महाराष्ट्र प्लास्टिक सर्जरी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. जितेन कुलकर्णी, उपाधिष्ठाता डॉ. विनोद मुंदडा, डॉ. गायत्री तडवळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

वैद्यकीय विद्यार्थी, प्लास्टिक सर्जन आणि विविध विभागप्रमुखांनी हितगुज या चर्चासत्रात उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्लास्टिक सर्जरी विभागाच्या प्रमुख डॉ. उज्वला दहिफळे यांनी केले. त्या म्हणाल्या, प्लास्टिक सर्जरी म्हणजे केवळ चेहरा बदलणे किंवा भाजल्यावर त्वचा चिटकवणे नाही, तर ही एक प्रगत, वैज्ञानिक आणि कलात्मक शाखा आहे. 'प्लास्टिक' हा शब्द ग्रीक भाषेतील 'प्लास्टिकोस' या शब्दावरून घेतला असून, त्याचा अर्थ 'आकार देणे' असा होतो. भारतीय शास्त्रज्ञ सुश्रुत यांनी प्राचीन काळातच पुनर्निर्माण शस्त्रक्रियेचे वर्णन केले असून, आजची प्लास्टिक सर्जरी ही त्याच परंपरेचा आधुनिक विस्तार आहे.

तसेच, त्या म्हणाल्या, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये रुग्णांची संख्या सतत वाढत असून, अधिष्ठाता डॉ. सुक्रे व डॉ. वैशाली उणे यांच्या मार्गदर्शनाखाली आमची टीम उत्कृष्ट सेवा देत आहे. घाटी हॉस्पिटलमधील मोफत औषधोपचारामुळे आमच्या शस्त्रक्रिया अधिक परिणामकारक होतात.

जागतिक प्लास्टिक सर्जरी दिवस साजरा करण्यासाठी प्लास्टिक सर्जन्स डॉ. रमाकांत बेंबडे, डॉ. मंगेश तांदळे डॉ. राम चिलगर डॉ. अनुराधा पाटील डॉ. अमित पाटील डॉ. मयूर गोकलानी डॉ. आशिष कासट डॉ. चैतन्य पाटील डॉ. तायडे डॉ. सचिन जंगले डॉ. जाकीर मोमीन डॉ. व्यंकटेश कुलकर्णी डॉ. अभिजीत गजभरे डॉ. राजा, डॉ. गुरमीत सिंग यांनी सहकार्य केले.

## आ. अब्दुल सत्तार यांनी अल्पसंख्याक विकास मंत्री ना.दत्ता मामा भरणे यांची घेतली भेट



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१७ जुलै

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ मार्फत मंजूर करण्यात आलेल्या मुदत कर्ज योजनेच्या लाभार्थी यांना कर्जाची रक्कम वितरित करण्यासंदर्भात माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार यांनी मुंबई येथे अल्पसंख्याक विकास मंत्री ना.दत्ता मामा भरणे यांची भेट घेवून याबाबत पाठपुरावा केला.त्यावर मंत्री दत्ता भरणे यांनी तातडीने दखल घेत मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व अल्पसंख्याक बोर्डाला बैठकीचे निर्देश देवून सदरील विषय तातडीने मार्गी लावण्यासाठी आवश्यक कारवाई करण्याचे आदेश दिले.

आमदार अब्दुल सत्तार यांच्या पाठपुराव्यामुळे राज्यातील प्रलंबित कर्ज प्रकरणातील लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

अल्पसंख्यांक विकास विभागातर्फे मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत वर्ष २०२४-२५ आणि २०२५-२६ अंतर्गत विविध योजनेचे कर्ज मंजूर करून मंजूरी पत्र देण्यात येऊन त्यांच्या सातबारा मिळकतीवर बोजा देखील चढविण्यात आलेला आहे,परंतु प्रत्यक्षात त्या लाभार्थीना कर्जाची रक्कम अद्याप देण्यात आली नसल्याने लाभार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याबाबत लाभार्थ्यांच्या वारंवार तक्रारी येत आहे.ही बाब आमदार अब्दुल सत्तार यांनी अल्पसंख्याक मंत्री ना.दत्ता भरणे यांच्या निदर्शनास आणून दिली.त्यामुळे वर्ष २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या मुदत व शैक्षणिक कर्जाची रक्कम लाभार्थ्यांना वितरित करण्यासाठी संबंधितांना आदेशीत करावे अशी मागणी आमदार अब्दुल सत्तार यांनी केली.याबाबतचे पत्र देखील त्यांनी मंत्री दत्ता भरणे यांना दिले.

यावर अल्पसंख्याक विकास मंत्री ना.दत्ता भरणे यांनी सकारात्मक दखल घेत संबंधित यंत्रणेला बैठकीचे निर्देश देवून सदरील विषय तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश अल्पसंख्याक विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

**मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत ज्यांचे कर्ज मंजूर होवून त्यांच्या सातबारा व मिळकतीवर बोजा चढविलेला आहे मात्र त्यांना अद्याप कर्जाचे वितरण झालेले नाही अशा लाभार्थ्यांना तातडीने कर्ज वितरणासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.आशा लाभार्थ्यांना लवकरच कर्ज पुरवठा होणार आहे.त्यामुळे लाभार्थ्यांनी कुणाच्याही भूलथापांना बळी पडू नये,दलालांपासून सावध रहावे**

**- आमदार अब्दुल सत्तार**

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात करिअर संसदेची स्थापना



सोयगाव,दि.१७ जुलै - येथील अजिंठा शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील करिअर कट्टा उपक्रमातंर्गत जागतिक युवा दिनानिमित्त करिअर संसदेची स्थापना करण्यात आली.यावेळी करिअर संसदेच्या कृष्णा विनोद राठोड, गिरीश प्रभाकर नागपुरे,ऋषिकेश संतोष सहाने,मुस्कान खलील पठाण,राजरत्न भरत पगारे,आकाश रवींद्र राठोड, अश्विनी कैलास साळवे,पल्लवी योगेश बोखारे,नंदनी राहुल बिऱ्हारे आदी पदाधिकाऱ्यांना प्राचार्य डॉ.शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे व जिल्हा समन्वयक प्रा. श्रीकृष्ण परिहार यांनी पद व शिस्त पालनाची शपथ दिली. शपथविधी कार्यक्रमानंतर प्राचार्य डॉ. शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,आयक्यूएसी समन्वयक डॉ. प्रमोद पवार,जिल्हा समन्वयक प्रा.श्रीकृष्ण परिहार यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करिअर कट्टा समन्वयक डॉ.ज्योती आधाने यांनी तर आभार करिअर कट्टा समन्वयक डॉ.मनोजकुमार चोपडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी डॉ.भास्कर टेकाळे,डॉ.पांडुरंग डापके, डॉ.पंकज गावित,डॉ.संतोष तांदळे,प्रा.गणेश गायकवाड यांच्यासह महाविद्यालयातील इतर शिक्षक व शिक्षणेत्तर कर्मचार व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आयुष. जाधवचे ऑलम्पिक याड स्पर्धेत यश



सिल्लोड प्रतिनिधी

शहरातील लिटल मंडल स्कूल शाळेतील विद्यार्थी आयुष जाधव यांनी ओलंपियाड स्पर्धेत प्रथम क्रमांक घेऊन दणदणीत यश मिळवले आहे त्याच्या यशाबद्दल शाळेचे संस्थापक रवींद्र पाटील व विविध स्तरातून त्या छोट्या मुलाला शुभेच्छा वर्षाव होत आहे

## खरेदी विक्री संघाच्या सभापती पदाची माळ कोणाच्या गळ्यात ?

### सभापती पदासाठी आकाश बोलधने यांचे नाव चर्चेत



तभा वृत्तसेवा

कन्नड दि.१७ जुलै :- कन्नड येथील खरेदी विक्री संघाची निवडणूक नुकतीच पार पडली असून सभापती पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार आहे याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे

कन्नड खरेदी विक्री संघाची निवडणूक ही सर्वपक्षीय बिनविरोध होत असते पण यंदा या निवडणुकीस प्रतिष्ठेची निवडणूक बनवत राजकीय नेत्यांनी मैदानात उडी घेतली होती,आमदार संजना जाधव यांच्या शिवशाही शेतकरी विकास पॅनल'ने सर्व पंधरा जागांवर विजय मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. आता संघाच्या पुढील कार्यकालात सभापतीपदासाठी कोणाची निवड होणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

नुकतेच विजयी झालेले आकाश बोलधने यांचे नाव तालुक्यात सभापती पदासाठी चर्चेत असुन त्यांना संधी मिळणार की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, नगरसेवक, विविध सोसायट्यांचे चेअरमन स्व.शिवाजीराव आबा बोलधने यांचे आकाश बोलधने हे सुपुत्र आहेत,त्यामुळे त्यांना राजकीय वारसा लाभलेला असून त्यांचा स्वभाव सर्वसमावेशक आहे.त्यामुळे त्यांचे नाव चर्चेत असून आमदार संजना जाधव काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

**(मा. शेख साहेब यांच्या कोर्टात)**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४७९/२०२५

संगीता भ्र.शिवाजी बड़क व इतर

विरुध्द

निरंक

प्रकरण - वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत शिवाजी रघुनाथ बडक दि.०२/०४/२०२५ रोजी मौजे रांजणगाव शेणपुंजी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन अर्जदार नं. १. संगीता भ्र.शिवाजी बडक, २. अनिता भ्र.हरिदास सोमदे, रा.कविटखेडा, पाथी, औरंगाबाद ३. अमोल पिता शिवाजी बडक, ४. विशाल पिता शिवाजी बडक, अर्जदार नं. १. ३ आणि ४ रा.शिवनेरी कॉलनी, रांजणगाव शेणपुंजी, ता. गंगापुर जि.औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड. श्री.बी.पी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि. १५/०७/२०२५

आदेशावरून

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## जाहीर समन्स/नोटीस

**मा. जिल्हा न्यायाधिश साहेब न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद**

म.सी.ए.नं.२३/२०२५

निशाणी क्रमांक-

फुलचंद शामलाल कोकरे व इतर

विरूध्द

जिजाबाई व इतर

प्रति,

गैरअर्जदार क्र. २) सौ. सुनिता संजय सारंगधर, वय २९ वर्षे, ३) सौ. प्रतिभा प्रदीप साळुंके, वय २६ वर्षे, ४) सौ. कविता शशिकांत बारगळ, वय २३ वर्षे, ५) सौ. प्रिती राजु प्रधान, वय २० वर्षे, सर्वाचा धंदा शेती, सर्व रा. धामोरी खु. ता. गंगापुर जि. औरंगाबाद

ज्याअर्थी उक्त अपीलार्थी यांनी तूमच्या विरुध्द किरकोळ दिवाणी अपील या न्यायालयात बाद दाखल केलेल आहे म्हणून सदर अपीलाचे संदर्भात लेखी म्हणणे मांडण्यासाठी व उक्त अपीलार्थी यांनी तूमच्या विरुध्द स्थगिती/मनाई आदेश मिळणे करीता अर्ज दाखल केलेला आहे त्यावर म्हणणे दाखल करणेसाठी दिनांक ०२/०८/२०२५ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता या न्यायालयात आपण जातीने किंवा ज्यास यथायोग्य सुचना दिलेल्या असून जो वादा संबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नाची उत्तरे देऊ शकेल अशा किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारी व्यक्ती त्याच्या बरोबर असेल अशा वकिलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे वोलविण्यात येत आहे व तुमच्या हजेरीसाठी ठरविलेला दिवस वादाच्या अंतिम निर्णयासाठी नेमलेला दिवस असल्यामुळे तुमच्या बचावाच्या पुष्ठ्यर्थ तुम्ही ज्या साक्षीदारांचा व ज्या दस्ताऐवजांचा आधारे घेवू ईच्छीता ते सर्व दस्ताऐवज त्या दिवशी हजर करण्याची तुम्हाला तयारी ठेवावी लागेल.

तुम्हाला नोटीस देण्यात येते की, उपरोक्त दिवशी हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजरीत वादाची सुनावणी होवून निर्णय दिला जाईल याची दखल घ्यावी.

तसेच तुम्हाला अशी ही नोटीस देण्यात येते की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास, तुमचा बचाव रद्द होण्यास पात्र ठरेल.

आज दि.१७ माहे जुलै २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

क. लिपिक — न्यायालयीन अधिक्षक

जिल्हा न्यायालय, गंगापुर

# अजिंठा लेणी परिसरात पर्यटकांना बिबट्याचे दर्शन ; व्हिडिओ सोशल मीडियावर !

तभा वृत्तसेवा
अजिंठा दि, १७ जुलै

जगप्रसिद्ध अजिंठा लेणी परिसरात पर्यटकांना मंगळवारी दुपारी सुमारे अर्धातास बिबट्याचे दर्शन झाले. या बिबट्याचा अर्धातास मुक्त संचार पाहून पर्यटकांचा आनंद द्विगुणित झाला .



पावसाळ्याला सुरुवात झाली असून जूनमध्ये झालेल्या पावसाने अजिंठ्याचा डोंगर हिरवा होण्यास सुरुवात झाली आहे. याकाळात पर्यटक मोठ्या संख्येने लेणी बघण्यास येतात. याकाळात पर्यटकांना अजिंठ्यांच्या राखीव जंगलातील नीलगाय, हरीण, मोर, ससे, रानडुक्कर व कधीकधी अस्वल, बिबट्याचे दर्शन होते. पण जंगलातून बिबट्या अचानक लेणी परिसरात अवतरला. हा बिबट्या सुमारे अर्धातास डोंगराच्या कडेवर संचार करीत होता. त्याच्या मुक्त संचारामुळे पर्यटकांना रोमांच, थरार, भीती व आनंद एकाचवेळी अनुभवण्यास मिळाला आहे .

व्हायरल :व्हिडीओमध्ये : बिबट्या लेणी परिसरात फिरतांना दिसत आहे. विषेशत: अजिंठा लेणीत परिसरात पर्यटकांची दिवसभर गर्दी होते. अचानक एका पर्यटकाला झाडी – झुडपात बिबट्या दिसतो.तो सर्वांना दाखवतो बिबटा दिसताच पर्यटक गर्दी करतात .जंगल परिसर असल्याने बिबट्याचा वावर पर्यटकांसाठी धोकादायक ठरू शकतो . बिबट्याचे जवळून दर्शन झाले . काहीं पर्यटकांनी हिंमत करून हे क्षण मोबाइलमध्ये कैद करून व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केलाअसून अजिंठा लेणी परिसरात दिवसा बिबट्याचा मुक्त संचार असल्याने सुरक्षेची काळजी व्यक्त केली जात आहे.

पिंपळदरी परिसरात बिबट्याने घुमाकुळ घालत चार शेळ्या फस्त केल्या परिसरातील नागरिकांनी बिबट्या जेरबंद करण्यासाठी पिंजरे लावण्याची मागणी केली होती . तोच बिबट्या अजिंठा लेणी पर्यटकांना दिसून आला .

गेल्या दोन दिवसांपासून अजिंठा येथील वाघुरनदी जवळ बिबट्यांचा वावर असल्याच्या गावातील काही मुलांना दिसून आला .सध्या सोशल मीडियावर या घटनेचा व्हिडिओ व्हायरल होत आहे . वारंवार बिबट्याचे दर्शन झाल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गावाजवळ मुक्त संचार करत असल्याच्या

चर्चेने अजिंठ्याकरांची झोप उडाली आहे. शेतात काम करणाऱ्या मजूर आणि शेतकऱ्यांमध्ये घबराट पसरली असून शेतीच्या कामासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. वाघुर नदीकाठाचा हा भाग जंगल परिसर क्षेत्र आहे. या परिसरात दिवसा बिबट्या फिरताना दिसल्याने, स्थानिक मुलांनी त्याचे व्हिडिओ मोबाईलमध्ये काढले .आणि ते खबरदारी म्हणून,सोशल मीडियावर व्हायरल केले. यामुळे, या भागातील लोकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाने परिसरात पाहणी करून पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे अशी मागणी होऊ लागली आहे .

# हिंगोली नगरपरिषद, हिंगोली

## सुचना

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार

क्रमांक. हि.न.प./फेरबदल-३७/आरक्षण-३२/११६८ दि. १४/०७/२०२५.

क्रमांक ज्याअर्थी, हिंगोली नगरपरिषद शहराची दुसरी सुधारीत विकास योजना शासन नगर विकास विभागाची अधिसुचना टिपीएस-३११८/१३९६/प्र.क्र.-१३६/२०१८/नवि-३० दिनांक १० फेब्रुवारी २०१९ अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दिनांक १३ जुन २०१९ पासून अंमलात आली आहे. तसेच उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टिपीएस-३१२०/२९६/प्र.क्र.-४२/२०२०/नवि-३० दिनांक ०५ मार्च २०२१ रोजी मंजूर झाली असून दि. २३ एप्रिल २०२१ पासून अंमलात आली आहे.

आणि ज्याअथी, मौ. हिंगोली स.नं.३७ भाग चे क्षेत्र हे मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र.३२ LIG HOUSING एकुण क्षेत्रफळ-२.८२ हे. करीता दर्शविण्यात आले आहे. आवेदकाचे दि. २४ जून २०२५ रोजीचे अर्जानुसार, हिंगोली नगरपरिषद ठराव क्र. ४२५, दि.११ जुले २०२५ अन्वये, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) नुसार मंजूर विकास योजनेत फेरबदल करण्यास आणि त्याप्रमाणे सर्व वैधानिक कार्यवाही प्रशासनामार्फत करणेबाबतचा ठराव मा. प्रशासक, हिंगोली नगरपरिषद यांनी पारित केला आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख प्रस्तावित फेरबदल असा करण्यात आला आहे);

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) नुसार मंजूर विकास योजनेत वापर विभागात करावयाचा फेरबदल खालीलप्रमाणे दर्शविला आहे.

| अ.क्र | सर्वे क्रमांक गावाचे नाव | मंजूर विकास योजनेप्रमाणे आरक्षणाचे नाव आणि क्रमांक | विचाराधीन क्षेत्र | प्रस्तावित प्रमाणे फेरबदलानंतर अनुज्ञेय होणारा जमीन वापर विभाग |
|---|---|---|---|---|
| १. | मौ. हिंगोली स.नं.३७ भाग | आरक्षण क्र.३२ LIG HOUSING | २.८२ हे. | सार्वजनिक-निमसार्वजनिक वापर विभाग |

आणि त्याअथी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) नुसार मंजूर विकास योजनेत उपरोक्त प्रमाणे 'प्रस्तावित फेरबदल' करण्याच्या अनुषंगाने हि सुचना नागरीकांकडून सुचना/आक्षेप मागविणेकरीता प्रसिद्ध करण्यात येत आहे. 'प्रस्तावित फेरबदल' दर्शविणारा भाग नकाशा, हिंगोली नगरपरिषद, हिंगोली येथे सुचनाफलकावर जनतेच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे, प्रस्तावित फेरबदलाबाचत नागरीकांना सुचना/आक्षेप असल्यास हि सुचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात आणि वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून ३० (तीस) दिवसांचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयास द्याव्यात. नमुद कालावाधीत प्राप्त होणाऱ्याच सुचना/आक्षेप हिंगोली नगरपरिषदेमार्फत विचारात घेण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
प्रभासक
तथा
मुख्याधिकारी,
हिंगोली नगर परिषद

# लवाद न्यायाधिकरण

(लवाद अधिकारी - ॲड. अजित एम. देशमुख, एम.ए. मराठी, एम.ए (एम.सी.जे). एम.कॉम., एल.एल.बी)

एकल लवाद न्यायालय

**लोकमंगल मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटी लि. सोलापूर**

प्लॉट नं. ९४/६६, मित्र नगर, रब्बी रिसर्च सेंटरचे मागे, शेळगी, सोलापूर-४१३००६

## जाहिर प्रगटन जिल्हा - हिंगोली, नांदेड, जालना, परभणी, बीड

या जाहिर नोटीसीने खाली दिलेल्या सामनेवाले यांना कळविण्यात येते की, दावेदार **लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी लि., सोलापूर** या संस्थेने खाली नमुद कर्जदार, जामीनदारांविरुध्द थकीत कर्जाची रक्कम वसुली अवॉर्ड मिळणेकामी लवाद न्यायालयाकडे दावे दाखल केले असून, कर्जदार जामीनदार यांनी दिलेल्या अधिकृत, नोंद पत्यावर लवाद न्यायालयाकडून पाठविलेल्या (आर.पी.ए.डी.ने) लवाद दाव्याचे नोटीसा रजिस्टर पोस्टाने न बजावता परत आले आहे.

न्यायाच्या दृष्टीने संबंधित कर्जदार व जामिनदारांना योग्य संधी देऊन न्याय निवाडा करणेकामी ही जाहिर नोटिस प्रसिध्दीस दिली आहे. खालील नमूद सामनेवाले यांनी पुढील निर्देशित तारखेपूर्वी दि. ३०/०७/२०२५ रोजी अथवा तारखेस वर नमूद पत्यावर लवाद न्यायालयासमोर उपस्थित राहून लेखी म्हणणे न मांडल्यास एकतर्फी न्यायनिवडा करण्याचे सुचित करत आहे.

| अ. क्र. | लवाद दावा क्र. व दिनांक | नाव | | शाखा | पत्ता | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लवाद दावा क्र. ६१/२०२१ ३०/०७/२०२५ | आप्पाराव प्रतापराव नितनवरे | कर्जदार | औंढा नागनाथ विलिनिकरण कळमनुरी | रा. मु.पो. मूर्तीजापूर, सावंगी, ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली - ४३१७०५ | २४,२८३/- |
| | | राजू विठ्ठल खदारे | जामिनदार | | रा. मु.पो. १३०३, सिध्दार्थ नगर, ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली - ४३१७०५ | |
| | | रवी रूखमाजी वाठ (मयत) किरण रवी वाठ | जामिनदार | | रा. मु.पो. जिरे गल्ली, ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली - ४३१७०५ | |
| २ | लवाद दावा क्र. ०२/२०२३ ३०/०७/२०२५ | अनिल हनुमंतराव मस्के | कर्जदार | हिंगोली विलीनिकरण कळमनुरी | रा. मु.पो. शिवणी, मोक, ता. पुसद, जि. यवतमाळ - ४४५२०४ | ३,१८,८७२/- |
| | | बबन हारजी गडदे | जामिनदार | | रा. मु.पो. खेडी, ता. जि. हिंगोली - ४३१५१३ | |
| | | रवीचंद्र शिवाजी चव्हाण | जामिनदार | | रा. मु.पो. खेडी, ता. जि. हिंगोली - ४३१५१३ | |
| | | गोकुळ माऊली शुगर्स लि., तर्फे कार्यकारी संचालक व्ही.पी. शुगर्स लि. | जामिनदार | | रा. सिध्दा कस्तुरी चेंबर्स, पहिला मजला, मंत्री चंडक विहार, इसार पेट्रोल पंप पाठीमागे, आसरा चौक, होटगी रोड, जि. सोलापूर -४१३२२४ | |
| ३ | लवाद दावा क्र. १५/२०२३ ३०/०७/२०२५ | लताबाई गोविंदराव जाधव | कर्जदार | कळमनुरी | रा. सिंगवी नाका, ता. सेनगाव, जि. हिंगोली - ४३१५४२ | ५,९५,२७४/- |
| | | गोविंदराव नारायण जाधव | जामिनदार | | रा. सिंगवी नाका, ता. सेनगाव, जि. हिंगोली - ४३१५४२ | |
| | | आशीष कचरू घाटोळ | जामिनदार | | रा. १७४, महावीर नगर परिसर, ता. पुसद, जि. यवतमाळ - ४४५२०४ | |
| ४ | लवाद दावा क्र. २८/२०२३ ३०/०७/२०२५ | गोविंदा नागोजी जगताप | कर्जदार | हिंगोली विलीनिकरण कळमनुरी | रा. मु.पो. भांडेगाव, ता. जि. हिंगोली - ४३१५१३ | ३,२६,८९८/- |
| | | किसन दत्ताराव जगताप | जामिनदार | | रा. मु.पो. भांडेगाव, ता. जि. हिंगोली - ४३१५१३ | |
| | | नारायण नामाजी धजे | जामिनदार | | रा. जि.प. के.प्रा. शाळा, गोरेगाव, ता. सेनगाव, रामकृष्ण नगर, अकोला रोड, जि. हिंगोली - ४३१५४२ | |
| ५ | लवाद दावा क्र. ३०/२०२३ ३०/०७/२०२५ | गौरव एन्टरप्रायझेस स्टील ॲन्ड गिफ्ट श्री. मधुकर रमेशराव बडवे | कर्जदार | घनसांगवी विलीनिकरण परभणी | रा. मु.पो. चिंचाळी, ता. घनसावंगी, जि. जालना - ४३१२०९ | ३,७४,६५९/- |
| | | संजय काशीनाथ वराडे | जामिनदार | | रा. मु.पो. चिंचाळी, ता. घनसावंगी, जि. जालना - ४३१२०९ | |
| | | अंभारे लक्ष्मण पांडुरंग | जामिनदार | | रा. मु.पो. चिंचाळी, ता. घनसावंगी, जि. जालना - ४३१२०९ | |
| ६ | लवाद दावा क्र. ०१/२०२३ ३०/०७/२०२५ | मनोहर शंकर बेंद्रिकर | कर्जदार | देगलुर विलीनिकरण उदगीर | रा. मु.पो. बेंद्री, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७०९ | ५,२५,८८२/- |
| | | शिवसाम मनोहर बेंद्रिकर | जामिनदार | | रा. मु.पो. बेंद्री, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७०९ | |
| | | माधव मनोहर बेंद्रिकर | जामिनदार | | रा. मु.पो. बेंद्री, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७०९ | |
| | | गोकुळ माऊली शुगर्स लि. तर्फे कार्यकारी संचालक व्ही.पी. शुगर्स लि. | जामिनदार | | रा. सिध्दा कस्तुरी चेंबर्स, पहिला मजला, मंत्री चंडक विहार, इसार पेट्रोल पंप पाठीमागे, आसरा चौक, होटगी रोड, जि. सोलापूर - ४१३२२४ | |
| ७ | लवाद दावा क्र. ०३/२०२३ ३०/०७/२०२५ | लक्ष्मण विठ्ठल मावले | कर्जदार | नांदेड विलीनिकरण मुदखेड | रा. मु.पो. साठे नगर, मांजराम, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७२२ | १,८८,७४४/- |
| | | हरी किशन सांळुखे | जामिनदार | | रा. मु.पो. मांजराम, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७२२ | |
| | | बालाजी लालू मेंटकर | जामिनदार | | रा. मु.पो. मांजराम, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७२२ | |
| | | गोकुळ माऊली शुगर्स लि. तर्फे कार्यकारी संचालक व्ही.पी. शुगर्स लि. | जामिनदार | | रा. सिध्दा कस्तुरी चेंबर्स, पहिला मजला, मंत्री चंडक विहार, इजर पेट्रोल पंप पाठीमागे, आसरा चौक, होटगी रोड, जि. सोलापूर - ४१३२२४ | |
| ८ | लवाद दावा क्र. ०५/२०२३ ३०/०७/२०२५ | अहमद रजाक सय्यद | कर्जदार | देगलुर विलीनिकरण उदगीर | रा मु पो. टेंभुर्णी, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७२२ | ४,१६,३०३/- |
| | | रमेश विश्वनाथ कांबळे | जामिनदार | | रा. मु.पो सहयोग नगर, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७२२ | |
| | | सलीम सय्यद अली सय्यद | जामिनदार | | रा. मु.पो. टेंभुर्णी, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७२२ | |

| अ. क्र. | लवाद दावा क्र. व दिनांक | नाव | | शाखा | पत्ता | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | | रजाक महबुबसाब सय्यद | जामिनदार | | रा. मु.पो. टेंभुर्णी, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७२२ | |
| | | गोकुळ माऊली शुगर्स लि., तर्फे कार्यकारी संचालक व्ही.पी. शुगर्स लि. | जामिनदार | | रा. सिध्दा कस्तुरी चेंबर्स, पहिला मजला, मंत्री चंडक विहार, इसार पेट्रोल पंप पाठीमागे, आसरा चौक, होटगी रोड, जि. सोलापूर - ४१३२२४ | |
| ९ | लवाद दावा क्र. ०७/२०२३ ३०/०७/२०२५ | आंबटवाड विलास बळीराम | कर्जदार | उदगीर | रा. मु. टाकळगाव पो., काकांडी, ता. लोहा, जि. नांदेड - ४३१७११ | १,३६,३८२/- |
| | | पाटील व्यंकट मोतीराम | जामिनदार | | रा. मु.पो. किनी (कदु) ता. अहमदपूर, जि. लातूर - ४१३५१४ | |
| | | पांढरे दत्तराम माधवराव | जामिनदार | | रा. मु.पो. कोठाळा, ता. नायगाव, जि. नांदेड - ४३१७१२ | |
| १० | लवाद दावा क्र. ०९/२०२३ ३०/०७/२०२५ | शुभांगी गुलाबराव किरडे | कर्जदार | पालम विलीनिकरण मुदखेड | रा. प्रा.आ. केंद्र रावराजुर, ता. पालम, जि. परभणी - ४३१७२० | १,१३,९२०/- |
| | | सेनाजी नौसाजी डोईजड | जामिनदार | | रा. प्रा.आ. केंद्र रावराज, ता. पालम, जि. परभणी - ४३१७२० | |
| | | मधुकर पुरभाजी गवळी | जामिनदार | | रा. प्रा.आ. केंद्र रावराजुर, ता. पालम, जि. परभणी - ४३१७२० | |
| ११ | लवाद दावा क्र. ११/२०२३ ३०/०७/२०२५ | रामनाथ असाराम राठोड | कर्जदार | परभणी | रा. जि.प. प्राथमिक शाळा रांजणी, ता. जालना, जि. जालना - ४३१२०३ | १,०४,४६४/- |
| | | भारत दिपकराव कांबळे | जामिनदार | | रा. मु.पो. बोरवड बु., ता. जि. परभणी - ४३१५२१ | |
| | | फुलाजी होनाजी जोगदंड | जामिनदार | | रा. मु.पो. करडगाव, ता. घनसावंगी, जि. जालना - ४३१२०९ | |
| १२ | लवाद दावा क्र. १२/२०२३ ३०/०७/२०२५ | इसामियों शेख इब्राहिम बागवान | कर्जदार | परभणी | रा. रांजणी, ता. घनसावंगी, जि. जालना - ४३१२०७ | २,२४,६३३/- |
| | | कुरेशी नियाज अ. रहीम | जामिनदार | | रा. जि.प. शाळा, ता. चित्रवडगाव, जि. जालना - ४३१२०७ | |
| | | वनगुजरे ज्ञानेश्वर वसंतराव | जामिनदार | | रा. स.भु. प्रशाला, रांजणी घनसावंगी, ता. जि. जालना - ४३१२०७ | |
| १३ | लवाद दावा क्र. १७४/२०२१ ३०/०७/२०२५ | दत्तात्रय दिनकर वाघमारे | कर्जदार | बीड विलीनीकरण शेळगी | रा. मु.पो. साळींबा, ता. वडवणी, जि. बीड - ४३११२२ | ६२,३९१/- |
| | | बापू उत्तम जाधव | जामिनदार | | रा. मु.पो. साळींबा, ता. वडवणी, जि. बीड - ४३११२२ | |
| | | मधुकर बाबुराव ठोसर | जामिनदार | | रा. मु. पो. साळींबा, पिंपरखेड, ता. वडवणी, जि. बीड - ४३११२२ | |
| १४ | लवाद दावा क्र. १७७/२०२१ ३०/०७/२०२५ | गणेश शकरराव राऊत | कर्जदार | बीड विलीनीकरण शेळगी | रा. मु.पो. जुना बाजार, ता. बीड, जि. बीड - ४३११२२ | १,४७,०९०/- |
| | | भारत महादेव काळे | जामिनदार | | रा. मु.पो. अजिजपुरा, माळी गल्ली, ता. बीड, जि. बीड - ४३११२२ | |
| | | श्रीनिवास सुरेशराव रणखंब | जामिनदार | | रा. मु.पो. रविवार पेठ, तेली गल्ली, ता. बीड, जि. बीड - ४३११२२ | |
| १५ | लवाद दावा क्र. १९९/२०२१ ३०/०७/२०२५ | अमोल अर्जुनराव सोनवणे | कर्जदार | बीड विलीनीकरण शेळगी | रा. मु.पो. न्यु आदर्श गणेश नगर, नगर रोड, रेस्ट हाऊसच्या मागे, ता. जि. बीड - ४३११२२ | १,०७,८३८/- |
| | | दिलीप बाबुराव वाव्हूळ | जामिनदार | | रा. मु.पो. स्नेह नगर, सुभाष रोड, ता. बीड, जि. बीड - ४३११२२ | |
| | | भास्कर किसनराव सोनवणे | जामिनदार | | रा. मु.पो. गणेश नगर, नगर रोड, ता. जि. बीड - ४३११२२ | |
| १६ | लवाद दावा क्र. २०१/२०२१ ३०/०७/२०२५ | संजय गोवर्धन पारीक | कर्जदार | बीड विलीनीकरण शेळगी | रा. मु.पो. काळा हनुमान ठाणा मंदिराजवळ, करीमपुरा, ता. जि. बीड - ४३११२२ | १,०५,२९२/- |
| | | रामेश्वर नागनाथ देशमाने | जामिनदार | | रा. मु.पो. बालाजी मंदिराजवळ, करीमपुरा, ता. जि. बीड - ४३११२२ | |
| | | विनोद समाधान कांडे | जामिनदार | | रा. मु.पो. पालवण रोड, शिवाजी नगर, ता. जि. बीड - ४३११५३ | |
| १७ | लवाद दावा क्र. २२७/२०२१ ३०/०७/२०२५ | संतोष भारत घुमरे | कर्जदार | वडवणी विलीनीकरण शेळगी | रा. मु.पो. मैदा, ता. बीड, जि. बीड - ४३११२२ | ७४,१३९/- |
| | | विलास बापुराव बापमारे | जामिनदार | | रा. मु.पो. मैदा, घाटसावळी, वडवणी, ता. बीड, जि. बीड - ४३११२२ | |
| | | दिलीप शिवाजी घोरड | जामिनदार | | रा. मु.पो. मैदा, घाटसावळी, वडवणी, ता. बीड, जि. बीड - ४३११२२ | |
| १८ | लवाद दावा क्र. २५०/२०२१ ३०/०७/२०२५ | रामदास सर्जेराव नरवडे | कर्जदार | वडवणी विलीनीकरण शेळगी | रा. मु.पो. चिखल बिड, ता. वडवणी, जि. बीड -४३११२२ | २,१२,५०२/- |
| | | बाळासाहेब धोंडिबा डोंगरे | जामिनदार | | रा. मु.पो. कोठारबन, ता. वडवणी, जि. बीड - ४३११२२ | |
| | | शाम किशोर उजगरे | जामिनदार | | रा. मु.पो. २४५, दलित वस्ती, पाटील गल्ली, रामबाग, केंद्रीय बँक, ता. वडवणी, जि. बीड - ४३११३१ | |

येणे प्रमाणे जाहिर नोटिस प्रसिध्द केली ता. १८/०७/२०२५

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**ॲड. अजित एम. देशमुख,**
**एम. ए. मराठी, एम. ए. (एम.सी.जे) एम.कॉम., एल.एल.बी.**

## अग्रलेख...

# 'अर्थ' साक्षरतेचा अर्थ

२०२४-२०२५ या आर्थिक वर्षात एकट्या स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये २,१२२ कोटी रुपयांनी फसवणूक झाल्याची माहिती एका माहिती अधिकार अंतर्गत नुकतीच देण्यात आली आहे. गेल्या २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात देशातील सर्व बँकांची मिळून १४,५९५ कोटी रुपयांनी फसवणूक झाल्याचे सांगण्यात आले होते. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणात ६३ सरकारी बँका आहेत. त्यांची ही एकत्रित फसवणूक होती. या वर्षात एकट्या स्टेट बँकेचीच फसवणूक २,१२२ कोटी रुपयांची असल्याची अधिकृत माहिती आहे. देशातील सर्वांत मोठी सरकारी बँक स्टेट बँकच असल्यामुळे सर्वाधिक व्यवहार, उलाढाल आणि सर्वाधिक फसवणूक या बँकेतच किंवा या बँकेमुळेच होणेही स्वाभाविकच आहे. गेल्या एकाच आर्थिक वर्षात स्टेट बँकेच्या तक्रार निवारण विभागाकडे तब्बल २८ लाख ५० हजार ५२० तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. ३१ मे २०२५ या दिवशी स्टेट बँकेचे सुमारे २.५ लाख कर्मचारी, २२,९६२ शाखा आणि ६३,७९१ एटीएम असल्याची माहिती देण्यात आली आहे. या काळात सायबर फसवणुकीच्या १०,२६० प्रकरणांमध्ये ६६.७७ कोटी रुपये, इंटरनेट बँकिंगच्या ५००२ प्रकरणांत ३६.२६ कोटी रुपये, मोबाईल बँकिंगच्या आठच प्रकरणांमध्ये १७ लाख रुपये, योनोच्या १५६ प्रकरणांत २.३४ कोटी रुपये, यूपीआयच्या ४,८२९ प्रकरणांत २६.४७ कोटी रुपये आणि ईपीईएसच्या २६५ प्रकरणांमध्ये ४६ लाख रुपयांच्या फसवणुकीचा समावेश आहे. स्टेट बँकेच्या या साऱ्या प्रकरणांसोबत सर्वांत गंभीर प्रकरण तर वेगळेच आहे. या बँकेने आपल्याच १०० कर्मचाऱ्यांची ७.९८ कोटी रुपयांची फसवणूक केली असल्याची धक्कादायक माहिती दिली आहे. याचा अर्थ सर्वसामान्य नागरिक किंवा स्टेट बँक खातेदारांच्या आर्थिक फसवणुकीत याच स्टेट बँकेचे कर्मचारी सहभागी असतात असाच निघतो. अशाच एका ऑनलाईन फसवणुकीच्या तक्रारीची माहिती समाज माध्यमांवर आली होती. त्यात स्टेट बँकेच्या एका ग्राहकाच्या फसवणुकीबाबत सांगितले होते. स्टेट बँकेच्या खात्यातून ऑनलाईन व्यवहार करण्यासाठी 'योनो' नावाची सुविधा खातेदाराने मागितल्यानंतर बँकेला 'प्रोव्हाईड' करायची असते. या प्रकरणात ग्राहकाने 'योनो' मागितले नसतानाही त्याला ते त्याच्या नकळत देण्यात आले. विशेष म्हणजे या खात्याशी जोडलेला अधिकृत भ्रमणध्वनी क्रमांक थेट बँकेच्या 'सॉफ्टवेअर'मधून बदलण्यात आला. या बदललेल्या क्रमांकाला त्या खात्याशी काहीही संबंध नसताना जोडण्यात आले. कारण स्टेट बँक योनो व्यवहार मोबाईलमार्फत करते. या जोडलेल्या अनधिकृत क्रमांकावरून स्टेट बँकेच्या अधिकृत खात्यावर 'योनो'ची मागणी केली गेली. बँकेच्या 'अतिकार्यक्षम' यंत्रणेनेही लगेच योनो देऊन टाकले. ज्या भामट्याने आपला मोबाईल क्रमांक स्टेट बँकेच्या अधिकृत खात्यात घुसवला होता, त्याने ठरवल्याप्रमाणे त्या खात्यातील सारी रक्कम साफ करून टाकली. त्या खातेदाराने पोलिस आणि स्टेट बँकेकडे तक्रार केली. 'डिस्प्युट' निर्माण केला. बँकेच्या ग्राहक तक्रार निवारणवाल्यांनी काही महिन्यांनंतर 'स्टिरिओ' उत्तर देऊन त्या तक्रारीचे 'क्लोजर'ही करून टाकले. हे इतके सारे बँकेच्या कर्मचाऱ्याच्या 'भागीदारी'शिवाय कसे होईल, असा प्रश्न संबंधित खातेदार विचारत राहिला.

आजच्या डिजिटल युगात बँकिंगने अभूतपूर्व गतीसह सुविधा दिली आहे. युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) आणि मोबाईल बँकिंगमुळे शहरी व ग्रामीण भागांमध्येही आर्थिक व्यवहारांचे स्वरूप बदलले आहे. २०२४ मध्ये एनपीसीआय (नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) नुसार, भारतात यूपीआय व्यवहारांनी १०० अब्ज व्यवहारांचा टप्पा ओलांडला आहे. त्यामुळे भारत जगातील सर्वांत वेगाने वाढणारी डिजिटल पेमेंट प्रणाली बनला आहे. शहरी भागात, तरुण आणि व्यवसायी मोबाईलद्वारे पैसे हस्तांतरण, बिल पेमेंट आणि ऑनलाईन खरेदीसाठी यूपीआयचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. ग्रामीण भागातही, डिजिटल इंडिया उपक्रम आणि इंटरनेटच्या वाढत्या उपलब्धतेमुळे यूपीआय व्यवहार वाढले आहेत. मात्र, ही सुविधा सोबतच जोखीम घेऊन आली आहे. डिजिटल बँकिंगच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे सायबर गुन्हेगारांनी फसवणुकीच्या नवीन पद्धती विकसित केल्या आहेत. यामुळे सामान्य ग्राहकांचे आर्थिक नुकसान होण्याचे प्रमाण वाढले आहे. बँकिंग फसवणुकीचे अनेक प्रकार आजकाल प्रचलित आहेत, ज्यामुळे ग्राहकांना आपली मेहनतीची कमाई गमवावी लागते. यात 'फिशिंग' हा एक असा प्रकार आहे ज्यामध्ये सायबर गुन्हेगार बनावट ई-मेल, मेसेज किंवा वेबसाईट्सद्वारे ग्राहकांचा बँक खाते तपशील, पासवर्ड किंवा ओटीपी चोरतात. बँक ग्राहकाला एखादा ई-मेल येऊ शकतो जो बँकेकडूनच आल्यासारखा दिसतो, ज्यामध्ये तुम्हाला तुमचे खाते 'अपडेट' करण्यासाठी लिंकवर क्लिक करण्यास सांगितले जाते. स्मिशिंग या प्रकारात 'एसएमएस'द्वारे पाठवले जाणारे फसवे मेसेजेस यामध्ये ग्राहकांना बनावट लिंक्सवर क्लिक करण्यास किंवा ओटीपी देण्यास प्रवृत्त केले जाते.

क्यूआर कोड स्कॅन करून पेमेंट करणे यूपीआयमुळे सोपे झाले आहे. पण गुन्हेगार बनावट क्यूआर कोड्स तयार करून पैसे थेट त्यांच्या खात्यात हस्तांतरित करतात. 'ॲप क्लोनिंग'मध्ये सायबर गुन्हेगार बँकांच्या अधिकृत ॲप्ससारखे दिसणारे बनावट ॲप्स तयार करतात. ग्राहक चुकीच्या ॲप्सवर 'लॉगिन' करतात आणि त्यांची माहिती चोरीला जाते. ओटीपी कॉल्स आणि कस्टमर केअर फ्रॉडमध्ये फसवणूक करणारे स्वतःला बँक अधिकारी किंवा कस्टमर केअर प्रतिनिधी म्हणवून ग्राहकांना फोन करतात आणि ओटीपी मागतात. अशा कॉल्समुळे अनेक ग्राहक आपली माहिती शेअर करून मोकळे आणि रिकामे होतात. सायबर फसवणुकीला बळी पडण्यामागे अनेक मानसशास्त्रीय कारणे आहेत. अनेक ग्राहकांना डिजिटल बँकिंगच्या जोखमींबद्दल माहिती नसते. विशेषतः ग्रामीण भागातील लोकांना यूपीआय, ओटीपी किंवा फिशिंग याबद्दल कमी माहिती असते. सायबर गुन्हेगार 'तुमचे खाते २४ तासांत बंद होईल' असे मेसेज पाठवून ग्राहकांवर तातडीने निर्णय घेण्याचा दबाव टाकतात. अनेक ग्राहकांना वाटते की, बँकेकडून येणारा प्रत्येक मेसेज किंवा कॉल खरा आहे. यामुळे ते बँकेच्या नावाने येणाऱ्या बनावट कॉल्सवर विश्वास ठेवतात. काही फसवणुकींमध्ये ग्राहकांना मोफत ऑफर्स, कॅशबॅक किंवा लॉटरीचे आमिष दाखवले जाते, ज्यामुळे ते चुकीच्या लिंक्सवर क्लिक करतात. बँकिंग फसवणुकीला आळा घालण्यासाठी बँक आणि सरकार दोघांचीही महत्त्वाची जबाबदारी आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) याबाबत अनेक धोरणे आणि मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. आरबीआयने बँकांना 'केवायसी' (तुमचा ग्राहक जाणून घ्या) प्रक्रिया कठोर करण्याचे आणि ग्राहकांना सायबर सुरक्षेबाबत जागरूक करण्याचे निर्देश दिले आहेत. २०२३ मध्ये त्यांनी डिजिटल फसवणुकीविरुद्ध ग्राहक संरक्षणासाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. त्यात बँकेच्या निष्काळजीपणामुळे नुकसान झाले असेल तर बँकांना ग्राहकांच्या नुकसानासाठी जबाबदार धरण्याची तरतूद आहे. भारत सरकारने तातडीने अशा फसवणुकीची तक्रार नोंदवण्यासाठी १९३० ही राष्ट्रीय 'सायबर क्राईम हेल्पलाईन' सुरू केली आहे. कोणत्याही परिस्थितीत ओटीपी कोणाशीही शेअर करू नका. बँक कधीही ओटीपी मागत नाही. संशयास्पद कॉल्सला प्रतिसादच देऊ नका. डिजिटल बँकिंगने आपले जीवन सोपे केले आहे. परंतु सोबतच सायबर फसवणुकीचा धोका वाढला आहे. सामान्य ग्राहक म्हणून आपण सतर्क राहणे आणि आपली वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. आर्थिक साक्षरता वाढवणे, बँकिंग व्यवहारांबाबत जागरूक राहणे आणि सायबर सुरक्षेच्या उपायांचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे. रिझर्व्ह बँक आणि सरकारने अनेक पावले उचलली असली, तरी खरी जबाबदारी स्वतःचीच आहे. 'सतर्क ग्राहक : सुरक्षित ग्राहक' हा मंत्र प्रत्येकाने अंगीकारला, तरच आपण सायबर गुन्हेगारांना रोखू शकतो. आपली जागरूकता हीच आपली सर्वांत मोठी ढाल आहे.

## प्रासंगिक

### हिरण्यमय पंड्या

# रोजगार संलग्न प्रोत्साहन योजनेची भूमिका

भारत सरकारने अलिकडेच बहुप्रतीक्षित रोजगार संलग्न प्रोत्साहन योजना (ईएलआय) मंजूर केली. ही योजना देशातील कामगारांसाठी एक स्वागतार्ह दिलासा आहे. एक कामगार संघटना म्हणून, आमची ही एक दीर्घकाळापासूनची मागणी होती, तिला अखेर मूर्त स्वरूप आले आहे. हे एक सक्रिय धोरण असून रोजगार निर्मिती, कौशल्य विकास आणि औपचारिकीकरणासाठी सरकारच्या वचनबद्धतेची पुष्टी याद्वारे होते. अशा प्रकारच्या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात केल्याबद्दल आम्ही सरकारचे कौतुक करतो. याचा लाभ ३.५ कोटींहून अधिक कामगारांना होण्याची अपेक्षा असून यात प्रथमच कार्यदलाचा भाग होणाऱ्या १.९ कोटींहून अधिक जणांचा समावेश आहे. भारतीय मजदूर संघ याकडे राष्ट्रनिर्माण प्रक्रियेत कामगारांना प्राधान्य देण्याच्या सरकारच्या उद्दिष्टाची प्रतिबद्धता म्हणून पाहतो.

ईएलआय योजना ही एका व्यापक रोजगार साहाय्य चौकटीचा भाग असून सरकारने गेल्या वर्षी सुरू केलेल्या इंटर्नशिप आणि कौशल्य विकास योजनांसारख्या विद्यमान उपक्रमांना पूरक आहे. एकत्रितपणे, या कार्यक्रमांचा उद्देश रोजगारक्षमता सुधारणे, औपचारिक नोकरीचे मार्ग तयार करणे आणि कामगारांच्या हितसंरक्षणाला बळकटी देण्याचा आहे. विशेषतः नोकरीची उपलब्धता आणि सामाजिक सुरक्षा व्याप्ती याबाबत ऐतिहासिकदृष्ट्या पिछाडीवर असलेल्या श्रेणी २ आणि श्रेणी ३ शहरांमधील तरुणांना याचा फायदा होईल.

कर्मचाऱ्यांच्या खात्यात थेट योगदान देऊन, ही योजना नियोक्त्यांसाठी औपचारिकीकरणाचा खर्च कमी करते आणि तरुणांना, पहिल्यांदाच काम करणाऱ्या कामगारांना औपचारिक कार्यदलात प्रवेश करण्यास प्रोत्साहित करते. यामुळे त्यांच्यासाठी पेन्शन, आरोग्यसेवा आणि इतर महत्त्वपूर्ण सामाजिक सुरक्षा लाभांमध्ये प्रवेश सुनिश्चित होतो. शिवाय, वस्तुनिर्माण क्षेत्र आणि एमएसएमईंना अतिरिक्त साहाय्य देऊन, क्षेत्रीय आणि सामुदायिक समान आर्थिक वाढीला चालना देताना रोजगार निर्मितीला चालना देण्याची ग्वाही यातून मिळते. कामगारांसाठी केवळ एक नवीन संधीच नाही तर सन्माननीय, स्थिर आणि समावेशक रोजगाराच्या दिशेने जाणारा एक अर्थपूर्ण




बदल या योजनेतून दिसून येतो.

**कामगार दल प्रवेश आणि औद्योगिक संबंध मजबूत करणे**

ईएलआय योजनेचा सर्वांत प्रशंसनीय पैलू म्हणजे औपचारिक रोजगार आणि आर्थिक साक्षरतेशी जोडलेल्या १५,००० रुपयांपर्यंतच्या थेट प्रोत्साहनाद्वारे नोकऱ्यांमध्ये नवीन प्रवेश करणाऱ्यांना सक्षम बनवण्यावर लक्ष केंद्रित करणे, हा आहे. सामाजिक सुरक्षा आणि कामाच्या ठिकाणी संरक्षणासह संरचित कामाच्या वातावरणात काम करण्याची अशा प्रकारची संधी याद्वारे अनेकांना प्रथमच मिळणार आहे. अनौपचारिक व्यवस्थेतून हक्क-आधारित, सन्माननीय रोजगाराकडे वळण्याची संधी यातून मिळेल. भारतीय मजदूर संघाने कामगार सक्षमीकरणाला प्रोत्साहन देणाऱ्या अशा संक्रमणासाठी दीर्घकाळ धोरणवकिली केली आहे.

औपचारिकीकरण म्हणजे केवळ वेतन अनुपालन नाही, तर मूलतः ते नियोक्ता-कर्मचारी संबंधांचे स्वरूप बदलते. संरक्षित आणि मौल्यवान कामगार अधिक योगदान देतात, जास्त काळ टिकतात आणि विश्वासनिर्मिती होते. यातून कामगारांसाठी पेन्शन, वैद्यकीय फायदे, भविष्य निर्वाह निधी बचत आणि गरज पडल्यास कायदेशीर मदत याबाबत पोहोच सुनिश्चित करते. ही योजना कामगार संघटनांचा अर्थपूर्ण सहभाग, संस्थात्मक तक्रार निवारण आणि कामाच्या ठिकाणी वाद कमी करण्यासाठी वाव निर्माण करते. अशाप्रकारे, ईएलआय योजना केवळ रोजगार निर्माण करण्याबद्दल नाही तर परस्पर आदर आणि सामायिक वाढीवर आधारित कामाच्या अधिक न्याय्य आणि सहभागी जगाला आकार देण्याबद्दल देखील आहे.

**कौशल्य, गतिशीलता आणि शाश्वत रोजगार**

ईएलआय योजनेचे एक प्रमुख बलस्थान म्हणजे भारताच्या व्यापक कौशल्य आणि रोजगार चौकटीशी त्याचे संरेखन, शाश्वत आणि सक्षम करणारा, रोजगार सुनिश्चित करणे. आर्थिक साक्षरता, प्रशिक्षण कार्यक्रम, आयटीआय सुधारणा आणि प्लेसमेंट-संबंधित कौशल्य यांना जोडून, ती कौशल्य-संपादनापासून सन्माननीय कामापर्यंत एक स्पष्ट मार्ग तयार करते. योजनेअंतर्गत गतिशीलता आणि करीअर प्रगतीवरील लक्ष, केवळ नोकरीतल्या प्रवेश स्तरावरच मर्यादित नाही तर तरुण कामगारांना औपचारिक कामगार बाजारपेठेत जोडून ठेवण्यातही साहाय्यभूत आहे. विशेषतः महामारीनंतरच्या अनिश्चितता आणि जलद तांत्रिक बदल या पृष्ठभूमीवर दीर्घकालीन रोजगारक्षमता आणि विकास सुनिश्चित करण्यातही ती साहाय्यभूत आहे.

**राष्ट्रीय प्रगतीसाठी सामायिक जबाबदारी**

ईएलआय योजना योग्य साधन पुरवते; मात्र तिचे यश सर्व भागधारक जसे की विविध संघटना आणि इतर सर्व संबंधित यासाठी कशाप्रकारे सहभाग नोंदवतात, यावर अवलंबून आहे. ही योजना कामगार संघटनांना नवीन औपचारिक कामगारांशी संबंध वाढवण्याची संधी देते, जेणेकरून ते त्यांच्या हक्कांबाबत जागरूक असतील आणि त्यांच्या कार्यस्थळाच्या जडणघडणीत अर्थपूर्णपणे सहभागी होऊ शकतील. रोजगार निर्मितीसोबतच कार्यस्थळी मजबूत लोकशाही, सुधारित कामगार-व्यवस्थापन संवाद आणि सहयोगी समस्या सोडवण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

भविष्याचा विचार करता, ईएलआय योजना भारताच्या विकासाच्या संकल्पात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. विकसित भारत २०४७च्या दिशेने आपण प्रगती करत असताना आपले उद्दिष्ट, वाढ किंवा औद्योगिक विस्ताराच्या पलीकडे जात कुशल, संरक्षित, प्रेरित आणि अर्थव्यवस्थेत औपचारिकरित्या जोडलेले कार्यदल निर्माण करावयाचे असायला हवे. ईएलआय योजना या संकल्पाशी अनुरूप आहे. भविष्यासाठी ती पाया रचणारी असून या अंतर्गत युवा पिढीला सक्षम केले जाईल आणि औद्योगिक संबंध सहकार्यात्मक असतील. भारतीय मजदूर संघ या दूरदर्शी पावलाचे कौतुक करतो आणि कामगार आणि राष्ट्राच्या भल्यासाठी रचनात्मक पाठिंबा दर्शवतो.

(लेखक भारतीय मजदूर संघ या संघटनेचे अध्यक्ष आहेत.)

# विचारधारेच्या गोळ्या झाडणारे अर्बन नक्षली

देशात दहशतवादासोबतच गुप्त, कपटी, धोकादायक आणि खोलवर शिरलेली विघातक प्रवृत्ती म्हणजे 'अर्बन नक्षलवाद'. हा फोफावत चालला आहे. ही केवळ कल्पना नाही, तर हे वास्तव आहे. ही प्रवृत्ती शहरातील गुप्त सभा, काही संघटनांचे विचारमंच, व्याख्यानांमधून आणि सोशल मीडियाच्या थेट प्रसारणांतून अधिक वेगाने झिरपत आहे. सरकारने नुकताच आणलेला 'जनसुरक्षा कायदा - महाराष्ट्र स्पेशल पब्लिक सिक्युरिटी ॲक्ट २०२४' हा या अर्बन नक्षलवादाविरोधात एक निर्णायक हत्यार ठरू शकतो. जर योग्य पद्धतीने आणि वेळेत लागू केला गेला, तर.

**जनसुरक्षा कायदा नेमका काय आहे?**

महाराष्ट्र विधानसभेत २०२४ च्या उन्हाळी अधिवेशनात सादर करण्यात आलेला आणि नंतर संमत झालेला हा कायदा, 'अर्बन नक्षल' किंवा 'स्लिपर सेल' कार्यकर्त्यांवर लक्ष ठेवण्यासाठी, त्यांच्यावर बंदी आणण्यासाठी आणि त्यांना आर्थिक पाठबळ देणाऱ्यांना अटक करण्यासाठी लागू करण्यात आला आहे.

या कायद्यानुसार राज्य सरकार एखाद्या व्यक्ती, संस्था किंवा गटाला थेट 'धोकादायक संघटना' म्हणून घोषित करू शकते.

UP (Unlawful ctivities Prevention ct) च्या धर्तीवर पण अधिक काटेकोर आणि राज्यस्तरीय नियंत्रणासाठी हा कायदा उपयोगी आहे.

**अर्बन नक्षलवाद म्हणजे काय?**

'नक्षलवादी' हा शब्द ऐकताच जंगलातील बंदूकधारी गोरिल्ला लढवय्ये आठवतात. पण याच लढाईचा शहरी चेहरा अधिक घातक आणि गुप्त स्वरूपाचा आहे. हे लोक बुद्धिजीवी, सामाजिक कार्यकर्ते, लेखक, छत्रच्या नावाखाली काम करणारे लोक, आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनांतले काही नेते असू शकतात.

**त्यांचे काम म्हणजे -**

१. हिंसक नक्षलवादाचं समर्थन २. राज्यविरोधी भावना पसरवणं ३. पोलिसांवर अविश्वास निर्माण करणं ४. भारतीय लोकशाही संस्थांबद्दल अवमान ५. देशद्रोही विचारसरणीचं उदात्तीकरण

**स्लिपर सेल्स कसे काम करतात?**

✻ हे लोक प्रत्यक्ष जंगलात लढत नाहीत, पण शहरात बसून नक्षलवाद्यांना माहिती, लॉजिस्टिक सपोर्ट, रुग्णसेवा, पैसे, प्रचार साहित्य, नकाशे, निवारा, प्रशिक्षण, आणि हत्यारंही पोचवतात.

✻ NI व महाराष्ट्र TS च्या अहवालानुसार, शहरांमध्ये काम करणारे काही बुद्धिजीवी हे प्रत्यक्ष माओवाद्यांपेक्षा अधिक घातक आहेत.

**शहरातील सामान्य नागरिकांना धोका कसा?**

✻ अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचा गैरवापर करून काही समाजात कट्टर भावना पेरल्या जातात.

✻ कॉलेजांमध्ये आणि सोशल मीडियावर 'शोषण', विविध घोषणांच्या आड देशविरोधी विष पेरलं जातं.

✻ शहरांतील विद्यार्थी, बेरोजगार, बुद्धिजीवी वर्ग यांना हाताशी धरून 'भारतातील संसदीय लोकशाही मोडीत काढणे'या लोकांचा उद्देश आहे. दहशतवादी 'मरतात', पण अर्बन नक्षल 'विचार पेरतात'. हे पिढ्या बरबाद करतात.

**जनसुरक्षा कायदा - गरज आणि लाभ**

✻ स्लिपर सेल्सवर थेट कारवाई - आता तपासयंत्रणा कोणताही गोंधळ न होता थेट अटक, जप्ती आणि चौकशी करू शकतात.

✻ राजकीय दुर्बलता बाजूला - पूर्वी नक्षल समर्थकांना 'सामाजिक कार्यकर्ते' म्हणत दुर्लक्ष केलं जात होतं, आता तसं शक्य नाही.

✻ डिजिटल युद्धात वापर - सोशल मीडियावर जाणीवपूर्वक चालवले जाणारे प्रोपगंडा हँडल्स आता या कायद्याच्या टप्प्यात येतील.

अर्बन नक्षलवाद हा बंदुकीचा आवाज नसून, स्वातंत्र्याच्या नावावर चालवलेले मेंदूवर नियंत्रण आहे. ते अधिक घातक आहे, कारण ते शिक्षण, अभिव्यक्ती, आणि विचार या तीन मूलभूत गोष्टींनाच भ्रष्ट करते. आजच्या काळात गोळी झाडणाऱ्या दहशतवाद्यांपेक्षा अर्बन नक्षलवाद अधिक धोकादायक बनत आहे. जनसुरक्षा कायदा ही त्या विषाला तोंड देणारी तलवार आहे, पण ती वेळेत उपसावी लागेल.

- नितीन फलटणकर

## दिल्ली वार्तापत्र

### श्यामकांत जहागीरदार

# राज्यसभेत भाजपा शतकाच्या उंबरठ्यावर

राज्यसभेत भाजपा शतकाच्या उंबरठ्यावर उभा आहे, भाजपाचा एक सदस्य वाढला तरी राज्यसभेत भाजपाचे शतक पूर्ण होणार आहे. भाजपाचे सभागृहात सध्या ९९ सदस्य आहेत, हा एक विक्रम म्हटला पाहिजे. कधीकाळी लोकसभेत भाजपाचे स्पष्ट बहुमत होते, मात्र राज्यसभेत भाजपा अल्पमतात होती. आता लोकसभेत भाजपाचे स्वबळावर स्पष्ट बहुमत नसले तरी रालोआतील मित्रपक्षांच्या मदतीने भाजपाने बहुमतासाठी आवश्यक असलेला आकडा गाठला आहे. दुसरीकडे राज्यसभेत भाजपाची स्वबळावर बहुमताच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे. २०२६ मध्ये राज्यसभेतील जवळपास ७५ सदस्यांचा कार्यकाळ संपल्यामुळे या जागांसाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीनंतर राज्यसभेतही भाजपाचे स्वबळावर स्पष्ट बहुमत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यसभेच्या या निवडणुकीकडे सगळ्यांचे लक्ष लागणे स्वाभाविक आहे.

लोकसभा सदस्यांचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो, तर राज्यसभा सदस्यांचा कार्यकाळ सहा वर्षांचा, म्हणजे लोकसभा सदस्यांपेक्षा एक वर्षाने जास्त असतो. विशेष म्हणजे राज्यसभा हे ज्येष्ठांचे सभागृह म्हणून ओळखले जाते. लोकसभा दर पाच वर्षांनी बरखास्त होत असते, राज्यसभा मात्र कधीच बरखास्त होत नाही, तर दर दोन वर्षांनी त्यातील काही जागांसाठी निवडणूक होत असते. २४५ सदस्यांच्या राज्यसभेत २३३ सदस्य निर्वाचित असतात, म्हणजे विविध राज्यांतील विधानसभांचे सदस्य त्यांना निवडून देत असतात, तर १२ सदस्य राष्ट्रपतींद्वारा नामनियुक्त असतात. सध्या राज्यसभेचे संख्याबळ २४० आहे. जम्मू-काश्मिरातील ४ तर पंजाबमधील एक जागा सध्या रिक्त आहे. २४० सदस्यांच्या सभागृहात साध्या बहुमतासाठी १२१ सदस्य पाहिजेत. भाजपा आणि रालोआतील मित्रपक्षांचे सदस्य धरून रालोआचे संख्याबळ १२५ होते. म्हणजे आज भाजपाजवळ राज्यसभेत स्वबळावर स्पष्ट बहुमत नसले तरी रालोआजवळ मात्र आवश्यक बहुमतापेक्षा चार जागा जास्त आहे.

मागील आठवड्यात राष्ट्रपतींनी चार मान्यवरांची नामनियुक्त सदस्य म्हणून राज्यसभेवर नियुक्ती केली आहे. मुंबई बॉम्बस्फोट खटल्यातील विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम, माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन शृंगला, केरळमधील सामाजिक कार्यकर्ते सी. सदानंदन् मास्टर आणि इतिहासकार मीनाक्षी जैन यांचा यात समावेश आहे. राष्ट्रपतींनी ज्या लोकांना राज्यसभेवर नामनियुक्त करणे अभिप्रेत असते, यावेळी पहिल्यांदा तशा लोकांना म्हणजे समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रांतील नामवंतांना नामनियुक्त करण्यात आले असे म्हणावे लागेल.

रालोआत भाजपाखालोखाल जदयु आणि अण्णाद्रमुकचे प्रत्येकी चार सदस्य आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तीन तर तेलगू देसमचे दोन सदस्य आहेत. दोन अपक्ष सदस्यांचाही भाजपाला पाठिंबा आहे. अन्य छोट्या पक्षांचे ११ सदस्यही भाजपासोबत आहे. दुसरीकडे लोकसभा निवडणुकीच्या काळात उभ्या झालेल्या पण आता अस्तित्वाचा गंभीर प्रश्न निर्माण झालेल्या इंडिया आघाडीचे संख्याबळ राज्यसभेत ८५ आहे. यात सर्वाधिक म्हणजे २७ सदस्य काँग्रेसचे आहेत. इंडिया आघाडीत तृणमूल काँग्रेसचे १३, द्रमुकचे १० तर आपचे ९ सदस्य आहेत. लोकसभा निवडणुकीपर्यंत आप इंडिया आघाडीत होता. मात्र लोकसभा निवडणुकीनंतर आप या आघाडीतून पूर्णपणे बाहेर पडला आहे. दिल्ली आणि हरयाणा विधानसभा निवडणुकीत आप आणि काँग्रेस यांच्यात आघाडी झाली नव्हती. तर दोन्ही पक्ष या दोन्ही राज्यात एकदुसऱ्याविरुध्द लढले होते. राजदचे पाच, तर माकप आणि समाजवादी पक्षाचे प्रत्येकी चार सदस्य आहेत. झामुमोचे तीन सदस्य आहेत. शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, भाकप आणि इंडियन युनियन मुस्लिम लीगचे प्रत्येकी दोन सदस्य आहेत. केरळ काँग्रेस मणि गट आणि एक अपक्ष सदस्य इंडिया आघाडीत आहे.

रालोआ आणि इंडिया आघाडीसोबत नसणाऱ्या तिसऱ्या आघाडीचे संख्याबळ २० आहे. यात वायएसआर काँग्रेस आणि बिजू जनता दलाचे प्रत्येकी ७ सदस्य आहेत. भारत राष्ट्र समितीचे चार तर बसपाचा आणि एमडीएमकेचा प्रत्येकी एक सदस्यही या आघाडीत आहे. तिसऱ्या आघाडीतील वायएसआर काँग्रेस, बिजू जनता दल आणि भारत राष्ट्र समिती मोदी सरकारला मुद्यांवर आधारित पाठिंबा देत असतात.

२०२६ च्या एप्रिल, मे आणि जून महिन्यात राज्यसभेतील ७५ जागांसाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीनंतर राज्यसभेतील संख्याबळात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. काँग्रेसच्या काही जागा कमी होऊ शकतात, तर भाजपाच्या वाढू शकतात. लोकसभा असो की राज्यसभा विरोधी पक्षनेतेपदासाठी दोन्ही सभागृहांत एकूण सदस्यसंख्येच्या दहा टक्के सदस्य निवडून येणे आवश्यक असते. राज्यसभेत सध्याच काँग्रेसला काठावरचे बहुमत आहे. २०२६ च्या निवडणुकीनंतर काँग्रेसचे संख्याबळ २५ च्या खाली गेले तर काँग्रेसवर राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपदही गमावण्याची वेळ येऊ शकते.

२०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला दहा टक्के म्हणजे ५५ जागा लोकसभेत जिंकता न आल्यामुळे विरोधी पक्ष नेतेपदापासून वंचित राहावे लागले होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेसला लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपद मिळाले आहे. सध्या राहुल गांधी लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत. २०१४ ते २०१९ मध्ये अधीररंजन चौधरी तर २०१९ ते २०२४ या काळात मल्लिकार्जुन खडगे लोकसभेत काँग्रेस पक्षाचे गटनेते होते. सध्या कर्नाटक, तेलंगणा आणि हिमाचलप्रदेश अशा देशातील फक्त तीनच राज्यांत काँग्रेसची सत्ता आहे. त्यामुळे निवृत्त होणाऱ्या सदस्यांना पुन्हा राज्यसभेत पाठवणे काँग्रेससमोरील अशक्यप्राय असे आव्हान आहे.

राज्यसभेतील अनेक ज्येष्ठ सदस्यांचा कार्यकाळ पुढील वर्षी संपत आहे. यात काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार, राज्यसभेचे उपसभापती हरिवंशनारायण सिंह यांच्यासह अनेक सदस्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे खडगे आणि देवेगौडा कर्नाटकमधूनच राज्यसभेवर निवडून आले आहेत. कर्नाटकात काँग्रेसचे सरकार असल्यामुळे खडगेंना पक्षाने उमेदवारी दिली तर पुन्हा निवडून येऊ शकतात. केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी, बी. एल. वर्मा, रवनीतसिंग बिट्टू, जॉर्ज कुरियन, रामदास आठवले, काँग्रेसचे दिग्विजयसिंह, अभिषेक मनु सिंघवी, शक्तिसिंह गोहील, झामुमोचे शिबू सोरेन यांचा निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये समावेश आहे. माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई यांचा कार्यकाळही पुढील वर्षी संपत आहे. गोगोई पण राष्ट्रपतींद्वारा नामनियुक्त सदस्य होते. त्यामुळेच बहुधा सरकारने कायदेतज्ज्ञ म्हणून ॲड. निकम यांना पसंती दिली असावी.

त्यामुळे २०२६ मध्ये होणाऱ्या राज्यसभेच्या द्विवार्षिक निवडणुकीनंतर राज्यसभेची समीकरणे मोठ्या प्रमाणात बदलण्याची शक्यता आहे. राज्यसभेत स्पष्ट आणि निर्विवाद बहुमत मिळवण्याचे भाजपाचे स्वप्न पुढील वर्षी साकार होण्याची शक्यता आहे. राज्यसभेत बहुमत नसल्यामुळे आतापर्यंत अनेक महत्त्वपूर्ण विधेयके पारित करून घेताना सरकारची अडचण होत होती. आता मात्र ही अडचण कायमस्वरूपी दूर होणार आहे, हा भाजपाच्या दृष्टीने शुभसंकेत म्हटला पाहिजे.

९८८१७१७८१७

### नौसैनिक गिर्यारोहकाचे आशीर्वाद

आम्ही कैलास मानसरोवर यात्रा करून आल्यावर त्या यात्रेचे फोटोग्राफ काढले होते. ते मोठे करून त्याचे प्रदर्शन सिस्फाच्या छोट्या गॅलरीत आयोजित केले होते. त्याच्या उद्घाटन सोहळ्याला श्री नरकेसरी प्रकाशन लि.चे अध्यक्ष प्रभाकरराव मुंडले अध्यक्षस्थानी होते. त्या समारंभाला एक सरदारजी अचानक आले होते. आणि त्यांचे स्वागत करून त्यांना भाषण करण्याची विनंती करावी असे प्रभाकररावांनी मला सांगितले.

त्यांच्या भाषणातून त्यांनी या छायाचित्रणाबद्दल अतिशय मोकळेपणाने माझे कौतुक केले. हे गृहस्थ कोण होते हे मात्र मला त्या क्षणी अजिबात माहीत नव्हते. कार्यक्रम संपता संपता निखिल मुंडले यांनी त्यांच्या मला परिचय करून दिला. त्यावेळी लक्षात आले की किती महान व्यक्तीचे आशीर्वाद आपल्या छायाचित्रण प्रदर्शनाला मिळाले आहेत. ती व्यक्ती होती कॅप्टन मनमोहन सिंग कोहली. कॅप्टन कोहली हे नौसेनेमध्ये होते आणि त्यानंतर भारत सरकारने हिमालयाच्या ज्या मोहिमा आखल्या त्याचे नेतृत्व कॅप्टन साहेबांकडेच होते. एका अर्थाने हिमालयाचा परिपूर्ण अभ्यास असणारे आणि अतिशय धाडसी असे ते व्यक्तिमत्त्व होते.

कॅप्टन कोहली यांच्या आशीर्वादाने माझे जीवन उजळून गेले. आज आता आठवण पुन्हा ताजी होते. कारण २३ जून २०२५ ला कॅप्टन कोहली यांचे निधन झाले. कॅप्टन साहेबांचे वर्धा मार्गावर व्यावसायिक प्रतिष्ठान होते व त्यांचे त्यांचे राहणेही वर्धा मार्गावरच होते १९६२ साली नंदादेवी शिखरावर अमेरिकन तांत्रिक शोध उपकरण ठेवण्यात आले होते. ते ठेवण्यामध्ये कॅप्टन कोहली यांची महत्त्वाची भूमिका होती. सिस्फा छोटा गॅलरीत झालेला हा सोहळा आगळावेगळा होता. दोन-तीन दिवसांच्या या समारंभात एक दिवस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयातून फोन आला आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत हे प्रदर्शन पाहायला येणार आहेत असे सांगितले गेले. मोहनजी दुपारी चारच्या सुमाराला आलेत आणि त्यांनी त्याचा मनमुराद आनंद घेतला. त्यांना झालेला आनंद त्यांनी आपल्या अभिप्रायातून व्यक्त केला. कॅप्टन कोहली यांची या निमित्ताने खूप आठवण होते आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**निरंजन अत्रे**/९८८१७१७८४२

## वाचक पत्रे

### मोबाईलचा दुरुपयोग

रिलायन्स उद्योगसमूहाचे सर्वेसर्वा धीरूभाई अंबानी यांनी सन २०२० मध्ये प्रत्येकाच्या हातात एक सेल फोन असेल असे स्वप्न बघितले. ते तंतोतंत खरे झाले. अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण या मूलभूत गरजांची लांबी वाढत जाऊन यात आता मोबाईल फोन हा अत्यावश्यक जीवनावश्यक घटक बनला आहे. एकवेळ खायला अन्न नसले तरी चालेल पण हातात फोन हवा असे चित्र बघायला मिळते. कुठलेही तंत्रज्ञान मनुष्याच्या सुविधांसाठी निर्माण करण्यात येते. त्याचा वापर जबाबदारीने करणे हे आपले कर्तव्य आहे. स्मार्टफोन्स आपल्याला कर लो दुनिया मुठ्ठी में ही भावना देतात. त्याबद्दल प्रगत तंत्रज्ञानाचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत.

परंतु याची दुसरी बाजू अशी की वापरकर्त्याला त्याच्या उपयुक्ततेच्या पलीकडे जाऊन स्वकर्तव्याचे भान राहत नसेल तर ते घातक ठरते. सध्या जो, तो त्या छोट्या यंत्रात डोके खुपसून स्वतःला वर्तमान जगापासून विलग करतो आहे. बरेचदा कामाच्या ठिकाणी कर्मचारी स्वतःचे काम सोडून मोबाईलमध्ये गेम खेळताना किंवा व्हॉट्सॲप, इन्स्टा, फेसबुक याचा वापर करताना दिसून येतात. अशा वेळी आपण दुसऱ्याच्या वेळेचा अपव्यय करतो आहे हे त्यांच्या गावी नसते. तसेच एखाद्या कार्यक्रमात गेल्यावर कार्यक्रमाचा पूर्ण आनंद घ्यावा किंवा पुढच्याचे ऐकावे असे असताना वारंवार फोनमध्ये लक्ष घालतात. यात बरेचदा समोरच्याचा अवमान होतो. एकंदर आपला संयम कमी झाला आहे. कुठलाही एक कार्यक्रम लवकरच कंटाळवाणा होतो. त्यामुळे तिथे बसून सर्फिंग करणे सोईचे वाटते. प्रश्न हा आहे की ती निर्जीव वस्तू आपली गुलाम की आपण तिचे गुलाम बनलोय. ज्यांची नोकरी अथवा उद्योग त्यावर असेल अशा व्यक्ती वगळता इतरांनी वेळीच सावध व्हावे.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

### देव मंदिरातच असतो का?

जळी -स्थळी -पाषाणी ईश्वर भरलेला आहे असे अनेक वर्षे संत, महंत, कीर्तनकार, प्रवचनकार, भारूड अशा अनेक माध्यमाद्वारे ऐकतो आहोत. एक गोष्ट साशंकित की मनाची एकाग्रता वाढविल्यावर मंदिरात जाऊन भगवंत भेटतो का? तर त्याचे उत्तर होकारार्थी व नकारार्थी पण मिळते. ज्याला आपली एकाग्रता स्थिर करता येत नाही त्याला मंदिरात जाऊन समाधान लाभते. पण खऱ्या अर्थाने परमेश्वर गरीब वस्तीतल्या तान्ह्या बाळामध्ये, भुकेलेल्यांमध्ये, दिव्यांगांमध्ये, ज्याला नेसायला वस्त्र सुद्धा नाही अशा गरिबांमध्ये, अंध व्यक्तींमध्ये, मुक्या प्राण्यांमध्ये आणि आपल्या जन्मदात्या आई-वडिलांमध्ये कायमस्वरूपी असतो; तेव्हा त्यांची सेवा हीच परमेश्वराची सेवा आहे यासाठी घरालाच आणि आपल्या विचारांनाच मंदिर बनवून त्यांची सेवा केली तर मंदिरात देव असतो किंवा भेटतो या कल्पनेला विराम मिळेल व जीवन हेच सुवर्ण मंदिर ठरेल.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच <u>कुठलाही लेख</u> पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यावर भर द्या– जिल्हाधिकारी गुप्ता

## ब्रम्हवाडी शाळेत जिल्हाधिकाऱ्यांनी केले विद्यार्थ्यांना अध्यापन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जुलै**

जिल्ह्यातील ब्रम्हवाडी आणि तांदुळवाडी येथील जिल्हा परिषदे शाळांना दि १६ जुलै रोजी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी अचानक भेट दिली. यावेळी ब्रम्हवाडी येथील मुख्याध्यापक गैरहजर असल्याचे आढळून आले. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी दोन्ही शाळेत विद्यार्थ्यांना अध्यापनाचे काम केले आणि शिक्षकांना गुणवत्ता वाढविण्याच्या सूचना दिल्या.

तत्कालीन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी निपूण हिंगोली हा उपक्रम राबविला. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता वाढल्याचे दिसून आले. त्यांनी अचानक शाळांना भेटी सुरू केल्यामुळे शाळांना दांडी मारणारे, कार्यालयीन टप्पा नावाखाली हिंगोलीच्या शिक्षण विभागात येरझारा करणारे तसेच अध्यापनात कुचराई करणाऱ्या शिक्षकांचे चांगलेच धाबे दणाणले होते. जिल्हा परिषद शिक्षक त्याच्या नोकरीच्या गावी वेळेच्या आत शाळेवर हजर राहत असतांना दिसत होते.

तत्कालीन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या बदलीनंतर थोड्या प्रमाणात मरगळ आली होती. मात्र जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी शाळांना अचानक भेटी देण्यास सुरूवात केली आहे.जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी निपूण हिंगोली–२ हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमात विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसोबतच त्यांना स्पर्धा परीक्षेसाठी तयार करणे, शाळास्तरावर शिष्यवृत्ती परीक्षा, स्पर्धा परीक्षा घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

जिल्ह्यातील ब्रम्हवाडी व तांदुळवाडी येथील जिल्हा परिषद शाळांना दि १६ जुलै रोजी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी अचानक भेट दिली. यावेळी ब्रम्हवाडी शाळेत मुख्याध्यापक गैरहजर असल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. त्यानंतर इयत्ता तिसरी व चौथी वर्गावर जिल्हाधिकारी गुप्ता यांनी स्वत: हातात खडू घेत विद्यार्थ्यांना अध्यापन केले. तसेच काही प्रश्न विचारले. त्यांच्याशी संवाद साधला. तांदुळवाडी येथेही गुप्ता यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केले. दोन्ही ठिकाणी गुणवत्ता समाधानकारक दिसून आली. याही पेक्षा जास्त गुणवत्ता वाढीवर भर देण्याच्या सूचना यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी शिक्षकांना दिल्या.

# बांधकामाचा दर्जा वाढविण्यासाठी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणार

## अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ठोंबरे यांची ग्वाही



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जुलै**

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत केल्या जाणाऱ्या बांधकामाचा दर्जा, गुणवत्ता वाढीवर भर दिला जाणार असून त्यासाठी तांत्रिक अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहीती नूतन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे यांनी दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांची सुधीर ठोंबरे यांनी भेट घेतली.

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनूप शेंगुलवार यांच्या बदलीनंतर सोलापूर येथील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे हे दि १७ जुलै रोजी रूजू झाले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांची उपस्थिती होती. यावेळी पत्रकारांशी बोलतांना ठोंबरे म्हणाले की, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागाशी समन्वय साधून कामे केली जातील. जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत विकास कामे केली जातात. या बांधकामाचा दर्जा व गुणवत्ता वाढीवर आपला भर असणार आहे. त्यासाठी जिल्हा व तालुकास्तरावरील तांत्रिक अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेळोवेळी प्रशिक्षण आयोजित करून त्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यानंतर वेळोवळी बांधकामांना भेटी देऊन प्रत्येक टप्प्यावर कामांची गुणवत्ता तपासली जाणार आहे. त्यामुळे ही कामे अधिक दर्जेदार होतील. याशिवाय लघुसिंचन विभागामार्फत तलावांची कामे तसेच आवश्यक त्या ठिकाणी दुरूस्तीची कामे तातडीने हाती घेतली जाणार आहेत. कृषी विभाग, पशुसंवर्धन विभागातील विविध योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करून वैयक्तीक योजनांचा लाभ गावपातळीवर गरजूंना मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांच्याहस्ते नवीन तुती लागवडीचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जुलै**




जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते व राज्याचे रेशीम उपसंचालक डॉ. महेंद्र ढवळे यांच्या उपस्थितीत दि.१५ जुलै, २०२५ रोजी हिंगोली तालुक्यातील डिग्रस कऱ्हाळे येथील शेतकरी संतोष अप्पाराव कऱ्हाळे यांच्या शेतात नवीन तुती लागवडीचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सर्व शेतकऱ्यांना शेतीतील उत्पन्न दुप्पट करण्यासाठी पीक पध्दतीत बदल करुन पारंपरिक पिकांऐवजी रेशीम शेती करावी असे आवाहन करुन इतर पिकांपेक्षा रेशीम शेती अधिक फायदेशीर असल्याचे सांगितले.

राज्याचे रेशीम उपसंचालक डॉ.महेंद्र ढवळे यांनी रेशीम शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करुन महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून तीन वर्षामध्ये ४ लाख ३२ हजार २४० रुपयाचे अनुदान असून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तसेच डिग्रस कऱ्हाळे येथील उपस्थित सर्व शेतकऱ्यांना रेशीम शेती ही इतर पिकांपेक्षा चांगली आणि जास्त उत्पन्न देणारी आहे, असे सांगितले.

नवीन तुती लागवड पध्दतीचे प्रात्यक्षिक दाखवून तुती लागवडीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी तहसीलदार श्रीकांत भुजबळ, जिल्हा रेशीम विकास अधिकारी ए.एस.वडवळे, राधा पाटील, राजू रणवीर, नितीन लोलगे, रजनीश कुटे, कुलदीप हरसुले, केतन प्रधान, रमेश भवर, तान्हाजी परघणे, प्रगतशील शेतकरी सुदाम खिल्लारे, श्री.शेख आदींची उपस्थिती होती.



**हिंगोली– शहरातील जलेश्वर तलाव सुशोभिकरणावेळी अतिक्रमण धारकांना हटविण्यात आले. त्यांना जागा उपलब्ध करून देण्यात यावी, शहरातील रस्त्यांच्या दोन्ही बाजुला नाल्यांसाठी निधी द्यावा, महावितरणच्या जुन्या विद्युततारा बदलणे आदी विषयांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना हिंगोलीचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, कैलासचंद काबरा, मनोज शर्मा, हमीद प्यारेवाले, सचिन बांगर आदींनी भेट घेतली. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

हिंगोली– राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समान हक्क व समान संधी असा मूलभूत हक्क दिलेला आहे. त्याअंतर्गत समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे. तसेच त्यांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी किंवा तिसऱ्या सोमवारी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन राबविण्यात येतो. माहे जुलै, २०२५ च्या महिला लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, (दि. २१ जुलै) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कक्ष क्र. एस–७, हिंगोली यांच्या कार्यालयात सादर करावेत. यामध्ये न्याय प्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले, सेवा, आस्थापनाविषयक बाबी, तक्रार निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या व्यासपीठाचा उपयोग आपल्या अडचणी सोडविण्यासाठी करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

### त्रैमासिक विवरण पत्र सादर करण्याचे आवाहन

हिंगोली– सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच खाजगी आस्थापनांनी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, हिंगोली यांच्याकडे आपल्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची माहितीबाबतचे माहे जून,२०२५ अखेरचे ईआर–१ त्रैमासिक विवरणपत्र संकेतस्थळावर दि. ३१ जुलै,२०२५ पर्यंत ऑनलाईन भरावेत. माहे जुलै–२०२५ ची मासिक वेतन देयके दाखल करताना ईआर–१ भरुन दिल्याचे ऑनलाईन प्रमाणपत्र देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. याशिवाय जुलै, २०२५ ची वेतन देयके स्वीकारले जाणार नाहीत याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच सर्व कार्यालयांना जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,हिंगोली या कार्यालयामार्फत युजर आयडी व पासवर्ड यापूर्वीच कळविण्यात आलेले आहेत. त्यानुसार सर्व कार्यालयानी आपला ई–मेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक, पत्ता, टॅन क्रमांक, पॅन क्रमांक टाकून आपली प्रोफाईल अद्यावत करावी, असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, हिंगोली यांनी केले आहे.

### औद्योगिक वसाहतीत अवैध दारू विक्री

हिंगोली– शहरातील लिंबाळा औद्योगिक वसाहतीमधील मोकळ्या जागेत काही समाजकंटक अवैध दारू विक्री करीत आहेत. यामुळे या भागात सतत तणावाची परिस्थिती निर्माण होत असून दारू विक्रेते कामगारांना दारू पुरवीत आहेत. परिणामी उद्योजकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्यावेळी या भागात पथदिवे बंद आहेत. याठिकाणी स्वतंत्र पोलिस चौकी द्यावी अशी मागणी संघटनेकडून करण्यात आली

# कबड्डी खेळाडू हिम्मतराव मोरे, नामदेव राठोड यांना पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जुलै**

येथील सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक हिम्मतराव मोरे यांना ज्येष्ठ कबड्डी प्रशिक्षक पुरस्कार तर राष्ट्रीय कबड्डी खेळाडू व सहाय्यक पोलीस निरीक्षक नामदेवराव राठोड यांना ज्येष्ठ खेळाडू पुरस्कार राज्य कबड्डी असोसिएशनच्यावतीने रायगड जिल्ह्यातील पांडवा देवी ता. अलिबाग येथे १५ जुलै २०२५ रोजी कबड्डी दिनी अमृत कलश देवून राज्य असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हिम्मतराव मोरे यांनी सेवा काळात जिल्हास्तरीय, विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू यांना मार्गदर्शन केले आहे. पोलीस विभागाच्या क्रीडा स्पर्धामध्ये व खुल्या गटाच्या कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र गाजवणाऱ्या नामदेव राठोड या दोघांच्या क्रीडा नैपुण्यची दखल महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने घेवून मोरे गुरुजी यांना ज्येष्ठ प्रशिक्षक तर नामदेव राठोड यांना ज्येष्ठ कबड्डी खेळाडू हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी पुरस्कार विजेते यांचे संपूर्ण कुटुंब व मित्रपरिवार सन्मान स्थळी उपस्थित होता. पुरस्कार प्राप्त मोरे व एन आर राठोड यांचे हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशन अध्यक्ष ॲड शिवाजीराव माने, उपाध्यक्ष बंडू पाटील अँड बाबा नाईक, कोषाध्यक्ष मेजर पंढरीनाथ घुगे, सचिव डॉ. नवनाथ लोखंडे सहसचिव दिलीप बांगर व हिंगोली जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य खंडबाराव नाईक, शेषराव चव्हाण, निवृत्ती बांगर, राज्य कार्यकारिणी सदस्य मंगल पांडे यांनी अभिनंदन केले आहे.

# परिचारीकांचे आजपासून विविध मागण्यांसाठी बेमुदत काम बंद आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जुलै**

परिचारीकांच्या वेतनातील त्रुटी दूर करणे तसेच इतर प्रलंबीत मागण्यांसाठी दि १८ जुलै पासून परिचारीका बेमुदत संपावर जाणार असल्याचा इशारा देण्यात आला असून या आंदोलनामुळे आरोग्य व्यवस्थेवर ताण पडणार असल्याचे दिसत आहे.

महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटनेच्यावतीने राज्य सरकारकडे वेतनातील त्रुटी दूर करा, प्रशासकीय बदली, सेवा प्रवेश नियम, कंत्राटीकरण रद्द करा, केंद्र शासनाप्रमाणे भत्ता देण्यात यावा यासह इतर प्रलंबीत मागण्यांसाठी राज्यातील परिचारीकांनी दि १५ व १६ जूलै रोजी काळ्या फिती लावून काम केले आहे. दि १७ जुलै रोजी धरणे आंदोलन करण्यात आले. येथील शासकीय रूग्णालयाच्या आवारात परिचारीकांनी आंदोलन करीत शासनाकडे मागण्या केल्या आहेत. मागण्या मान्य न झाल्यास दि १८ जुलै पासून सर्व परिचारीका बेमुदत काम बंद आंदोलन करतील असा इशारा संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे. परिचारीकांनी काम बंद आंदोलन केल्यास रूग्ण सेवेवर त्याचा मोठा परिणाम होणार आहे. शासनाने परिचारीकांच्या मागण्या मान्य कराव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.

# जनसुरक्षा कायदा रद्द करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जुलै**



लोकशाहीचा गळा दाबणारा तसेच सर्व सामान्यांच्या प्रश्नावर गळचेपी करणारा जनसुरक्षा कायदा रद्द करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मुनीर खान पठाण यांनी जिल्हाधिकारी यांना सादर केलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनात राज्य सरकारने केलेला जनसुरक्षा कायदा हा शिव, फुले, शाहू आंबेडकरी विचार नष्ट करणार आहे. सरकारविरोधी मत मांडणाऱ्या व्यक्ती किंवा संघटनावर अनिर्बंध कारवाईचे अधिकार, बेकायदेशी संघटना व कृत्य यांची मोघम व्याख्या या कायद्यात आहे. संघटना बेकायदेशीर जाहीर केल्यानंतर तिची सर्व स्थावर मालमत्ता, जंगम मालमत्ता जप्त होणार आहे. सामाजिक चळवळ, आंदोलने तसेच विरोधी पक्षांना दडपण्यसाठी कायद्याचा वापर होऊ शकतो, सामाजिक प्रश्नावर काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना त्रास देण्याचे हत्यार म्हणून कायद्याचा वापर होणार आहे. त्यामुळे हा कायदा रद्द करावा अन्यथा दि २१ जुलै रोजी आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते मुनीर खान पठाण, सुधा सपकाळ, कमलबाई करवंदे, वंदना पाईकराव विजय खडसे, किशोर सपाटे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# एनसीसीमध्ये १२० विद्यार्थ्यांची नोंदणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जुलै**

येथील आदर्श महाविद्यालय एनसीसी विभागाच्या वतीने बटालियनच्या सूचनेनुसार शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ याकरिता राष्ट्रीय छात्रसेना प्रथम वर्षाकरीता भरती आयोजित करण्यात आली. विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा एनसीसीत सहभागी होण्यासाठी सर्वाधिक उत्साह होता. राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये सहभागी होण्यासाठी अकरावी व पदवी प्रथम वर्षाच्या १२० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली.

एनसीसी भरती प्रक्रियेसाठी ५२ महाराष्ट्र एनसीसी बटालियन बटालियनचे सुभेदार मेजर घनश्याम सिंग व आर्मी स्टाफ हवालदार ब्रिजेश यादव, सुधीर कुमार यांचे महाविद्यालयाच्या वतीने मेजर पंढरीनाथ घुगे, एनसीसी अधिकारी डॉ. सोपानदेव खरात, थर्ड ऑफिसर रजनीश ढाले उपस्थित होते. क्रीडा नैपुण्य, शारीरिक व शैक्षणिक गुणाच्या आधारावर राष्ट्रीय छात्र सेनेत इयत्ता अकरावी वर्गातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांची निवड करण्यात आली. एनसीसी मध्ये भरतीसाठी मुले व मुली यांनी धावण्यातील स्पर्धेत शर्थीचे प्रयत्न केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. विलास आघाव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मेजर पंढरीनाथ घुगे व आभार प्रदर्शन डॉ.प्रा. सोपानदेव खरात यांनी केले. अकरावी वर्गातील मुलांमध्ये युवराज शेळके, विशाल गोरे, आदर्श पाईकराव, शुभम पवार, चेतन इंगळे, मोहसीन नवरंगाबादी, प्रशांत जाधव, भगवान शिंदे, किशोर ठोंबरे, प्रदीप जाधव, पार्थ देवगीरकर, विठ्ठल शिंदे, शुभम घुमणार, विलास मंडगे, ओमकार केंद्रे, मुलींमध्ये ज्योती ठाकरे, प्रगती जाधव, पूजा झाटे, प्राची लोणकर, दिव्या लोंढे, संध्या लोंढे, पल्लवी गायकवाड, शिवानी काचगुंडे, कन्याकुमारी कोरडे, आकांक्षा खिल्लारे यांची प्राथमिक प्रवेश भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया ही नियमित सराव व आवश्यक कागदपत्रे या आधारावर बटालियनच्या सूचनेप्रमाणे पूर्ण करण्यात येणार आहे. भरती प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी सीनियर एनसीसी विद्यार्थी कृष्णा साबळे, आदिनाथ गाडगिल, विठ्ठल कदम, सोहेल नौरंगाबादी आदींनी परिश्रम घेतले.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# ‘ए’ झोनच्या क्षेत्रीय कार्यालयास आयुक्त मीना यांची भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ जुलै -** महापालिकेच्या ‘ए’ झोन क्षेत्रीय कार्यालयास आयुक्त मानसी मीना यांनी बुधवारी अचानक भेट देऊन पाहणी केली. या भेटीत आयुक्तांनी कार्यालयाची पाहणी करून अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना केल्या. नागरिकांकडून येणाऱ्या अडचणींचा किती दिवसांत निपटारा होतो, याची माहिती घेतली. कर वसुलीचाही आढावा घेतला.

पाणी, कचरा, वीज, रस्त्यांवरील खड्डे या संदर्भातील तक्रारींचे तत्काळ निवारण करावे. नागरिकांना मूलभूत सुविधा लवकर मिळतील यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना आयुक्त मीना यांनी यावेळी दिल्या. कार्यालय अंतर्गत झालेल्या अनधिकृत बांधकामांच्या तक्रारींवर कार्यवाही करावी. अतिक्रमणावर कार्यवाही करावी तसेच प्रभागातील सर्व घरांमध्ये दररोज घंटागाडी जाते का? याची पाहणी करावी, अशा सूचना त्यांनी केल्या. घंटागाडीमार्फत ओला व सुका कचरा वेगवेगळा संकलित होतो का? याची तपासणी करावी. प्रभागात जिथे नेहमी कचरा पडतो त्या ठिकाणांची पाहणी करून उपाययोजना कराव्यात. अतिवृष्टी झाल्यास जेथे पाणी तुंबून राहते ती ठिकाणे पाहून त्यावरील उपाययोजना कराव्यात. वादळी वाऱ्यामुळे मुख्य रस्ते, विजेच्या तारा आदींवर झाडे कोसळून वीज पुरवठा विस्कळीत होतो, वाहतूक खोळंबते. अशावेळी वाहतूक तसेच वीजपुरवठा सुरळीत करून नागरिकांना सुविधा देण्यासाठी सर्व विभागांशी समन्वय ठेवून तत्काळ उपाययोजना कराव्यात, असेही आयुक्त म्हणाल्या. कर्मचाऱ्यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित रहावे. उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.



## संक्षिप्त वृत्त...

### काँग्रेसकडून झोन प्रमुखांच्या नियुक्त्या; निवडणुकीची तयारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ जुलै -** काँग्रेसने महापालिकेच्या निवडणुकीसाठी कंबर कसली असून, संघटनात्मक तयारीला वेग आला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता, शहर काँग्रेस कमिटीने शहरातील विविध झोनसाठी पक्षीय झोनप्रमुखांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत.



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, आमदार अमित देशमुख आणि धीरज देशमुख यांच्या निर्देशानुसार, शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव यांनी या नियुक्त्या केल्या आहेत. ॲड. फारूख शेख यांना झोन ‘अ’ (प्रभाग १, २, ७, ८, ९), कैलास कांबळे यांना झोन ‘ब’ (प्रभाग ३, ४, ५, ६), तर सूर्यकांत कातळे यांना झोन ‘क’ (प्रभाग १०, ११, १२, १३, १४) ची जबाबदारी दिली आहे. झोन ‘ड’ (प्रभाग १५, १६, १७, १८) च्या प्रमुखाची निवड लवकरच केली जाईल. या नियुक्त्यांद्वारे काँग्रेस महापालिकेवर ‘तिरंगा’ फडकवण्यासाठी सरसावली आहे.

### रामेगाव येथील रामलिंगेश्वर विद्यालयात वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ जुलै -** रामेगाव (ता. लातूर) येथील श्री रामलिंगेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संस्थाध्यक्ष धनंजय देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त रविवारी विद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

प्रारंभी गुणाबाई अक्कांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियानांतर्गत विद्यालय परिसरात वेगवेगळ्या जातींचे वृक्ष लावण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे कार्यकारिणी सदस्य अमोल देशमुख, उपसरपंच भुषण देशमुख, सोसायटीचे चेअरमन भगीरथ देशमुख, माजी सरपंच श्रीराम आदमाने, दयानंद नागूलकर, बालासाहेब बिडवे, आकाश मगर, मुख्याध्यापक संजयकुमार घोडके, बाळासाहेब चव्हाण, शरद देशमुख, कल्याण राऊत, माधव शिंदे, बालासाहेब वाघमारे, विठ्ठल बनसोडे, अनिल देशमुख, प्रतिभा निपाणीकर, महादेवी मगर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. धनंजय देशमुख यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आला.

### तेरा हजार विद्यार्थ्यांचे अकरावी प्रवेश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ जुलै -** जिल्ह्यातील २२४ कनिष्ठ महाविद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात विज्ञान, कला, वाणिज्य या तीन शाखांना आजपर्यंत १२ हजार ८२९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. अकरावी प्रवेशाचा दुसरा राऊंड रविवारी सुरू झाला.

या दुसऱ्या फेरीसाठी १९ हजार ५९६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. अकरावी प्रवेशाचे एकूण पाच राऊंड होणार असून, अपेक्षित कनिष्ठ महाविद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी राऊंडमध्ये नोंदणी करीत आहेत. आजच्या तारखेपर्यंत कला शाखेसाठी ३७९६, वाणिज्य शाखेस १४३० तर विज्ञान शाखेस ७६०३ असे एकूण १२ हजार ८२९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. आता अकरावी प्रवेशाचा दुसरा राऊंड सुरू झाला असून, या जुलै महिन्यात प्रवेशाचे सर्व राऊंड पूर्ण होण्याची शक्यता आहे. सर्वाधिक प्रवेश विज्ञान शाखेत होत आहेत.

### पं. समितीची प्रभाग रचना जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ जुलै -** येथील पंचायत समितीची प्रारूप प्रभाग रचना सोमवारी जाहीर करण्यात आली. तालुक्यातील महापूर (आर्वी), भातांगळी, बोरी, महाराणाप्रताप नगर, बाभळगाव, गंगापूर, पाखरसांगवी, हरंगुळ बु. (हरंगुळ खु.), गातेगाव, काटगाव, तांदुळजा, गाधवड, मुरूड बु १ (मुरूड बु. २), निवळी, चिंचोली ब., एकूर्गा, चिंचोलीराव वाडी या पंचायत समिती गणांची प्रभाग रचना पार पडली.

# वीजपुरवठा : आजपासून ३० पर्यंत टप्प्याटप्प्याने राहणार बंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ जुलै -** शहरातील उत्तर परिसरातील उच्चदाब वीजवाहिन्या बदलणे, उपकेंद्रामधील देखभाल व दुरूस्ती करण्यासाठी १७ ते ३० जुलै या दरम्यान टप्पा-टप्प्याने ३३/११ केव्ही आर्वी, एमआयडीसी व जुने पॉवर हाऊस उपकेंद्रातून वीजपुरवठा होणाऱ्या वीजवाहिनीवरील परिसराचा वीजपुरवठा सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत बंद करण्यात येणार आहे. वीजग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

गुरुवार, १७ जुलै रोजी ३३ केव्ही आर्वी उपकेंद्रावरून वीजपुरवठा होणाऱ्या साईबाबा वीजवाहिनीवरील धायगुडेनगर, सह्याद्री अपार्टमेंट, कृष्णाई अपार्टमेंट, दत्तसहवास सोसायटी, बालाजी मंदिर, सूळ गल्ली, नांदगाव वेस, रामलिंगेश्वर मंदिर, वृंदावन पार्क, आदित्य संस्कृती, कृष्णकुंज सोसायटी, गवळी गल्ली, माउलीनगर, पटेल चौक, काळे गल्ली, सोलापूर गल्ली परिसराचा वीजपुरवठा सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत बंद राहील.



तसेच ११ केव्ही सुभाष चौक वीजवाहिनीवरील सुभाष चौक, हत्ते कॉर्नर, तापडिया मार्केट, भुसार लाइन, दयाराम रोड, कापड गल्ली, गांधी मार्केट, लाहोटी कंपाउंड परिसराचा वीजपुरवठा सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत बंद राहील.

२० व २७ जुलै रोजी ११ केव्ही शारदानगर, द्वारका व मेडिकल वीजवाहिनीवरील शारदानगर, रेणुकानगर, व्यंकटेशनगर, गोरक्षण, मणियारनगर, टाकेनगर, कल्पनानगर, कैलासनगर, जटाळ हॉस्पिटल भाग, श्रमसाफल्य सोसायटी, एस.पी. ऑफिस, मथुरा सोसायटी, केशवराज शाळा भाग, नवीन रेणापूर नाका ते शिवाजी महाराज चौक जाताना उजव्या बाजूचा भाग, बनसोडेनगर, काशीलिंगेश्वरनगर, देवगिरीनगर, भक्तीनगर, तिरुपतीनगर, नंदधाम सोसायटी, आर्वी गाव, साई रोड सर्व भाग, चांदतारा मस्जीद सर्व भाग, रामचंद्रनगर, व्यंकटेशनगर, अजिंक्य सिटी, मयुरबन सोसायटी, मधुबन मैत्री पार्क, बालाजी मंदिर भाग, जुना रेणापूर नाका, खोरे गल्ली, महापालिका भाग, तहसील, कोर्ट भाग, एस. टी. वर्कशॉप भाग, शिवाजी महाराज चौक परिसराचा वीजपुरवठा सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत बंद राहील.

तसेच २१ ते २४ जुलै या काळात अनुक्रमे ११ केव्ही हत्तेनगर, स्वामी समर्थ, गांधी चौक व गंगासागर या वीजवाहिनीवरील परिसराचा वीजपुरवठा सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत बंद राहील.

खंडीत वीजपुरवठ्याबाबत लातूर शहराच्या सनियंत्रण कक्षाच्या ७८७५७६२०२१ या मोबाइल क्रमांकावर २४ तास तसेच १९१२, १८००२१२३४३५ व १८००२३३३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधता येईल. वीजग्राहकांनी सदरील वेळेची दखल घेत सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# तीन लाखांचा गुटखा जप्त; पण आरोपी फरार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ जुलै -** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मंगळवारी रात्री शहरातील मळवटी रोडवरील एका खोलीवर छापा मारून ३ लाख १२ हजार रुपयांचा गुटखा जप्त केला. या प्रकरणी एकाविरुध्द विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांची चाहूल लागताच आरोपी फरार झाला असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी जिल्ह्यात मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तपास करत असताना, महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा अवैध विक्रीसाठी एका इसमाने खोलीमध्ये साठवून ठेवल्याची माहिती पथकाला मिळाली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पथकाने मंगळवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास लातूर शहरातील नाथनगरातील मळवटी रोड भागातील एका घरावर छापा मारून ३ लाख १२ हजार रुपयांचा गुटखा जप्त केला.

या प्रकरणी ईश्वर रमाकांत गुंडरे (रा. शाहू चौक, लातूर) याच्याविरुध्द विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांची चाहूल लागताच आरोपी फरार झाला असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

# खिसे कापणारा अट्टल चोर जेरबंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ जुलै -** बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या खिशातील रोख रक्कम चोरणाऱ्या गुन्ह्यातील अट्टल आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. आरोपीकडून ५० हजार रुपये रोख दुचाकी असा १ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करण्यात येत आहे. दरम्यान, पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीवरून बसमधील प्रवाशांच्या खिशातील पैसे चोरणारा इसम उदगीरमधील एका हॉटेलसमोर दुचाकीसह थांबला असल्याची माहिती मिळाली. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तत्काळ त्या ठिकाणी रवाना झाले.

रोडवर थांबलेल्या संशयित सचिन कसबे याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी करण्यात आली. त्याच्या ताब्यातील दुचाकीची झडती घेतली असता, डिक्कीत ५० हजार रुपये आढळून आले.

या रकमेबाबत विचारपूस केली असता, काही महिन्यांपूर्वी सदरची रक्कम उदगीर बसस्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशाच्या खिशातून चोरी केल्याची त्याने कबुली दिली. पथकाने चोरलेले ५० हजार रुपये आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण १ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपास उदगीर शहर पोलीस करत आहेत.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनातील या कारवाईत पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार संजय कांबळे, योगेश गायकवाड, सूर्यकांत कलमे, तुळशीराम बरुरे, चालक पोलीस अंमलदार चंद्रकांत केंद्रे यांनी सेवा बजावली.

# लातुरात अवैध सावकारी बोकाळली

## आमदार अमित देशमुख यांची कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ जुलै -** लातूर शहराच्या पूर्व भागात वाढलेल्या अवैध सावकारकीचा बंदोबस्त करावा, भरमसाठ व्याज वसूल करण्यासाठी गरीब, गरजू जनतेचा छळ करून त्यांच्यावर अत्याचार केले जात आहेत. या सर्व प्रकारणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी बुधवारी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी विधानसभेत केली.

पावसाळी अधिवेशनादरम्यान बुधवारी विधानसभेत बोलताना माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी अवैध सावकारीचा मुद्दा उचलून धरला. ते म्हणाले, अवैध सावकारीची महाराष्ट्रात गंभीर समस्या निर्माण झालेली आहे. लातूरमध्येही हा प्रश्न गंभीर आहे. वैध वित्त संस्थांकडून कर्ज पुरवठा होत नसल्यामुळे लातूर शहराच्या पूर्व भागात अवैध सावकारीचा सुळसुळाट झाला आहे. दाम दुप्पट व्याज वसुलीसाठी अवैध सावकारांकडून गरीब जनतेचा छळ होत आहे. प्रसंगी मुली, महिलांवर अत्याचार करण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. यासंबंधीच्या अनेक तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे यासंदर्भात सक्षम अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात यावी, सावकारीच्या परवान्यांची पडताळणी करून योग्य निर्णय घेतले जावेत, गंभीर स्वरूपातील अत्याचाराच्या घटनेबाबत विशेष पोलीस उपमहानिरीक्षक आणि पोलीस अधीक्षकांच्या पातळीवरून चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आमदार अमित देशमुख यांनी यावेळी केली.



या संदर्भात आवश्यक ती चौकशी करून योग्य कारवाई केली जाईल, अशी ग्वाही सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी यावेळी दिली.

# लातूर जिल्हा बँक सदैव शेतकऱ्यांच्या पाठीशी :देशमुख



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ जुलै -** शेतकऱ्यांची आर्थिक वाहिनी म्हणून लातूर जिल्हा बँक आपल्या मदतीसाठी तयार आहे. बँकेच्या विविध योजना राबवून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम करत असून, बँकेच्या माध्यमातून शुभमंगल, शैक्षणिक, पीक, ऊस, बचत गटाला कर्ज पुरवठा करण्यात येतो.

यापुढेही शेतकऱ्यांना अधिकाधिक कर्ज पुरवठा करण्यात येणार असून, शेतकरी सभासदांनी याचा लाभ घ्यावा. यासाठी जिल्हा बँक आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा बँकेचे मार्गदर्शक दिलीपराव देशमुख यांनी केले.

रेणापूर तालुक्यातील दर्जी बोरगाव येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे नूतन चेअरमन सदाशिव सुरवसे व व्हॉईस चेअरमन अर्जुन माने यांच्यासह संचालक मंडळाने बुधवारी दिलीपराव देशमुख यांची ‘आशियाना’ निवासस्थानी भेट घेतली. यावेळी शिष्टमंडळाने देशमुख यांचा सत्कार केला. त्यावेळी देशमुख बोलत होते.

यावेळी जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन ॲड. प्रमोद जाधव, रेणा कारखान्याचे व्हाईस चेअरमन ॲड. प्रवीण पाटील, बाळकृष्ण माने, दर्जी बोरगाव सोसायटीचे संचालक रामकिशन बरिदे, साहेबराव रोंगे, अच्युत काळदाते, गोविंद माने, रतन धावारे, लक्ष्मीबाई माने, सुग्राबी शेख, राधेश्याम चंबिले, श्याम खाडप, पदम ठाकूर, सचिन लोणकर आदी उपस्थित होते.

# सदानंद विद्यालयातील ६१ मुलींना मोफत पासचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ जुलै -** अहिल्यादेवी होळकर मोफत पास योजनेंतर्गत दत्तनगरातील श्री सदानंद विद्यालयातील ६१ मुलींना मोफत बस पासचे वाटप राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष मदन धुमाळ, मुख्याध्यापक सतीश हलगरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

लातूर शहरानजीकच्या चांडेश्वर, खोपेगाव, पेठ (ता. लातूर), बुधोडा (ता. औसा) येथून श्री सदानंद विद्यालयात शिक्षणासाठी येणाऱ्या सामान्य कुटुंबातील विद्यार्थिनींना मोफत एसटी पास देण्यात आले. याप्रसंगी एसटीचे विभाग नियंत्रक अश्वजीत जानराव, विभागीय वाहतूक अधिकारी संदीप पडवळ, आगारप्रमुख बाळासाहेब राठोड, हर्षद केंद्रे, शिक्षिका कल्पना पेद्दे, गणेश पांचाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. केंद्रे यांनी मुलींसाठी मोफत पास योजनेबाबत माहिती दिली. ते म्हणाले, जिल्ह्यातील शालेय विद्यार्थिनींना प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिकचे शिक्षण घेण्यासाठी शासनाकडून मोफत पास योजना राबविली जाते. या मोफत पास योजनेचा जास्तीत जास्त विद्यार्थिनींनी लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्रेनी केले. यावेळी मुख्याध्यापक हलगरकर, धुमाळ यांनी एसटी अधिकाऱ्यांचे आभार मानले.

# शिवराज पाटील चाकूरकर यांचे माजी आमदारांनी केले स्वागत



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ जुलै -** माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर हे लातूर दौऱ्यावर आले असता, भाजप नेते माजी आमदार शिवाजी पाटील कव्हेकर यांनी चाकूरकर यांच्या ‘देवघर’ या निवासस्थानी भेट घेऊन नुकत्याच झालेल्या गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून चाकूरकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत आशीर्वाद घेतले.

माजी आमदार शिवाजी पाटील कव्हेकर हे शिवराज पाटील चाकूरकर यांना गुरुतुल्य व्यक्तिमत्व मानतात. दरम्यान, चाकूरकर हे लातूर दौऱ्यावर आले असता, कव्हेकरांनी ‘देवघर’ निवासस्थानी त्यांची भेट घेऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली.

यावेळी जननायक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांत शेळके यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसर संचालकपदी बुके यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ जुलै -** नुकतेच एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसर संचालक (कॅम्पस डायरेक्टर) पदी डॉ. मोहन बुके यांची संस्थेतर्फे नियुक्ती करण्यात आली.

डॉ मोहन बुके यांनी यापुर्वी प्राध्यापक, विभाग प्रमुख, प्राचार्य पद तसेच अनेक शैक्षणिक व प्रशासकीय जबाबदाऱ्या अतिशय यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. संपुर्ण शैक्षणिक कारकिर्दीत नेहमी विद्यार्थी केंद्रित व शिस्तप्रिय भुमिका घेत अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे.

महाविद्यालयांमध्ये महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी यांनी त्यांचे या नियुक्तीबद्दल स्वागत व अभिनंदन केले. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ ज्योती पाटील, उपप्राचार्य प्रा. विरभद्र बाळे तसेच महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरात अभियांत्रिकी पदवी सोबतच डिप्लोमा, बीसीए, एमसीए तसेच एमबीए हे शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू आहेत. विद्यार्थी संख्याही मोठ्या प्रमाणात आहे. संपुर्ण परिसरात शिस्त रहावी तसेच महाविद्यालयाची शैक्षणिक परंपरा कायम राखत यापुढेही अधिकाधिक प्रगती होईल यासाठी प्रयत्नशील रहाणार असल्याचे डॉ मोहन बुके यांनी मनोगत व्यक्त केले.

# हडपसर-हरंगुळ व पुणे-अमरावती गाड्यांना मुरुड स्थानकावर थांबा द्या

## रेल्वे संघर्ष समितीची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१७ जुलै -** हडपसर-हरंगुळ व पुणे-अमरावती गाड्यांना मुरुड रेल्वे स्थानकावर थांबा देण्यात यावा, अशी मागणी रेल्वे संघर्ष समितीच्यावतीने मध्य रेल्वेच्या वरिष्ठ मंडल वाणिज्य प्रबंधक, सोलापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मुरुड हे ५० हजार लोकसंख्येचे शहर असून, आजूबाजूच्या ५० ते ६० गावांचा रोजचा संपर्क आहे. मुरुड ही मोठी व्यापार व बाजारपेठ आहे. यासोबतच मोठ्या प्रमाणात शैक्षणिक संकुल व आरोग्यसेवाही उपलब्ध आहेत. लातूरहून मुरुड मार्गे पुणे-मुंबईला किमान १५० ट्रॅव्हल्स दररोज ये - जा करतात. त्याद्वारे मुरुड येथून व आजूबाजूच्या परिसरातून मोठ्या संख्येने प्रवासी खासगी ट्रॅव्हल्सने किंवा इतर वाहनाने प्रवास करतात.

लातूर-धाराशिव या दोन रेल्वेस्थानकामध्ये मुरुड रेल्वेस्थानक येते. हरंगुळ रेल्वेस्थानक ते धाराशिव रेल्वेस्थानक हे ७८ किलोमीटरचे तर, लातूर रेल्वेस्थानक ते धाराशिव रेल्वेस्थानक ९० किलोमीटरचे अंतर आहे. शिक्षणासाठी विद्यार्थी, पालक हे मुरुड-पुणे प्रवास करतात. तसेच पुणे येथे मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत असल्याने रोजगारानिमित्त युवक-युवती पुणे ते मुरुड प्रवास करतात.

रेल्वे प्रवास सुरक्षित व कमी पैशात होत असल्यामुळे लोकांची रेल्वेने प्रवास करण्याची इच्छा असते. मात्र, सदरील रेल्वे ह्या मुरुड स्थानकावर थांबत नसल्यामुळे नागरिकांना अतिरिक्त पैसे देऊन खासगी ट्रॅव्हल्सने किंवा इतर खासगी वाहनाने प्रवास करावा लागत आहे.

हडपसर-हरंगुळ व अमरावती-पुणे या दोन गाड्यांना मुरुड स्थानकावर थांबा दिल्यास नागरिकांची मोठ्या प्रमाणात सोय होणार आहे.

मुरुड व परिसरातील या परिसरातील नागरिकांची गरज लक्षात घेता, सदरील दोन गाड्यांना मुरुड रेल्वे स्थानकावर थांबा द्यावा, अशी मागणी रेल्वे संघर्ष समितीच्यावतीने समन्वयक लक्ष्मीकांत तवले यांच्यासह अन्य सदस्यांनी निवेदनाद्वारे रेल्वेच्या प्रबंधकांकडे केली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जालन्याला पुन्हा एक मिळणार वंदे भारत रेल्वे

## रावसाहेब दानवे यांच्या प्रयत्नाने जालन्यातील जनतेला मिळणार नवी रेल्वे गाडी भारत एक्सप्रेस

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

माजी केंद्रीय रेल्वे मंत्री रावसाहेब दानवे यांच्या प्रयत्नाने जालन्याला मिळणार अजून एक वंदे भारत रेल्वे छत्रपती संभाजीनगर – पुणे दरम्यान वंदे भारत एक्सप्रेसची भेट.



पुणे–शेगाव वंदे भारत ट्रेन धावणार छत्रपती संभाजीनगर जालना मार्गे भारतीय रेल्वेने पुणे–शेगाव दरम्यान धावणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसमध्ये छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), जालना या महत्त्वाच्या शहराचा थांबा निश्चित केला आहे. त्यामुळे आता जालना..छत्रपती संभाजीनगर–पुणे प्रवास वंदे भारतद्वारे अधिक जलद व सुसज्ज होणार आहे. नुकतंच पुण्याहून चार विविध शहरांना जोडणाऱ्या वंदे भारत रेल्वेची घोषणा झाली. यापैकी पुणे – शेगाव ट्रेन ही अहिल्यानगर, मनमाड, छत्रपती संभाजीनागर, जालना मार्गे धावणार असल्याची माहिती पुढे आली आहे. रेल्वे मंत्रालयाच्या या उपक्रमामुळे संपूर्ण मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील प्रवाशांना जलद, आरामदायी आणि आधुनिक प्रवास अनुभवता येणार आहे. या आधीच, मुंबई–जालना वंदे भारत एक्सप्रेसला नांदेडपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला गेला होता. त्यामुळे मराठवाड्यातील जालना, परभणी आणि नांदेड या शहरांना वंदे भारतसारखी गतिमान सेवा उपलब्ध झाली आहे. लवकरच या मार्गावर नव्या वंदे भारत ट्रेनच्या वेळा–पत्रकाची आणि अधिकृत घो–षणा होण्याची अपेक्षा आहे.

# जालन्यात दुचाकी चोरी करणारे दोघे जेरबंद; सदर बाजार पोलिसांची कारवाई

## ५ लाख २० हजार रुपये किंमतीच्या ८ दुचाकी कारवाईत जप्त

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालन्यात दुचाकी चोरी करणाऱ्या दोघांच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. जालन्याच्या सदर बाजार पोलिसांनी ही कारवाई केलीय. दिनांक १५/०७/२०२५ रोजी पोलीस ठाणे सदर बाजार डिबी चे पोहेकों आर डी रंगे यांच्याकडे तपासावर आसलेल्या गुन्हयामधील चोरीस गेलेली मोटार सायकल ही लोधीमोहल्ला जालना येथील एका संशईत ईसमाने चोरी केलेली आहे अशी गोपनिय बातमीदारा मार्फत खात्रीलायक माहिती मिळाल्याने पोनिरिक्षक संदीप भारती यांचा मार्गदर्शनाखाली डो बी पथक प्रमुख पोउपनि शैलेश म्हस्के व स्टाफचे पोहेको रंगे, पोहेकॉ जाधव, पोकों गोफणे व दोन पंचासह मिळालेल्या माहितीवरुन लोधीमोहल्ला येथे जावून संशईत ईसम नामे ।1। गितेश ऊर्फ गितु अमरसिंग राजपुत वय २२ वर्ष । लोधीमोहल्ला





जालना २) निलेश राजेश बनसोडे वय २१ वर्ष रा. कोष्टीगल्ली जालना हे मिळून आले त्यांना विश्वसात घेवून विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली परंतु गुन्हयातील मोटार सायकल कुठे आहे याबाबत त्यांनी पहीले उडवा उडवीचे उत्तरे दिल्याने त्यांना पी सी आर यादीसह मा. न्यायालयात हजर केले असता त्यांना मा. न्यायलयाने दिनांक १९/०७/२०२५ रोजी पी सी आर दिल्याने त्यांना लॉकअप बाहेर काढून गुन्हयातील मुददेमाला सबंधाने विचारपुस केली असता त्यांनी पोस्टे सदर बाजार हदीतुन व ईतर पोस्टें हदीतुन एकुन ०८ मोटार सायकली चोरल्याची कबुली देवुन सदर गुन्हयातील मोटार सायकल व ईतर मोटार सायकली हया एस आर पी एफ पाण्याच्या टाकीशेजारी वनीकरणातील दाट झुडपामध्ये कोणालाही दिसणार नाहीत अशा ठिकाणी लपवुन ठेवल्याचे सांगीतल्याने आजरोजी ५२०००० रुपये किमतीच्या वेगवेगळ्या कंपनीच्या व वर्णनाच्या एकुन ०८ मोटार सायकली त्यांनी काढुन दिल्या आहेत. सदर ०८ मोटार सायकलपैकी ०१ गुन्हा सदर बाजार येथे व ०१ गुन्हा कदीम जालना येथे दाखल आहे सदर बाजार जालना येथील गुन्हयाचा तपास पोहेकों आर डी रंगे हे करीत आहे.

सदरची कामगीरी मापोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल साहेब, अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकणी यांचे मार्गदर्शनाखालो व पोलीस निरीक्षक संदीप भारती यांचे नेतृत्वात डी बो. पथकाचे प्रमुख पोउपनि शैलेश म्हस्के, पोहेकी रामप्रसाद रंग, पोहेकी जगन्नाथ जाधव, पोहेकों धनाजी कावळे, पोहेकों नजीर पटेल पोको भगवान मुंजाळ पीकी जिम शेख, पोको गोफणे पोकों गणेश नेजनकर, पोको राहुल कटकम, चालक पोकों काळे चालक पोकों कल्पेश पाटील यांनी केली.

# संक्षिप्त

## काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमुद राष्ट्रवादीत प्रवेश करणार

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमुद यांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला असून ते गुरूवार दिनांक १८ जुलै रोजी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश करणार आहेत.

शेख महेमुद यांनी ३० वर्षे काँग्रेसमध्ये विविध पदावर कार्य केले असून जालना विधानसभा तसेच लोकसभा, नगर पालिका निवडणुकीत त्यांनी अथक परिश्रम घेत पक्षाला यश मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. फुले– शाहू– आंबेडकर चळवळीचे ज्येष्ठ कार्यकर्ते म्हणून त्यांनी सामाजिक सद्भावना वाढीसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. जालना शहरात मुस्लिम– दलित – ओबीसी फोरमच्या माध्यमातून त्यांनी महा–पुरुषांच्या विचाराची पेरणी करून जालना शहरातील मुस्लिम–दलित– ओबीसी समाजात महापुरुषांच्या विचाराची नवीन फळी निर्माण केली आहे.

जालना शहरातील काँग्रेसचे स्थानिक नेतृत्व हे भाजप विचारसरणीचे आहे, ही बाब आपण पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करुन निदर्शनास आणून दिली आहे, मात्र पक्षश्रेष्ठींने आपल्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले असल्याचे शेख महेमुद यांनी सांगितले.राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे धर्मनिरपेक्ष विचारधारेचे असल्याने आपण राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. आपण काँग्रेस पक्षाच्या आपल्या पदाचा राजीनामा प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे सुपूर्द केला असून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत व राष्ट्रवादी काँग्रेसचे जालना जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वात गुरुवार दिनांक १८ जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याचे शेख महेमुद यांनी सांगितले.

दरम्यान, शेख महेमुद यांच्या काँग्रेस पक्षाच्या सोडचिठ्ठीने आगामी महापालिका तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मोठा फटका बसणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

## उल्लेखनीय कार्याबद्दल राजेश लुणीया यांना बेस्ट झोन चेयरपर्सन पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

प्रान्त ३२३३ एच २ मध्ये उल्लेखनीय कार्याबद्दल झोन चेयरपर्सन लायन राजेश लुणीया यांना बेस्ट झोन चेयरपर्सन हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार प्रांतपाल गिरीश सिसोदिया आणि प्रांतीय कोषाध्यक्ष जयेश ललवाणी यांच्या प्रदान करण्यात आला. वर्ष २०२४–२५ मध्ये राजेश लुणीया यांनी उल्लेखनीय कार्य करत सेलू, छत्रपती संभाजीनगर एमआयटी ऊर्जा आणि जालना प्रारंभ हे तीन नवीन लायन्स क्लब प्रांतात सुरू केले. याचबरोबर लायन्स क्लबस इंटरनॅशनल फाउंडेशनसाठी तब्बल ३५०० डॉलर्सचे योगदान त्यांनी त्यांच्या झोनमार्फत संकलित करून दिले. संपूर्ण वर्षभर, एकही दिवस न थांबता त्यांनी सेवाकार्याचे नेतृत्व केले. लुणीया यांच्या मार्गदर्शनाखाली लायन्स क्लब जालना, परतूर, अंबड, जालना मर्चंट सिटी, सेलू, छ.संभाजीनगर एमआयटी ऊर्जा आणि जालना प्रारंभ या सात क्लबच्या संयुक्त सहभागातून अनेक सेवाप्रकल्प राबवले गेले. त्यातील सर्वात महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे २३०० मुलींना सर्वाइकल कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण, ज्याची व्यापक दखल प्रांतस्तरावर घेतली गेली. लॉयनिजमला नवी दिशा देणारे नेतृत्व राजेश लुणीया यांच्या माध्यमातून घडले आहे. या गौरवप्रसंगी प्रांतीय मार्केटिंग समन्वयक अतुल लढ्ढा, जयश्री लढ्ढा, मंजू श्रीमाली व सपना लुणीया उपस्थित होते.

# भोकरदन तालुक्यातील १२४ ग्रामपंचायतींची आरक्षण सोडत

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

तालुक्यातील १२४ ग्रामपंचायतींच्या आगामी पाच वर्षांसाठी सरपंच पदाचे आरक्षणाची सोडत सोमवारी सकाळी तहसील कार्यालयाच्या सभागृहात उपजिल्हाधिकारी मनीषा दांडगे व भोकरदनचे प्रभारी तहसीलदार अविनाश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कुमारी प्रज्ञा प्रमोद कांबळे या शाळकरी विद्यार्थिनीच्या हस्ते आरक्षणनिहाय चिठ्ठ्या काढून सोडत काढण्यात आली. यादरम्यान, प्रत्येक ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी आरक्षणनिहाय चिठ्ठ्या तयार करण्यात आल्या होत्या. या चिठ्ठयांद्वारे सरपंच पदे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय व सर्वसाधारण प्रवर्गामध्ये वाटप करण्यात आले.५०% ग्रामपंचायतींचा कारभार महिला सरपंच बघणार आहेत. यावेळी पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार सदानंद नाईक महसूल अधिकारी अमोल पाटील, पंकज बोटुळे, निवडणूक विभागाचे पेशकार गणेश सपकाळ यांच्यासह निवडणूक विभागाच्या कर्मचाऱ्यांची व ग्रामपंचायत सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. विविध प्रवर्गासाठी ग्रामपंचायतचे सरपंच पदाचे आरक्षण



पुढीलप्रमाणे आहे.

अनुसूचित जाती : दानापूर,चिंचोली, कोठा कोळी, बरंजळा साबळे, धावडा, मलकापूर, वडोद तांगडा, कठोरा बाजार. अनुसूचित जाती स्त्री प्रवर्गासाठी खामखेडा, शिरसगाव, वालसा डावरगाव, पळसखेडा मुर्तड, बाभूळगाव, लिहा गारखेडा, सोयगाव देवी. अनुसूचित जमाती मेहगाव, लिंगेवाडी, पोखरी अनुसूचित जमाती स्त्री दगडवाडी, सावंगी अवघडराव, पिंपळगाव थोटे, नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री : कठोरा जैनपूर, नळणी बु. पळसखेडा पिंपळे, लोणगाव, तांदूळवाडी, केदारखेडा, हसबाद, पेरजापूर, सुरंगळी, जवखेडा ठोंबरी, टाकळी भोकरदन., पिंपळगाव सुतार जवखेडा बुद्रुक, पारद बुद्रुक, वजीरखेडा, आडगाव, वालसावंगी, नागरिकांचा मागास प्रवर्ग : पळ सखेडा दाभाडी, राजूर, उमरखेडा, वडशेद, बोरगाव जहांगीर, मुठाड, जवखेडा खुर्द, गोकुळ, सीपोरा बाजार, जळगाव सपकाळ, नळणी खुर्द, पिंपळगाव शेर, धोंडखेडा, कोदा. सर्वसाधारण स्त्री चांदई टेपली, रेलगाव, कुंभारी, पिंपरी, मालखेडा, तडेगाव, इब्राहिमपूर, पिंपळ–गाव कोलते, सुभानपूर, दावतपूर, भाईडी, शेलूद, पद्मावती कोदोली, चांदई ठोंबरी, तपोवन, हिसोडा खुर्द जानेफळ दाभाडी, कोसगाव, एकेफळ, कोपरडा नांजा, खंडाळा, लतिफपूर, देहेड, भिवपूर, मनापूर, विझोरा, चोर– ाळा, आव्हाना, बेलोरा, फत्तेपूर जयदेववाडी, आलापूर. सर्वसाधारण : कोठा जहागीर, निमगाव, थिगळखेडा, खापरखेडा, कोठा दाभाडी, गव्हाण संगमेश्वर, शिरसगाव मंडप, पळसखेडाठोंबरी, गोदरी, कल्याणी, गोशेगाव, करजगाव, वरुड बुद्रुक, रजाळा, खडकी, बाने–गाव, मोहळाई, चांदई एक्को, वाडी बुद्रुक, माळेगाव, पारद खुर्द, विटा रामनगर, वालसा वडाळा, वालसा खालसा पिंपळगाव रेणुकाई, पाडा, हिसोडा बुद्रुक, बरंजळालोखंडे, सावखेडा, निंबोळा कोळेगाव, अनवा कारला वाडी, दहिगाव, वाकडी, भोरखेडा आधी गावाचा समावेश आहे,

# अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा जालना जिल्हा दौरा

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर (राज्यमंत्री दर्जा) या शुक्रवार दि.१८ जुलै २०२५ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

शुक्रवार दि.१८ जुलै २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता जालना येथील शासकीय विश्रामगृहात आगमन



व राखीव. सायंकाळी ५ वाजता जालना येथील वन स्टॉप सेंटरला भेट व आढावा बैठकीस उपस्थिती. सायंकाळी ६ वाजता जालना येथून हिंग–ोलीकडे प्रयाण करतील.

# घरात पाणी शिरलेल्या वृद्धेने मांडली अर्जुन पाडेवार यांच्यासमोर व्यथा!

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

बुधवारी मध्यरात्री जोरदार पावसाने शहर परिसराला झोडपून काढले. पंजेतन गल्लीत राहणाऱ्या एका वृद्ध महिलेच्या घरात पावसाचे पाणी शिरले. त्या माऊलीने संपूर्ण रात्र कशी–बशी जागून काढली. भल्या पहाटे ती सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांच्या घरी पोहोचली. नाल्याचे पाणी घरात शिरले आहे. पाण्यात सर्व वस्तू भिजल्या आहेत.काही वस्तू खराब झाल्या आहेत.खाण्या–पिण्याच्या वस्तूही खराब झाल्या आहेत.आता काय करावे..... काय खावे अशी व्यथा त्या माऊलीने पाडेवार यांच्यासमोर मांडली.

पाडेवार यांनी शांतपणे महिलेचे म्हणणे ऐकून घेतले.विश्वासात घेत सर्व समस्या सोडवतो असे सांगितले. त्याचवेळी नगरलिकेला नव्यानेच लाभलेले मुख्याधिकारी विशाल पाटील यांना दूरध्वनीवर ही



समस्या सांगितली. त्यांनी पाडेवार यांच्या मागणीची तात्काळ दखल घेतली. स्वच्छता निरीक्षक सतीश पांजगे यांना वृद्ध महिलेच्या घरात साचलेल्या पावसाच्या पाण्याची तातडीने विल्हेवाट लावण्याच्या सुचना दिल्या. पांजगे यांनी क्षणाचाही विलंब न लावता स्वच्छता कर्मचाऱ्यांची यंत्रणा कामाला लावली. पुढील थोड्याच वेळात घरात साचलेले पाणी बाहेर काढण्यात आले.पाडेवार यांनी केलेले सहकार्य पाहून वृद्ध महिलेच्या डोळ्यात पाणी आले. त्याच क्षणी पाडेवार यांच्या डोळ्याच्या कडाही पाणावल्या.

मागील अनेक वर्षांपासून नगरपालिकेची निवडणूक झालेली नाही. त्यामुळे पालिकेला नगरसेवक, नगराध्यक्ष असे कारभारी नाहीत. मागील अनेक वर्षात पालिकेला पूर्णवेळ मुख्याधिकारी लाभलेले नाहीत. त्यामुळे पालिकेत कुणाचेच कुणावर नियंत्रण नाही. नागरिकांची कामे खोळंबली आहेत. शहरात नागरी समस्या वाढल्या आहेत.

अशा परिस्थितीत समस्या सोडविण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार हाच एकमेव आशेचा किरण नागरिकांसमोर आहे.

# एक्युप्रेशर, सुजोक, वायब्रेशन व चुंबकीय थेरपी शिबिरात चारशे जणांवर उपचार



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना माहेश्वरी समाज दैनिक आनंद नगरी परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने १ ते १५ जुलैदरम्यान महेश भवन आणि भारती लॉन्स या दोन ठिकाणी घेण्यात आलेल्या एक्युप्रेशर, सुजोक, वायब्रेशन व चुंबकीय थेरपी शिबिरात ४०० पेक्षा अधिक रुग्णांची तपासणी व मोफत नैसर्गिक उपचार करण्यात आले.

या शिबिरात थेरेपिस्ट सुभाष सोनूने, सौ. स्वाती काळे, कार्तिक काळे यांनी मणक्याचे विकार, सायटिका, सांधेदुखी, पाठीचा त्रास, अर्धांगवायू, लकवा, टेंशन व डिप्रेशन, श्वासोच्छ्वासाचे विकार, मधुमेह, ब्लड प्रेशर, थायरॉईड, ॲसिडिटी, पचनविकार, गॅसवजन वाढणे / कमी होणे, कान, नाक, घसा यांचे विकार, अर्धशिशी, मेंदूशी संबंधित विकार, स्त्रीरोग, मासिक पाळीचे त्रास, हात–पायाला मुंग्या येणे, नसा आखडणे, डोळ्यांचे त्रास व दृष्टीदोष, लहान मुलांचे वाढीचे त्रास, पचन बिघाड आदी विकारावर कोणत्याही औषधाविना संपूर्ण नैसर्गिक उपचार व मार्गदर्शन केले. कांस्य थाळी (फूट मसाज) या नव्या संकल्पनेतून अनेक आराम मिळाल्याच्या प्रतिक्रिया अनेक रुग्णांनी यावेळी दिल्या. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी आनंद नगरीचे मुख्य संपादक शिवरतन मुंदडा, संपादक रवींद्र बांगड, जालना माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय गो. राठी, सचिव उमेश बजाज, विनोद बियाणी, पुसाराम मुंदडा, महेश सारडा, सुनिल बियाणी, सतिश राठी, शिवप्रसाद गट्टाणी संतोष सारडा, ललित चेचानी, राजेंद्र मंत्री, महेंद्र लढ्ढा, डॉ आशुतोष सोनी, आर आर मंत्री, शाम लखोटिया, सुधिर मंत्री, प्रा. स्व–प्निल सारडा, रामेश्वर मंत्री, सुभाष झंवर, द्वारकादास चेचाणी, सुभाष सोनुने, शांतिलाल सकलेचा, मनोज बजाज, जितेन्द्र मुंदडा आदी पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# धर्माच्या रक्षणासाठी जातीभेद विसरुन एकत्र येण्याची गरज

## मराठवाड्यातून विदर्भापर्यंत धर्म संस्कृती व राष्ट्रचैतनेचा ऐतिहासिक व पवित्र संकल्प

**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

सद्यस्थितीत आपला सनातन हिंदू धर्म हा अनेक संकटांना सामोरे जात आहे यामध्ये धर्मांतर हा विषय प्रामुख्याने आहे लव्ह जीहाद यासारख्या घटना आपल्याला आव्हान देत आहेत पश्चिम बंगालमधील हिंदू वर होत असलेल्या अत्याचारा असो की जळत असलेले मणिपूर याला कारण फक्त विखुरलेला आहे मी समाज आपण बहुसंख्यांक असून सुद्धा आपल्यावरच याचे आघात होत आहेत भारत मातेच्या रक्षणासाठी आपल्याला एक संघ राहावे लागेल जातीभेदाच्या भिंती तोडून आपण सर्व हिंदू आहोत प्रत्येक हिंदू हा माझा बंद आहे हा भाव जोपर्यंत आपल्या मनात निर्माण होत नाही तोपर्यंत आपण सुरक्षित नाहीतआपली एकीचीवज्रमूठ समोरच्याला जागेवर बसू शकतेअखंड भारताचा



इतिहास आपण जर बघितला तर आपण अधिक प्रमाणात गमावून बसलेला भाग आहे इराण आपले होते आपण बांगलादेश गमावून बसलो आपण पाकिस्तान गमावून बसलो नेपाळची पण फारशी परिस्थिती चांगली नाही जगाच्या पाठीवर एकमेव असलेले हिंदू राष्ट्र टिकवायचे असेल तर जातीभेदाच्या भिंती तोडून आपल्याला एक संघ राहाव लागेल असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कथावाचक विवेक दास शास्त्री महाराज यांनी आज तळणी येथे केले यावेळी बोलताना त्यांनी या यात्रेचा उद्देश उपस्थित त्यांना सांगितला ही यात्रा सांस्कृतिक अस्तित्व व हिंदू समाजाला जागृत करण्यासाठीच काढली आहे ही यात्रा धर्मनिष्ठा संघटनव आत्मगौरव पुन्हा जागविणारा जनजागरणाचा महाअभियान ठरेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला

ही यात्रा कोण्या धर्माच्या विरुद्ध नाही ही यात्रा फक्त आणि फक्त हिंदुत्वासाठी आहे गायीच्या संरक्षणासाठी आहे आज हजारो गाईंची कत्तल होत असताना सुद्धा झोप–लेला हिंदू समाज याकडे कधी डोळे उघडून बघणार छत्रपती शिवाजी महाराजांनी सुद्धा धर्माच्या रक्षणासाठी कार्य केले धर्मवीर संभाजी महाराजांनी सुद्धा आपले बलिदान धर्मासाठी दिले आपण त्यांचा आदर्श घेणार तरी कधी त्यांच्या त्यागामुळेच आपण आज सुरक्षित आहोत परंतु त्यांनी केलेले कार्य मात्र आपण विसरत चाललो आह–ोत

या यात्रेचा हेतू केवळ धार्मिक नसूनराष्ट्रीय सांस्कृतिक पुनर्जागरणाचा ही आहे हिंदू राष्ट्राची संकल्पना श्रीकृष्ण जन्मभूमीमुक्ती आंदोलनकाशी विश्वनाथ ज्ञान वापी यासारख्या पवित्रअस्मितेचे रक्षण करण्यासाठी या यात्रेची संकल्पना आहे. भारत मातेच्या सरक्षणासाठी अनेकांनी आपले बलीदान या मातृभूमी साठी दिले आहे सध्याचा तरुण हा बेभान होवून जात आहे त्यांना संस्काराची गरज आहे . भारताची अस्मीता असलेल्या राममंदीराला सुद्धा पाचशे वर्ष संघर्ष करावा लागला . हिंदू धर्मावर अनेक आघात होत गेले परंतू आताची परिस्थिती वेगळी आहे हिंदु समाजाला पोखरण्याचे काम सुरू आहे यासाठी आपण प्रत्येकाने सावध राहावे लागणार आहे तरच आपले अस्तित्व टिकून राहील आपली संस्कृती टिकली तरच आपला देश टिकेलयासाठी आपली एकीची वज्रमुठ असणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन ह भ प गजानन महाराज सपकाळ यांनी यावेळी व्यक्त केले व्यासपीठावर अनेक महाराज मंडळींची उपस्थिती होती या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी यात्रेचे स्वागत दत्त मंदिर संस्थान पासून ते तळणी बस स्टॅन्ड पर्यंत ठिकठिकाणी करण्यात आलेरांगोळ्या व फटाक्याच्या आतिषबाजी यावेळी करण्यात आली महाप्रसाद घेतल्यानंतर यात्रा विदर्भाकडे प्रस्थान केली.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जिल्ह्यातील अनेक पतसंस्थांनी ठेवीदारांना चुना लावला

# श्री रेणुका माता पतसंस्थेने बीड जिल्ह्याचा विश्वास संपादन केला

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ जुलै**

श्री रेणुका माता पतसंस्थेने मराठवाडा नाही तर पूर्ण राज्यभर आपल्या गुणवत्तापूर्ण कामामुळे मोठी विश्वासर्हता निर्माण केली आहे.याच धर्तीवर पतसंस्थांचे काही खरे नाही अशी मानसिकता झाली असतांना श्री रेणुका माता पतसंस्थेकडून प्रत्येक शाखेच्या ठिकाणी मोठ्या दिमाखात लोण मेळावे आयोजित करून पतसंस्थेने ठेवीदारांचा विश्वास कसा संपादन करावा व प्रामाणिकपणे ठेवीदारांच्या ठेवी कशा जपून कर्जदारांना कर्ज देऊन त्यांच्यामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचा एक आदर्श निर्माण श्री रेणुका माता पतसंस्थेच्या माध्यमातून होत असतांना दिसत आहे. नगर जिल्ह्यात सुरूवात केलेली श्री रेणुका माता पतसंस्था डॉ.प्रशांत भालेराव यांच्या कुशल कार्यशैलीने याचा वटवृक्ष निर्माण झाला आहे. मराठवाड्यातच नव्हे तर राज्यात ही संस्था विश्वासर्हतेने काम करत आहे. व्यावसायिकांना बोलावून कर्ज देणारी बहुधा हीच एक पतसंस्था असावी असे दिसून येत आहे. बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यामध्ये यांच्या शाखा आहेत. प्रत्येक शाखेच्या ठिकाणी




अतिशय विश्वासपूर्ण वातावरणामुळे कर्ज मेळावे घेऊन त्यांनी कार्यातून दाखवून दिले की आमची विश्वासर्हता हा ठेवीदार आणि कर्जदारच आहे.

बीड जिल्ह्यातील मल्टीस्टेट संस्थेने अनेक ठेवीदारांना अक्षरशः लुटून खाल्ले आहे. अनेकांचे या ठेवी अडकल्याने मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न तर काही ठेवीदारांवर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे तर काहींनी आत्महत्या केल्या आहे. या पतसंस्थांची जिल्ह्यामध्ये नाही तर मराठवाड्यात फार मोठ्या प्रमाणात बदनामी होऊन विश्वासर्हता गमावली आहे. येथील ज्ञानराधा पतसंस्था, मॉ साहेब, राजस्थानी पतसंस्था, छत्रपती पतसंस्था गेवराई, साईराम पतसंस्था यांसह इतर पतसंस्थांनी ठेवीदारांना विश्वास देऊन फसवणूक केली आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील पतसंस्थावरचा विश्वास उडाला आहे. याला अपवाद श्री रेणुका पतसंस्था खंबीरपणे मैदानात राहून जनतेचा ठेवीदार आणि कर्जदारांचा विश्वास संपादन करून मोठ्या प्रमाणात कर्ज देणे, ठेवी स्विकारण्याचे काम जोमात सुरू आहे. ही पतसंस्था जनतेच्या विश्वासास ठरत असल्याचे त्यांच्या उपक्रमातून दिसून येते.

# माजलगाव बस स्थानकातून दीड तोळ्याचे गंठण चोरीस

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१७ जुलै**

माजलगाव बस स्थानक येथें बस मध्ये बसत असताना सौ सरला जाजू यांचे दीड तोळ्याचे आजच्या बाजार भावा प्रमाणे अंदाजे दीड लाख रु चे मंगळसूत्र अज्ञात चोरट्यानी चोरल्याची घटना बुधवारी १६ रोजी सकाळी ९ वाजता घडली.

याबाबत माजलगाव शहर पोलीस ठाण्यात सौ जाजू यांनी दिलेल्या फिर्यादी मध्ये दि १६ रोजी सकाळी अंदाजे ९ वाजता बीड कडे जाण्यासाठी महामंडळाच्या इलेक्ट्रिक बस मध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात व्यक्तीने गळ्यातील दीड तोळ्याचे मंगळसूत्र चोरले असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय सहिंता कलम ३०३ नुसार गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास हेड कॉन्स्टेबल गोविंद पाखरे हे करत आहेत.

शहरात पाकीटमार गठन चोर यांची संख्या वाढली असून माजलगाव बस स्थानकात पोलीस कर्तव्य बजावत असल्याचे कवचित दिसते यामुळे चोराचे फावत आहे शिवाय बस स्थानक नूतनिकरणाचे काम सुरु झाल्यामुळे बस स्थानक परिसरातील सी सी टी व्ही मंगळवारी रात्रीच काढण्यात आले आहे.यामुळे येणाऱ्या काळात चोरांचे चांगलेच फावले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.



शेवगाव निवासी श्री संत गजानन महाराज यांची पालखी आषाढी वारी करून परतीच्या मार्गावर असतांना आज बीड शहरात मुक्कामी आहे.बालाजी मंदिर पेठ बीड या ठिकाणी दुपारच्या भोजनासाठी विसवली असता शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना दोन हजार मोतीचूर लाडू चे वाटप केले. यावेळी संजय महाद्वार, नवनाथ प्रभाळे, पंकज कुटे, राजाभाऊ माहुवाले, संदीप उबाळे, राजाभाऊ हुरकुडे, गणेश लोणकर, सतीशसिह परदेशीं, दिलीप पवार, रंगनाथ पैठणकर सह शिवसैनिक उपस्थित होते.

# अंबाजोगाईत पावसाची जोरदार हजेरी : शेतकऱ्यांना दिलासा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१७ जुलै**

हवामान विभागानं वर्तविलेल्या अंदाजानुसार, अंबाजोगाई शहरांसह परिसरात बुधवारी दुपारपासून पावसानं जोरदार हजेरी लावली. गेल्या काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्यामुळे प्रचंड उकाडा वाढल्याने नागरिक त्रस्त झाले होते. मात्र, बुधवारी दुपारपासून आलेल्या पावसामुळं वातावरणात गारवा निर्माण झाल्यानं नागरिकांची उकाड्यापासून सुटका झाली. पावसानं हजेरी लावल्याने चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. काल रात्रीपासून पाऊस अजूनही सुरुच आहे.काल दिनांक १६ जुलै बुधवार रोजी दुपारच्या सुमारास अंबाजोगाई शहरांसह तालुक्यात पावसाला सुरुवात झाली. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. दरम्यान, हाती आलेल्या माहितीनुसार अंबाजोगाई तालुक्यातील अनेक भागात पावसाने हजेरी लावली आहे. दरम्यान, पावसामुळे काही भागातील वीज पुरवठा खंडित झाला होता.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका काँग्रेस पक्ष सर्वांना सोबत घेऊन लढवणार

### इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा; तालुकाध्यक्ष ॲड.प्रकाश मुंडे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१७ जुलै**

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्ष सर्वांना सोबत घेऊन मैदानात उतरणार असून, पक्षातील सर्व जुन्या आणि नव्या कार्यकर्त्यांना सोबत घेतले जाणार आहे. त्याचबरोबर नव्याने पक्षबांधणी सुरू असून, इच्छुकांनी आमच्याशी संपर्क साधावा असे आवाहन काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष ॲड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे.



अखिल भारतीय काँग्रेस कार्यसमितीच्या सदस्या तथा हिमाचल प्रदेश प्रभारी आदरणीय खासदार सौ. रजनीताई पाटील साहेब , माजी मंत्री अशोकरावजी पाटील साहेब, बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे साहेब , अखिल भारतीय राष्ट्रीय किसान समन्वयक बाबुराव मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ तालुक्यातील प्रत्येक जिल्हा परिषद सर्कल, पंचायत समिती गण तसेच गावागावात काँग्रेस पक्षाची बांधणी करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. पक्षातील सर्व जुन्या आणि नव्या कार्यकर्त्यांना तर संधी मिळेलच परंतु नव्याने पक्षात येऊ इच्छित असलेल्या सर्वांना समान न्यायाने संधी दिली जाईल. त्यामुळे पक्ष संघटनेत काम करण्याची इच्छा असेल किंवा आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवार म्हणून भाग घेण्याची इच्छा असेल अशा कार्यकर्त्यांनी आमच्याशी संपर्क साधावा असे आवाहन काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष ड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे.

# बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी पोथरा येथे चालवून पाहिले डुबे (कोळपणी यंत्र)

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ जुलै**

बीड तालुक्यात नेकनूर मंडळात केजच्या हद्दीला लागून पोथरा हे गाव आहे . या गावी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , नेकनूरचे मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे , पोथऱ्याचे तलाठी अक्षय चव्हाण , तलाठी सर्वेश कांबळे , तलाठी प्रशांत नलावडे यांनी भेट दिली . यावेळी मधुकर साहेबराव दराडे , सुरेश हावळे उपस्थित होते .

शेतकरी कोळपणी करत असल्याचे बघून तहसीलदार थांबले. मलाही कोळपणी करण्याचा अनुभव घेऊ द्या , असे त्यांनी बोलून दाखविले . त्या ठिकाणी कोळपणी करण्याची पद्धत समजून घेतली . स्वतः कोळपणी करण्याचा अनुभव घेतला . शेतकरी दराडे यांच्याशी गप्पा मारताना त्यांनी माहिती घेतली. यावेळी दराडे यांनी माहिती दिली की त्यांच्या शेतात बहुतांश वेळा सोयाबीन हेच पीक घेतल्या जाते . जमीन सुपीक असली तरी बारमाही पाण्याची व्यवस्था नसल्याने त्यांना खरिपात हेच पीक परवडते . यापूर्वी ते कपाशीचे पीक घेत असत . तथापि कपाशीच्या पिकावर असणाऱ्या रोगराई , त्यास लागणारा खर्च इत्यादी विचारात घेता त्यांना सोयाबीन पीक हे परवडत आहे .

शासनाच्या शेतकऱ्यांसाठी अनेक योजना असतात . कृषी विभाग , महसूल विभागामार्फत या योजनांची अंमलबजावणी होत असते . शेतकऱ्यांचे काय प्रश्न आहेत याबद्दलची माहिती प्रत्यक्ष भेटी दिल्याशिवाय कळत नाही . त्या अनुषंगाने तहसीलदारांची प्रत्यक्ष शेतावर भेट महत्त्वाची ठरते .



बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे प्रत्येक तालुक्यास भेट देऊन सर्वसामान्य जनता, नागरिक यांचे प्रश्न समजावून घेत आहेत . बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी आल्यापासून अनेक उपक्रम राबविण्यास सुरुवात केलेली आहे . शेतकऱ्यांच्या अडचणी असल्यास ते व्यवस्थितरित्या समजून सांगतात . संबंधित उपविभागीय अधिकारी , तहसीलदार यांच्याशी सरळ संपर्क साधून नागरिकांची कामे सोप्या पद्धतीने कशी होतील याची दक्षता बाळगतात.

बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या शेतकऱ्यांप्रती अत्यंत कनवाळू आहेत . सर्वसामान्य शेतकऱ्यांची कामे लवकर झाली पाहिजे, फेरफार लवकर झाले पाहिजे , फार्मर आयडी लवकर निघाले पाहिजे यासाठी त्या वेळोवेळी बीड , गेवराई , शिरूर कासारचे तहसीलदार , नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी , तलाठी यांचा पाठपुरावा करत असतात .

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांसाठी अनेक महत्त्वाच्या योजना सुरू केल्या आहेत . विशेषता बारा फुटाचा रस्ता , सातबारा वरील अनावश्यक नोंदी कमी करण्यासाठी जिवंत सातबारा मोहीम राबविणे इत्यादी अनेक शेतकरी हिताचे निर्णय त्यांनी घेतले आहेत . त्यांचे निर्णय स्थानिक पातळी पर्यंत पोहोचले किंवा नाही याची खात्री करण्यासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके झटत असल्याचे दिसून येते .

बीड तालुक्यातील पीक पेरणीचा विचार केला असता बाजरी ९८५६ हेक्टरवर , मका २१५४ हेक्टर , तूर ५४०८ हेक्टर , मूग ३२४५ हेक्टर , उडीद ३४१५ हेक्टर , भुईमूग ४० हेक्टर , तीळ १५ हेक्टर , सोयाबीन ४६,२४१ हेक्टरवर , कापूस ५१,८२४ हेक्टरवर अशाप्रकारे १, २२, २५३ हेक्टरवर पेरणी झाल्याचे दिसते .

बीड जिल्ह्यात एकूण ११ तालुके आहेत . या सर्व तालुक्यांचा विचार केला असता सरासरी ८७% हेक्टरवर खरिपाची पेरणी झाल्याचे समजते . यावर्षी मे महिन्याच्या शेवटी शेवटी चांगल्या प्रकारे पाऊस झाला असला तरी जून महिन्यातील पाऊसमान हे सलग दिसत नाही . अधून मधून पावसाच्या सरी येतात . त्यामुळे पिके तग धरून आहेत . तथापि मोठ्या पावसाची प्रतीक्षा दिसून येते .

आजच्या तहसीलदारांच्या भेटीमुळे पोथरा येथील शेतकरी आनंदी झाल्याचे दिसून आले . माझ्या शेतात तहसीलदार यांनी स्वतः येऊन कोळपणी केली हे माझे भाग्य आहे, असे दराडे यांनी नमूद केले . बीड जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी तहसीलदार शेळके यांच्याप्रमाणे क्षेत्रिय भेटी दिल्या , शेतकऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या तर निश्चितच प्रशासनाबद्दलची नागरिकांची भावना सकारात्मक होईल यात शंका नाही .

# व्यवसाय शिक्षण काळाची गरज–प्रा.डॉ.तात्या पुरी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१७ जुलै**

आज मीतीस भारत हा युवकांचा देश आहे व संपूर्ण जगभरात सध्या कौशल्याधिष्ठित तरुणांना विविध क्षेत्रांमध्ये प्रचंड मागणी आहे. त्या अनुषंगाने व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या भारतीय तरुणांना त्या त्या देशांमध्ये नोकरीच्या व रोजगाराच्या प्रचंड संधी आज उपलब्ध आहेत, त्याचा फायदा आजच्या तरुणांनी घेतला पाहिजे आणि म्हणूनच व्यवसाय शिक्षण ही काळाची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन खोलेश्वर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख तथा प्रमुख मार्गदर्शक प्रा.डॉ.तात्या पुरी यांनी केले. ते खोलेश्वर महाविद्यालयात आयोजित जागतिक युवा कौशल्य दिन तसेच इयत्ता अकरावीत नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या नवागतांचा स्वागत सोहळा या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खोलेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.दीपक फुलारी, व्यवसाय शिक्षण विभागाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.रवींद्र कुंबेफळकर, उपप्राचार्य प्रा. गौतम गायकवाड, पर्यवेक्षक प्रा.योगेश कुलकर्णी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी खोलेश्वर महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमात इयत्ता अकरावीत चालू शैक्षणिक वर्षातील(२०२५-२६) प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे मा. प्राचार्य डॉ. दीपक फुलारी, उपप्राचार्य डॉ.रवींद्र कुंबेफळकर, प्रा.डॉ.बिभीषण फड, प्रा.गौतम गायकवाड, पर्यवेक्षक प्रा.योगेश कुलकर्णी आदी मान्यवरांनी गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. या स्वागत सोहळ्यानंतर स्व. गोपीनाथराव मुंडे सभागृहात मुख्य कार्यक्रम संपन्न झाला. प्रारंभी सर्व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन पार पडले. पुढे बोलताना डॉ. तात्या पुरी म्हणाले की भारतीय युवकांमध्ये जिद्द, चिकाटी, कौशल्य व मेहनत करण्याची प्रचंड तयारी आहे. या गुणधर्मांचा धसका आज अनेक विकसित राष्ट्रांनी देखील घेतलेला आहे, कारण त्यांच्याकडे अशा प्रकारचे कुशल व पुरेसे मनुष्यबळ नाही,म्हणून भारतीय युवकांना देशांतर्गतच नव्हे तर देशाबाहेरही नोकरीच्या व रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. मात्र त्या संधीचे सोने करण्यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या माध्यमातून आपण त्या त्या विषयातील विविध कौशल्ये आत्मसात करून, ज्ञानी बनून ती विकसित केले पाहिजेत. जगाची गरज काय आहे ते ओळखून त्या पद्धतीचे ज्ञान व कौशल्य आपण अंगी बाणवले पाहिजे. आज देशाचे भविष्य तरुणांच्या हातात आहे. देशाच्या विकासात तुमचे योगदान मोलाचे ठरणार आहे. तसेच तरुणांमध्ये सामाजिक व राष्ट्रीय राष्ट्रीय जाणीवा निर्माण होणे गरजेचे आहे, असे सांगून त्यांनी जागतिक युवा कौशल्य दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.फुलारी म्हणाले की खोलेश्वर महाविद्यालयातील व्यवसाय अभ्यासक्रम विभाग हा प्रवेश संख्या तसेच गुणवत्तेच्या बाबतीत संपूर्ण बीड जिल्ह्यात क्रमांक एक वर असणारा विभाग आहे. या विभागाअंतर्गत मेडिकल लॅब टेक्निशियन, रेडिओलॉजी टेक्निशियन, हॉर्टिकल्चर, बँकिंग, फायनान्शियल सर्व्हिसेस अँड इन्शुरन्स, लॉजिस्टिक अँड सप्लाय चेन मॅनेजमेंट तसेच कॉम्प्युटर टेक्नोलॉजी हे सहा अभ्यासक्रम चालतात. या विविध अभ्यासक्रमांमधून आत्तापर्यंत अनेक विद्यार्थ्यांचे जीवन घडले आहे. त्यांना रोजगाराच्या, स्वयंरोजगाराच्या व नोकरीच्या अनेक संधी या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत मिळालेल्या आहेत. अशा महाविद्यालयात आपण शिक्षण घेत आहात ही तुमच्यासाठी भाग्याची गोष्ट आहे असे सांगितले पुढे बोलताना ते म्हणाले की आपल्या प्रत्येकात ईश्वराने काही ना काही सामर्थ्य दिले आहे आपण त्या सामर्थ्याला आणखी विकसित केले पाहिजे.आज शासनाचा भर देखील विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा विकास करणे यावरच आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात देखील कौशल्याधिष्ठित शिक्षणावरच भर दिलेला आहे तुमच्यातील कौशल्य तेव्हाच उपयोगाचे ठरेल जेव्हा तुमचे कौशल्य पणाला लावून त्याचा लाभ समाजाला होईल. म्हणून तुम्ही विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांचे ज्ञान घ्या व आपल्यातील कौशल्य विकसित करा असा सल्ला त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थित मान्यवरांचा परिचय प्रा.डॉ.रवींद्र कुंबेफळकर यांनी करून दिला.याप्रसंगी जागतिक युवा कौशल्य दिनाचे महत्त्व सांगताना ते म्हणाले की सन २०१४ मध्ये युनायटेड नेशन्स जनरल असेम्ब्लीने १५ जुलै हा जागतिक युवा कौशल्य दिन म्हणून घोषित केला. तरुणांना रोजगार,स्वयंरोजगार आणि उद्योजकतेसाठी कौशल्य सुसज्ज करण्याचे धोरणात्मक महत्त्व साजरे करण्यासाठी १५ जुलै हा दिवस जागतिक युवा कौशल्य दिन म्हणून साजरा केला जातो.आज त्याचा दहावा वर्धापन दिन आहे. याप्रसंगी त्यांनी खोलेश्वर महाविद्यालयात कार्यरत असलेल्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली.विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये अंगी बाणून स्वतःचे जीवन उज्वल बनवावे व महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवावा अशी अपेक्षा त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सौ.अनिता बर्दापूरकर यांनी केले तर आभार प्रा. डॉ. अजय डूबे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी व्यवसाय शिक्षण विभागातील सर्व सहा ही विभागांचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी व्यवसाय शिक्षण विभागातील प्रा.योगेश कुलकर्णी, प्रा.सौ. अनिता बर्दापूरकर,प्रा.डॉ. अजय डूबे, प्रा.विनय राजगुरू, प्रा.अमोल गणोरकर, प्रा.सौ. अलका पवार, प्रा.संतोष खांडेकर, प्रा.वसंत गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.





राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मुंबई येथील प्रदेश कार्यालयात नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन करताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते राजेभाऊ फड, वैजनाथ ढंपलवार आणि सहकारी मित्र दिसत आहेत.

# आ.मुंडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्तानं आयोजित सप्ताहात भूलतज्ञ डॉ.अर्शद शेख यांचे मिलिंद विद्यालयात मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१७ जुलै**

नाथ शिक्षण संस्था संचलित, मिलिंद माध्यमिक विद्यालय व मिलिंद ज्युनियर कॉलेज,परळी वै. येथे संस्थेचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा विद्यमान आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त; संस्थेच्या सचिव सौ.राजश्रीताई मुंडे व सहसचिव मा.श्री.प्रदीप खाडे, यांच्या मार्गदर्शनाखाली नाथ शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित सप्ताहानिमित्त दि.१७ जुलै २०२५ रोजी परळी वैजनाथ येथील सुप्रसिद्ध भूलतज्ज्ञ डॉक्टर अर्शद शेख यांच्याकडून 'प्रथमोपचार आणि आरोग्य व संतुलित आहार विहार विषयक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात भारतातील पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मालेवाडी येथील पालक श्री.माउली बदने यांच्या हस्ते करण्यात आले. आजच्या कार्यक्रमास मुख्य मार्गदर्शक लाभलेले परळी वै.येथील प्रसिद्ध भूलतज्ञ डॉ.अर्शद शेख मिलिंद माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.कदरकर बी.जी.,पर्यवेक्षक श्री.धायगुडे सर,मिलिंद ज्युनियर कॉलेजचे पाली विषयाचे प्राध्यापक श्री.सोनोने सर, मालेवाडी येथील



विद्यार्थ्यांचे पालक श्री.माउली बदने इ.मान्यवर मंचावर उपस्थित होते.

आजच्या 'आरोग्य विषयक मार्गदर्शन' कार्यक्रमास मुख्य मार्गदर्शक म्हणून लाभलेले परळी वैजनाथ येथील भूलतज्ञ श्री.अर्शद शेख यांनी विद्यार्थ्यांना प्रथमोपचार, आजच्या काळात विद्यार्थ्यांस अत्यावश्यक असलेला संतुलित आहार, व्यक्तिमत्व विकास या संदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपात शाळेचे मुख्याध्यापक श्री.कदरकर बी.जी.यांनी सभ्य समाजात वावरण्यासाठी आदर्श नागरिक हा शाळेतच घडतो व तो विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षकांनी नियोजित अभ्यासक्रमासोबतच संस्कार रूपी मुल्यांचे बीज विद्यार्थ्यांच्या मनात रूजवने ही आजच्या काळाची गरज असल्याचे सांगितले.

यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी परस्पर संवादातुन एकरुप होवुन मार्गदर्शन ऐकले. यावेळी मिलिंद माध्यमिक विद्यालय व मिलिंद ज्युनियरकॉलेजचे सर्व विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.